

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, २२ फेब्रुवारी २०२५। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १०६ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### आज श्री रामदास नवमी



## महत्त्वाचे

### घसरणीनेच आठवड्याचा शेवट



**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी आशियाई बाजारातील घसरणीचे प्रतिबिंब दिसून आले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ लागू करण्याच्या धमक्या आणि विदेशी गुंतवणूकदारांकडून होत असलेल्या सततच्या विक्रीचा बाजारात सलग चौथ्या दिवशी दबाव कायम राहिला. निर्देशांक ४२४ अंकांनी खाली येत ७५,३११ वर बंद झाला, तर निफ्टी ११७ अंकांनी घसरत २२,७९५ वर स्थिरावला. बाजारातील मंदीचा सर्वाधिक फटका ऑटो आणि फार्मा क्षेत्रांना बसला. निर्देशांकातील महिंद्राचा शेअर्स सर्वाधिक सहा टक्क्याने घसरला.

### विकिपीडियावरील आक्षेपार्ह मजकूर न काढल्यामुळे गुन्हा

**मुंबई :** छत्रपती संभाजी महाराजांबद्दलचा विकिपीडियावर असेलला आक्षेपार्ह मजकूर न हटविल्याबद्दल आता महाराष्ट्र सायबर पोलिसांनी चार एडिटर्स विरोधात गुन्हा दाखल केला आहे. विकिपीडियाची कॅलिफोर्नियास्थित असलेल्या नोडल एजन्सी विकिमीडिया फाउंडेशनला नोटीस पाठवून सदर आक्षेपार्ह मजकूर हटविण्यास सांगितले गेले आहे. विकिमीडिया ही स्वयंसेवी संस्था असून त्यांच्याद्वारे विकिपीडियाचे संचलन केले जाते. महाराष्ट्र सायबर सेलने पाठविलेल्या नोटीसमध्ये म्हटले की, छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विकिपीडियावर असलेला मजकूर चुकीचा आणि आक्षेपार्ह असा आहे. यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते. मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुपुत्र छत्रपती संभाजी महाराज हे भारतात पूजनीय आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दलचा चुकीचा मजकूर हटविला जावा. विकिपीडियावरील माहितीमुळे लोकांमध्ये रोष निर्माण होऊ शकतो, असेही या नोटिशीत म्हटले आहे. महाराष्ट्र सायबर सेलने पाठविलेल्या ई-मेलला विकिमीडियाकडून कोणतेही उत्तर न आल्यामुळे महाराष्ट्र सायबर सेलने आयटी कायद्याच्या विविध कलमाद्वारे विकिपीडियाच्या चार एडिटर्स विरोधात गुन्हा दाखल केला.

### काश्मीर खोऱ्यात झाली बर्फवृष्टी

श्रीनगर : काश्मीरमधील अनेक ठिकाणी शुक्रवारी हिमवृष्टी झाली, तर मैदानी भागात तुरळक पाऊस पडला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. गुलमर्ग, सोनमर्ग आणि पहलगाम या प्रसिद्ध पर्यटन रिसॉर्टमध्ये रात्रभर हिमवृष्टी झाली. अनंतनाग, झोजिला पास, बनिहाल, साधना पास आणि कुपवाडामधील माछिल व बांदीपोरमधील राझदान पास येथेही बर्फवृष्टीची नोंद झाली आहे. श्रीनगरसह खोऱ्यातील मैदानी भागात रात्रभर पाऊस कोसळला. मागील २४ तासांत काश्मीरमध्ये मैदानी भागात हलका ते मध्यम पाऊस पडला आणि उंच भागांवर हलका ते मध्यम बर्फ पडला तसेच मध्यम ते जोरदार हिमवृष्टी झाली, असे हवामान खात्याने सांगितले.

# भाषा फक्त संवादाचे माध्यम नाही, संस्कृतीचेही संवाहक

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन ● ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाचे दिल्लीत थाटात उद्घाटन

**नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**

भाषा हे फक्त संवादाचे माध्यम नसते, तर ती संस्कृतीचेही संवाहक असते. समाजाच्या जडणघडीत तिचे मोठे योगदान असते, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

राजधानी दिल्लीतील विज्ञान भवनात अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या सरहद पुणे आयोजित ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना पंतप्रधान मोदी बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष शरद पवार, साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, सरहदचे संस्थापक संजय नहार, साहित्य महामंडळाच्या सचिव उज्ज्वला मेहंदळे आणि कोषाध्यक्ष प्रकाश पागे व्यासपीठावर उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने मोदी यांनी मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन केले. सुरुवातीला पंतप्रधान मोदी यांना विठ्ठल रुख्मिणीची मूर्ती भेट म्हणून देण्यात आली.

आज जागतिक मातृभाषा दिन आहे, दिल्लीत आयोजित मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी तुम्ही हा दिवस निवडला, याबद्दल आयोजकांना धन्यवाद देत मोदी म्हणाले की, मराठी भाषेवर माझे प्रेम आहे, त्यामुळे मी मराठीत बोलण्याचा आणि मराठी भाषेतील नवीन शब्द शिकण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असतो. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात मोदी यांनी मराठी भाषेतील अनेक संत, कवी, ऋषिमुनी, साहित्यिक आणि स्वातंत्र्य संग्रामात योगदान देणाऱ्यांच्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. अनेक गाजलेल्या मराठी सुभाषितांचा भाषणात त्यांनी अचूक उल्लेख करीत उपस्थितांना आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्का दिला. मोदी ज्यावेळी मराठी भाषेत काही वाक्य बोलायचे, त्यावेळी सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडाकडाट व्हायचा.

मराठीचा जन्म संस्कृत भाषेतून झाला. आपली भाषा ही आपल्या आईसारखी असते. आई जशी मुलांवर लक्ष ठेवते, तशी भाषाही आपल्यावर लक्ष ठेवत असते, असे मोदी म्हणाले.

अनेक वेळा भाषेच्या मुद्यावरून समाजात मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, पण भारतीय भाषांमध्ये गैर असे काही नाही. उलट साहित्याची देशाच्या वाटचालीत मोठी भूमिका आहे. विंदा करंदीकरांच्या कविता तर अनेक भाषांमध्ये आल्या आहेत. महाराष्ट्रातील अनेक संतांनी मराठी भाषेत साहित्य रचत समाजाला नवी दिशा आणि प्रेरणा दिली, याचा उल्लेख करीत मोदी म्हणाले की, गदिमा आणि सुधीर फडके यांच्या गीतरामायणाने आपल्या जीवनावर मोठा प्रभाव टाकला. ज्ञानेश्वरी आणि गीतारहस्य यांचाही त्यांनी उल्लेख केला.

स्वातंत्र्य आंदोलनात लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते. जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या मराठी समाजसुधारकांचेही मोठे योगदान आहे. आयुर्वेद आणि तर्कशास्त्रातही मराठी लोकांचे अनन्यसाधारण असे योगदान आहे. मुंबई फक्त महाराष्ट्राची नाही, तर देशाची आर्थिक राजधानी म्हणून पुढे आली आहे, असे ते म्हणाले.

मराठी भाषेत शुरता आहे, वीरता आहे, सौंदर्य आहे, संवेदना आहे, समानता आहे, समरसता आहे, अध्यात्म आहे, आधुनिकता आहे, भक्ती, शक्ती आहे आणि युक्तीही आहे, याकडे मोदी यांनी लक्ष वेधले. ◂(तभा वृत्तसेवा)



९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे शुक्रवारी राजधानी दिल्लीत दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, साहित्यिक रवींद्र शोभणे, ज्येष्ठ नेते शरद पवार, सम्मेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर, उषा तांबे आणि संजय नहार प्रामुख्याने उपस्थित होते

### रा. स्व. संघाचा केला उल्लेख

१०० वर्षांपूर्वी एका व्यक्तीने स्थापन केलेल्या रा. स्व. संघरुपी रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे. यावर्षी त्या संघटनेची शताब्दी आहे, याचा गौरवपूर्ण उल्लेख करीत मोदी म्हणाले की, शंभर वर्षांपासून संघ देशाची संस्कृती आणि परंपरा जपण्याचा प्रयत्न करीत आहे. रा. स्व. संघामुळेच मला मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीशी जुळण्याचे भाग्य लाभले.

### मराठी माणसांचे स्वप्न मोदींनी पूर्ण केले : फडणवीस

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, असे स्वप्न जगभरातील मराठी माणसांनी पाहिले होते, पंतप्रधान मोदी यांनी मराठी माणसांच्या या स्वप्नांची पूर्तता केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात म्हटले. शासकीय कारभारातून अरबी आणि फारसी शब्द दूर करीत राजकारभारात मराठी भाषेचा वापर करण्याचा आग्रह आणि सक्ती छत्रपती शिवाजी महाराज यांनी केली होती. मराठी ही समृध्द भाषा आहे, लोकभाषा आहे. ज्यांना माया आणि वात्सल्य समजते, ते दुसऱ्यांच्या भाषेचा दुस्वास करू शकत नाही, असे फडणवीस म्हणाले.

### आईने ओवी लिहिली 'त्या' दिवशी मराठी भाषेचा जन्म झाला : डॉ. तारा भवाळकर

मराठी भाषा ही संतांनी टिकवली आहे. कोणी पुरोगामी म्हणो वा फुरोगामी; मात्र आमचे संत खऱ्या अर्थाने पुरोगामी होते, असा उल्लेख करीत संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या की, मराठी भाषा ही त्या अर्थाने जैविक आहे. ज्या दिवशी आईने आपल्या बाळासाठी ओवी लिहिली, 'त्या' दिवशी मराठी भाषेचा जन्म झाला. भाषा हे संस्कृतीचे बलस्थान आहे, भाषा ही जोडणारी गोष्ट असली पाहिजे, तोडणारी नाही, असे त्या म्हणाल्या. स्वागताध्यक्ष शरद पवार यांनीही आपल्या भाषणात मराठी भाषेच्या समाजजीवनातील वाटचालीचा आढावा घेतला. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी स्वागतपर भाषण केले. संमेलनाचे आमंत्रक संजय नहार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.



## मंत्रिमंडळात असताना आरोप झाले तर क्षणात राजीनामा द्या

### अण्णा हजारेंचं सूचक विधान; मुंडेंवर अप्रत्यक्ष भाष्य

**अहिल्यानगर, दि.२१ फेब्रुवारी-**

महायुतीतील राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर सातत्याने भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत तर दुसरीकडे मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका बनावट दस्तावेज देऊन लाटल्याच्या प्रकरणात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षाचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा झाल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. यावरून चांगलेच राजकारण तापले. दरम्यान, या सर्व घडामोडींबाबत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सूचक भाष्य केले आहे. मंत्रिमंडळात असताना जेव्हा आरोप होतात तेव्हा एक क्षण सुद्धा पदावर राहणे चुकीचे आहे. लगेच राजीनामा देऊन मोकळं झालं पाहिजे, असे अण्णा हजारे यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर राज्यातील राजकारण चांगलंच ढवळून निघालं. या घटनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. यावरून मंत्री धनंजय मुंडे यांचा विरोधकांकडून राजीनामा मागितला जात आहे. तसेच भाजपाचे आमदार सुरेश धस आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात अनेक आरोप केले आहेत.

# 'मला हलक्यात घेऊ नका!'

### एकनाथ शिंदे यांचा विरोधकांना टोला



मतदारांचे आभार मानण्यासाठी नागपुरात आलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका कार्यक्रमात बोलताना

◆ **नागपूर, २१ फेब्रुवारी**

२०० पेक्षा जास्त जागा निवडून आणू, असे मी आणि देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी सांगितले होते. हे भाकीत खरे ठरले. विधानसभा निवडणुकीत २३२ जागा जकून आणल्या. त्यामुळे लोकांनी मला हलक्यात घेऊ नये. ज्यांना हा संकेत समजून घ्यायचा, त्यांनी समजून घ्यावा, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना टोला लगावला.

विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतर आमची जबाबदारी वाढली आहे. त्याच अनुषंगाने लोकांचे आभार मानायला मी नागपुरात आलो आहे. मी आधीच बोललो आहे, मला हलक्यात घेऊ नका. मी बाळासाहेब आणि आनंद दिघे यांचा कार्यकर्ता आहे. त्याच अनुषंगाने सर्वांनी माझे मूल्यमापन करावे. ज्यांनी मला हलक्यात घेतले, त्यांची २०२२ मध्ये मी बंडी उलार केली, असे शिंदे यांनी सांगितले.

**एक दिवस जळून खाक होतील**

मला महादजी शिंदे पुरस्कार मिळाला. शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार दिल्लीत प्रदान करण्यात आला. एका मराठी माणसाने दुसऱ्या मराठी माणसाला पुरस्कार दिला आणि तोही महादजी शिंदेंसारख्या पराक्रमी महापुरुषाच्या नावाने दिला गेल्याने किती जण जळले, किती जळणार, एक दिवस जळून खाक होणार, अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला. पुरस्कार सोहळ्यात शरद पवार यांचा अपमान करण्यात आला, महादजी शिंदे यांच्या वंशांचाही अपमान करण्यात आला. कधी तरी सुधरा, माझ्यावर कितीही आरोप करा, शिव्या द्या, जोवर जनता आमच्यासोबत आहे, तोवर काहीच होणार नाही, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी विरोधकांवर हल्लाबोल केला.

**उद्धव ठाकरेंना टोला**

काही जण धक्कापुरुष झाले आहेत. विधानसभा निवडणुकीत लोकांनी धक्का देऊन त्यांना बाहेर बसवले. त्यांनी बाळासाहेबांचा विचार सोडला आहे. पक्षातील चांगल्या लोकांना धक्के मारून पक्षाबाहेर काढणारे जे नेते आहेत, जनता त्यांना धक्का दिल्याशिवाय राहणार नाही.

त्यामुळेच, शिवसैनिक आमच्यासोबत येत आहेत, विश्वास दाखवत आहेत, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. शेअर बाजारात ज्या शेअरची पत असते, ते शेअर लोक खरेदी करतात. अशीच आमची शिवसेना आहे, असेही शिंदेंनी शेवटी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

## संभल हिंसाचाराचे दाऊदशी थेट कनेक्शन

**लखनौ, २१ फेब्रुवारी-**

उत्तरप्रदेशातील संभलमध्ये गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये हिंसाचार झाला होता. या प्रकरणी उत्तरप्रदेश पोलिसांनी नुकतेच ४४०० हून अधिक पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. यात दुबईस्थित शारिक साठा या हिंसाचाराचा सूत्रधार होता,असा दावा आरोपपत्रात करण्यात आला आहे.

शारिक साठा सध्या दुबईमध्ये असून, अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित आहे. उत्तरप्रदेश पोलिसांनी संभल हिंसाचार प्रकरणी दाखल केलेल्या आरोपपत्रात म्हटले आहे की, शारिक साठाची दिल्लीत एक टोळी होती. या टोळीच्या माध्यमातून त्याने दिल्लीएनसीआरमध्ये ३०० हून अधिक वाहने चोरली होती तसेच शारिकचा दाऊद इब्राहिम आणि पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंध आहे. तो बनावट पासपोर्टचा वापर करून देशाबाहेर पळून गेला आहे. दरम्यान, या आरोपपत्रात ७९ आरोपींची नावे आहेत आणि हे सर्व आरोपी सध्या तुरुंगात आहेत. संभल हिंसाचाराच्या तपासात शारिक साठाचा सहभाग उघडकीस आला आणि आम्हाला मिळालेल्या पुराव्यांवरून आपण असे म्हणू शकतो की, त्याने हिंसाचार घडवून आणला. आरोपपत्रात साठाच्या टोळीतील सदस्यांचा समावेश आहे. हे पहिलेच आरोपपत्र आहे आणि तपास पुढे जाईल, तसे पुरवणी आरोपपत्र दाखल करू, अशी माहिती संभलचे पोलिस अधीक्षक बिश्नोई यांनी दिली.

## एकनाथ शिंदेंना धमकी देणाऱ्या दोघांना अटक

**बुलढाणा, २१ फेब्रुवारी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय वाहन बॉम्बने उडवून दिले जाईल, अशी धमकी गुरुवारी शहरातील काही पोलिस ठाणे आणि मंत्रालयाला ई-मेलद्वारे प्राप्त झाली. याप्रकरणी गुन्हे शाखेने दोन तरुणांना ताब्यात घेतले आहे.

हे दोघेही बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव मही येथील रहिवासी आहेत. त्यांना चौकशीसाठी मुंबई नेण्यात आले आहे. दरम्यान, चिखलीच्या भाजपा आमदार श्वेता महाले यांनाही जीवे मारण्याच्या धमकीचे पत्र मिळाल्याची माहिती आहे. आमदार श्वेता महाले यांनी आज चिखली पोलिस स्टेशनला या संबंधात तक्रार दिली आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेने तपास करून मंगेश अच्युतराव वायळ व अभय गजानन शगणे यांना ताब्यात घेतले असून, दोघेही बुलढाणा जिल्ह्यातील देऊगाव मही येथील रहिवासी आहेत.




# शांततेसाठी भारत, पाकिस्तानमध्ये ध्वज बैठक

## युद्धबंदी कराराचे पालन करण्यावर सहमती

◆ **जम्मू, २१ फेब्रुवारी**

भारत आणि पाकिस्तान सीमेवरील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर शुक्रवारी पूंछ येथील नियंत्रण रेषेवर दोन्ही देशांच्या लष्करी अधिकाऱ्यांची महत्वाची बैठक झाली. ७५ मिनिटे चाललेल्या या बैठकीत युद्ध कराराचे पालन करणे आणि सीमेवर शांतता प्रस्थापित करण्यावर एकमत झाले.

एका लष्करी अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, अलिकडे जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर सीमेपलीकडून गोळीबार आणि आयईडी हल्ल्यांच्या अनेक घटना झाल्या. यामुळे सीमेवर तणावाची स्थिती निर्माण झाली.

नियंत्रण रेषेवर शांतता प्रस्थापित करणे आणि युद्ध कराराचे पालन व्हावे या उद्देशाने भारताकडून पूंछ ब्रिगेडचे कमांडर आणि पाकिस्तानी लष्कराच्या दोन ब्रिगेडचे कमांडर ध्वज बैठकीत सहभागी झाले होते. सुमारे ७५ मिनिटे चाललेल्या या बैठकीत अनेक मुद्यांवर चर्चा करण्यात आली. यात २०२१ पासून नियंत्रण रेषेवर सुरू असलेला युद्धविराम कायम ठेवणे, नियंत्रण रेषेला तणावमुक्त करणे या विषयांचा समावेश होता.

दोन्ही देशातील लष्करी अधिकाऱ्यांनी सीमेवरील शांतता राहावी यासाठी युद्धबंदी कराराचे पालन करणे तसेच यापुढे तणावाची परिस्थिती उद्भवल्यास चर्चेने त्यावर तोडगा काढण्याचे मान्य केले. ही बैठक अतिशय सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीचा अधिकृत तपशील अद्याप भारतीय लष्कराकडून देण्यात आलेला नाही.

या चर्चेचा तपशील लवकरच जारी करण्यात येणार असल्याची माहिती लष्करी सूत्रांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)

### गोळीबार, घुसखोरीच्या घटनांवर चिंता

नियंत्रण रेषेवर तणाव वाढवण्यासाठी पाकिस्तान सातत्याने कट रचत आहे. बुधवारी नियंत्रण रेषा ओलांडून राजौरीमध्ये भारतीय हद्दीत गोळीबार करण्यात आला. ११ फेब्रुवारी रोजी अखनूर सेक्टरमध्ये घुसखोर अतिरेक्यांनी घडविलेल्या आयईडी स्फोटात दोन जवान हुतात्मा, तर एक जखमी झाला. १० आणि १४ फेब्रुवारी रोजी पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर सीमेपलीकडून झालेल्या गोळीबाराच्या घटनांत दोन जवान जखमी झाले. यावर भारतीय लष्कराच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत चिंता व्यक्त केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ५०० युवकांच्या लेझीम पथकाने वेधले लक्ष

## अक्कलकोटमध्ये शिवजन्मोत्सव मिरवणूक | जय भवानी, जय शिवरायचा जयघोष

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ फेब्रुवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जन्मेजयराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे, मंडळाचे सुरेशचंद्र सूर्यवंशी, शामराव मोरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळाच्या वतीने शुक्रवारी शिव छत्रपतींच्या भव्य मिरवणुकीने जय भवानी...! जय शिवराय...च्या जयघोषात शिवजन्मोत्सवाची सांगता करण्यात आली. या मिरवणुकीत अमोलराजे भोसले मित्र मंडळाचे ५०० युवकांच्या लेझीम पथकाचा खेळ लक्षवेधी ठरले..! शिवप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती.

दरम्यान सायंकाळी ६ वा. शिव छत्रपतींची भव्य मिरवणूक माजी गृह राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, शिंदे गटाचे सोलापूर जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, शैलेश पिसे, संजय देशमुख, प्रथमेश



इंगळे, तालुका कृषीअधिकारी हर्षद निगडे देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावार, सो.म.पा.माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष दिलीप सिद्धे, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव, उपनिरीक्षक ननावरे, अविनाश मडीखांबे, धनेश अचलेरे यांच्या हस्ते मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांची विधिवत पूजन अप्पू पुजारी व सोमकांत कुलकर्णी यांच्या मंत्र पटनाणे करण्यात आले.या मिरवणुकीस विश्वासराव निंबाळकर, रामचंद्रराव घाटगे, माजी पक्षनेता महेश हिंडोळे, बाळासाहेब देसाई, युवा नेता प्रथमेश म्हेत्रे, अरुण जाधव, सुधाकर गोंडाळ, बाळा शिंदे, सुभाष गडसिंग, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त भाऊ कापसे, चेअरमन गोकुळ शुगर दत्ता शिंदे, संतोष भोसले, लाला राठोड, मुस्लीम समाज संघटनाचे अध्यक्ष एजाज मुतवल्ली, रासप पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनिल बंडगर, ॲड. विजय हर्डीकर, डॉ. आर. व्ही. पाटील, लेखापरीक्षक ओंकारेश्वर उटगे, सुनील गोरे, प्रमोद गोरे, अप्पासाहेब पाटील, राजशेखर हिप्परगी, शहर अध्यक्ष भाजपा शिवशरण जोजन, शबाब शेख, चंद्रकांत सोनटक्के, प्रदीप जगताप, चंद्रकांत इंगळे, चंद्रशेखर मडीखांबे, संदीप मडीखांबे, शिवराज स्वामी, शैलेश राठोड, माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, सलिम येळसंगी, मैनुद्दीन कोरबू, नन्नु कोरबू, अंकुश चौगुले, भाजपा शहर सरचिटणीस बाळासाहेब शिंदे, बालाजी पाटील, शिंदे गटाचे शहर प्रमुख योगेश पवार, सोलापूरचे शेखर फंड, महेश कुलकर्णी, विकास भांगे, सचिन खंडागळे, ज्ञानेश्वर शिंदे, पृथ्वीराज काटकर, अभियंता किरण पाटील, अमित थोरात, अरविंद शिंदे, पै.मौला शेख, पै.महेश कुलकर्णी, छत्रपती प्रतिष्ठानचे गणेश गोब्बुर, सर्फराज शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक संपन्न झाली. निघालेल्या मिरवणुकीचे विविध सामाजिक संघटना व पक्षाने स्वागत केले. मिरवणूक यशस्वीसाठी अमोलराजे भोसले मित्र मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे, प्रा. मनोज जगताप यांनी केले.

### ▸ दूध, पाणी, अल्पोपहार वाटप

मिरवणुकीत सामील होणाऱ्या शिवभक्तांना विविध ठिकाणी मिरवणूक मार्गावर शहरातील सामाजिक संघटना, मान्यवरांकडून सुगंधी दूध, नारळ पाणी, अल्पोपहार देण्यात आला.

### ▸ अन्नछत्र मंडळात मिरवणुकीची सांगता

सदराची मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरील जुना राजवाडा समोरून कमलाराजे चौक, एवन चौक, नवा राजवाडा मार्गे, छ. शिवाजी महाराज चौक एस. टी. बसस्थानक, विजय कामगार चौक, कारंजा चौक, मेन रोड मार्गे, तूप चौक, फत्तेसिंह चौक ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

# दोन युवकांचा तलावात बुडून मृत्यू

## महागावातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

तालुक्यातील महागाव गावाजवळील तलावात दोन युवकांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. १९ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास घटना उघडकीस आली. या घटनेमुळे बार्शी शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

अनिल दत्तात्रय सपाटे (रा. आलीपूर रोड, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मोठा मुलगा गणेश (वय २६) हा १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता आपल्या मित्रासोबत गावाला जात असल्याचे सांगून घरातून निघून गेला होता. त्याच्या छोट्या भावाने ही माहिती वडिलांना दिली. दोन दिवस त्याच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला



असता त्याचा मोबाईल बंद लागत होता. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास अनिल सपाटे यांनी गणेशच्या मोबाईलवर पुन्हा फोन लावला असता पांगरी पोलीस ठाण्यातील पोलिसांनी फोन उचलला. त्यांनी सांगितले की, महागाव गावाजवळील तलावाच्या पुलाजवळ दोन पुरुषांचे मृतदेह आढळले आहेत आणि गणेश सपाटे यांच्यासह त्यांच्या नातेवाईकांनी तातडीने ग्रामीण रुग्णालय, पांगरी येथे यावे असे सांगितले.

अनिल सपाटे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी ग्रामीण रुग्णालय, पांगरी येथे पोहोचून मृतदेहांची ओळख पटवली असता, त्यातील एक मृतदेह गणेश अनिल सपाटे यांचा तर दुसरा मृतदेह शंकर उत्तम पटाडे (वय ४०, रा. यशवंत नगर, तुळजापूर रोड, बार्शी) यांचा असल्याचे स्पष्ट झाले. गणेश आणि शंकर यांचा मृत्यू कशामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. दोघे तलावाजवळ कसे गेले? पाण्यात पडून बुडाले की इतर काही कारण होते? याचा पोलीस तपास सुरु आहे. गणेश सपाटे यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण कुटुंब चकली व्यवसाय करून उदरनिर्वाह करत होते. तसेच, शंकर पटाडे यांच्या कुटुंबावरही दुःखाचा आघात झाला आहे.या घटनेमुळे बार्शी आणि परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

# आर्यन शुगर्सच्या संचालकांचा अटकपूर्व जामीन नामंजूर



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

आर्यन शुगरच्या संचालक मंडळावर जिल्हा बँकेने फिर्याद दाखल केली होती. या प्रकरणी त्यांना न्यायालयाने अटकपूर्व जामीन नामंजूर केला आहे.

आर्यन शुगर्स प्रा.लि. खामगांव (ता. बार्शी) या साखर कारखान्याच्या संचालकांनी सोलापूर जिल्हा मध्य. सह. बँकेकडे कारखान्याची उत्पादीत साखरेची पोती तारण म्हणून ठेवली व ५५ कोटी २५ लाख रुपये एवढे कर्ज सदर साखरेच्या माल तारणापोटी उचलले. सदर कर्ज व त्यावरील व्याजाची रक्कम अद्यापपर्यंत आर्यन शुगर्सच्या संचालकांनी बँकेकडे जमा केलेली नाही. आर्यन शुगर्सच संचालक, तात्कालीन बँक इन्स्पेक्टर व शाखाधिकारी यांनी संगनमत करुन माल तारण असलेली साखरेची पोती बँकेच्या परस्पर बाजारात विकली. परंतु साखर विक्री करुन आलेले पैसे त्यांनी माल तारण कर्ज खात्यात न भरता सदरची रक्कम परस्पर इतर खात्यामध्ये वळवून बँकेची सुमारे ४२ कोटी २५ लाखाची फसवणूक केली म्हणून सोलापूर जिल्हा मध्य. सह. बैंक, शाखा मार्केट यार्ड बार्शीचे शाखाधिकारी यांनी आर्यन शुगर्स या कारखान्याचे संचालक, बँकेचे तात्कालीन बँक इन्स्पेंटर व शाखाधिकारी यांनी बँकेची फसवणूक करुन मोठ्या रक्कमेचा संगनमताने अपहार केलेला आहे म्हणून रीतसर गुन्हा नोंदविला.

आर्यन शुगर्स या कारखान्याचे संचालक व इतरांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर आर्यन शुगर्स या साखर कारखान्याच्या संचालकांपैकी अविनाश वसंतराव भोसले व राजू वसंतराव भोसले यांनी बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये अटकपूर्व जामीन मिळणेसाठी अर्ज दाखल केला. सदरचा अटकपूर्व जामीनाचा अर्ज दाखल केल्यानंतर बँकेच्या शाखाधिकारी यांनी वरील आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जास तीव्र हरकत घेवून शपथपत्र दाखल केले. आरोपींची पोलिसांकडून सखोल चौकशी होणे तपासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. आरोपींनी केलेला गुन्हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. गुन्ह्याचे स्वरुप पाहता तपासकामी आरोपीचा प्रत्यक्ष ताबा आवश्यक आहे. आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केल्यास साक्षीदारांवर दवाव येण्याची शक्यता आहे, असा युक्तिवाद सरकारी वकीलांनी केला. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन बार्शी सत्र न्यायालयाचे न्यायाधिश यांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला.

# शिवजयंतीनिमित्त बार्शीत दुचाकी रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज-विजय कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ तसेच भारतीय जनता पार्टी, बार्शी यांच्यावतीने भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीस शिवभक्त माता-भगिनींसह हजारो बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बार्शी शहरात गेल्या अनेक वर्षांपासून शिवजयंतीनिमित्त भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन केले जाते. यंदाही मोठ्या उत्साहात व जल्लोषात या रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅली दरम्यान, शिवभक्तांनी भगवे ध्वज फडकवत आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण वातावरण दणाणून सोडले.



या रॅलीची सुरुवात श्री शिवाजी प्रसारक मंडळ येथून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन व शिवरायांची आरती करुन करण्यात आली. त्यानंतर हजारो दुचाकीस्वार शिवभक्तांच्या सहभागाने ही रॅली शहराच्या प्रमुख मार्गांवरुन मार्गस्थ झाली. या रॅलीत सहभागी झालेल्या शिवभक्तांनी पारंपरिक वेशभूषा आणि भगवे फेटे परिधान करुन शिवजयंती उत्सवाचे औचित्य साधत ऐतिहासिक परंपरेचा अभिमान व्यक्त केला.

रॅली दरम्यान पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. संपूर्ण कार्यक्रम शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या शिवरायांना अभिवादन करणाऱ्या उत्सवात सहभागी झालेल्या सर्व शिवभक्तांचे आयोजक मंडळाच्यावतीने आभार मानण्यात आले. या कार्यक्रमास अनेक मान्यवर, स्थानिक नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. या भव्य रॅलीमुळे बार्शी शहरात शिवजयंतीनिमित्त उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेऊन युवापिढीने प्रेरणा घ्यावी, असा संदेशही या कार्यक्रमातून देण्यात आला.

# कष्ट कराल तरच भविष्यात यशस्वी व्हाल

▸ प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार
▸ हालचिंचोळीतील मलकारसिद्ध हायस्कूलमध्ये निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

जीवनात कष्टाला पर्याय नाही. केलेले कष्ट वाया जात नाही. ही गोष्ट विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावी. नियमित अभ्यासाचा सराव करावा, असे आवाहन प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले.




हालचिंचोळी (ता. अक्कलकोट) येथील श्री मलकारसिद्ध हायस्कूलमध्ये दहावी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभप्रसंगी ते बोलत होते. भविष्यातील जीवन उज्ज्वल व यशस्वी करण्यासाठी शालेय जीवनापासून कष्ट करायला शिकले पाहिजे. टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देव पण येत नाही. म्हणून कष्टाशिवाय पर्याय नाही. ही जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी असेही प्रा. डॉ. बिराजदार यांनी सांगितले. सुभाष नागरसे यांनी हा निरोप समारंभ नसून शुभेच्छा समारंभ आहे. भविष्यात शिक्षकांचे मार्गदर्शन हवे असल्यास प्रशाला व संस्था नेहमीच सहकार्य करेल असे सांगितले. संस्थापक म्हाळप्पा सुरवसे यांनी प्रशालेचा दरवर्षी शंभर टक्के निकाल लागतो. ती परंपरा कायम ठेवण्यासाठी अभ्यास करून परीक्षेला सामोरे जावे, असे सांगितले. यावेळी खजिनदार इंदलबेग मिर्झा, सहसचिव सोपान लवटे, अण्णाराव पाटील, अधीक्षक राजकुमार कांबळे उपस्थित होते.

# अडीच लाख 'फार्मर आयडी'ची नोंदणी

▸ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले ▸ सर्वच शेतकऱ्यांनी फार्मर आयडी घेण्याचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

शासनाच्या विविध कृषीसंलग्न योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलदगतीने व अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक दिला जात आहे. आजतागायत जिल्ह्यातील ११ तालुक्यातून २ लाख ५० हजारापर्यंत शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील सर्वच शेतकऱ्यांनी शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक गावातील सीएससी चालक व महाईसेवा चालक यांना सोबत घेऊन ही मोहिम स्वरुपात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक काढले जात आहेत. यासाठी आमचे कृषी सहाय्यकही शेतकऱ्यांना मदत करीत आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील पोस्ट मास्तरांकडूनही आधार लिंकींगसाठी मदत घेतली जात आहे. जिल्हाभरात ५ लाखाच्यावर शेतकरी असून, सध्या ५० टक्के शेतकऱ्यांची नोंद झाली असून, उर्वरित शेतकऱ्यांनीही फार्मर आयडी लवकर काढून घेण्याचे भोसले यांनी आवाहन केले आहे.

### ई-केवायसी मोहीम सुरू

सोलापूर जिल्ह्यातून लाखो शेतकरी पीकविमा काढतात. मात्र अनेकांना केवळ ई-केवायसी नसल्याने (बँक आणि आधार लिंक) पैसे मिळत नाहीत. असे अजून ६ हजार शेतकरी ई-केवायसीविना राहिले आहेत. यातील अनेक शेतकऱ्यांचे शेतात अती कष्ट केल्याने हाताचे ठसे उमटत नसल्यानेही व्यत्यय येत आहे. अशातच नव्यानेही वर्षाकाठी दीड-दोन हजार शेतकरी वाढत असून, सर्वांनी ई-केवायसी करून घेऊन शासनाकडून मिळणाऱ्या पिकविमा मदतीचा फायदा घ्यावा, असेही आवाहन जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांना डिजिटल डेटाबेसचा होणार फायदा

या फार्मर आयडी अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याचा आणि त्यांच्या शेतीच्या माहितीचा एक स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार केला जात आहे. यामध्ये जमिनीचा प्रकार, हवामान, लागवडीची पद्धती, पाणीपुरवठा, पीक प्रकार, उत्पादन आणि विक्रीशी संबंधित सर्व महत्त्वाच्या बाबीची माहिती असणार आहे. ॲग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरीत्या पोहोचवण्यासाठी स्थापन स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे. शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषी निविष्ठा, विपणन स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



# शिक्षकांच्या प्रतिनियुक्तीबाबत चौकशीचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ फेब्रुवारी-**

अक्कलकोट पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी दिलेल्या शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्यांची चौकशी करून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन शिक्षण विभागाचे अधीक्षक चंद्रकांत होळकर यांनी मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष महांतेश कट्टीमनी यांना दिले. त्यानंतर त्यांनी धरणे आंदोलन थांबवले.

प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी अधिकाराचा गैरवापर करून प्रतिनियुक्त्या केल्या आहेत. त्याची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी मैंदर्गी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक तथा मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष कट्टीमनी यांनी केल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ती कारवाई मागे घ्यावी, या मागणीसाठी विद्यार्थिनींसह पालकांनी शिक्षणाधिकारी कार्यालयही गाठले होते. चुकीची तक्रार देण्यास लावून निलंबनाची कारवाई केल्याचा कट्टीमनी यांचा आरोप आहे. प्रतिनियुक्ती संदर्भात चौकशी करून त्याचा अहवाल संघटनेला द्यावा. याप्रकरणी कारवाई व्हावी, या मागणीसाठी मागासवर्गीय शिक्षक संघटनेने जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन सुरू केले होते. अधीक्षक होळकर यांनी याबाबत १५ दिवसांत चौकशी करून कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर कट्टीमनी यांनी धरणे आंदोलन स्थगित केले.

## संक्षिप्त वृत्त



### ढोकबाभुळगाव येथे ८१ जणांचे रक्तदान

**मोहोळ,दि. २१ फेब्रुवारी-**

तालुक्यातील ढोकबाभुळगाव येथील जाणता राजा कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शिबिरात ८१ जणांनी रक्तदान केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त ढोक बाभूळगाव येथे जाणता राजा कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन सरपंच शिवाजी पासले आणि पोलीस पाटील मधुकर चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब गायकवाड, नूतन अध्यक्ष योगेश धनाजी लोमटे, उपाध्यक्ष किरण काकडे, ज्योतिबा लोमटे, लखन बेदरे, मंगेश चव्हाण, मुकेश चव्हाण, कृष्णदेव खराडे, संतोष खराडे, अमोल भांगे, समर्थ मुळे, किरण अंकुशराव, जयप्रकाश शिंदे, अभिजीत चव्हाण, शेखर नागणे, आकाश तांबिले, अक्षय चव्हाण, बबलू चव्हाण, प्रदीप गव्हाणे, अमोल गव्हाणे व मंडळातील सर्व कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी सिद्धेश्वर रक्तपेढी, सोलापूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



### वैराग येथे १५३ जणांचे रक्तदान

**वैराग, दि. २१ फेब्रुवारी-**

आण्णा ग्रुपच्या शिवजन्मोत्सव उत्सावामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डिजिटल मीडियाचे पत्रकार किशोर सोनवणे, मुजबिल कौठाळकर, राहुल भालशकर, संतोष राजगुरू, अजीम शेख तसेच सुजित काकडे, आप्पा दळवी यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी वैजिनाथ आदमाने, जगन्नाथ आदमाने, महेश पन्हाळे, संदीप पालकर, संदीप उमाप, गणेश शिंदे, कृष्णा खेंदाड, ओम आदमाने, प्रसाद गाटे, अनिल शिंदे, आण्णा उगले, चेतन खेदाड, अमोल जगदाळे, नाना शिखरे, आण्णा ग्रुपचे कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी १५३ जणांनी रक्तदान केले असून यामध्ये २३ महिलांचाही सहभाग होता. रक्तदान शिबिर हे भगवंत ब्लड बँक बार्शीच्या सहकार्यातून घेण्यात आले. ब्लड बँकेचे गणेश जगदाळे, राधिका बेली, प्रणाली घोंगाने, सोनाली झगडे यांनी रक्त संकलनासाठी परिश्रम घेतले.आभार सचिन पाणबुडे यांनी मानले.




### तीर्थच्या श्री रामलिंगेश्वर शिक्षण संकुलात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन


**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर)हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण करून सर्वसामान्यांच्या जीवनात आशेचे किरण निर्माण केले. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. पाण्याचे नियोजन कसे करावे याची दिशा छत्रपतींनी दिली. शेतकरी सुखी तर समाज सुखी हा विचार शिवरायांनी रुजविला म्हणून छ. शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे होते. असे भावपूर्ण विचार प्राचार्य सुधीर सोनकवडे यांनी श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आयोजित छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. अमर पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाच्या कार्य शैलीचे महत्व विषद केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महेश पट्टनशेट्टी यांनी केले. कार्यक्रमास शिल्पा महिंद्रकर, सचिन गुजा, सिद्धेश्वर घोंगडे, प्रा. सिद्धाराम पाटील, प्रा. शांतप्पा बगले, गुरुशांत बिराजदार, बाबुलाल दोडमिशे विद्यार्थी उपस्थित होते.

### बार्शीच्या निलेश सरवदे, सूरज मुंडेंचे सायकलिंग स्पर्धेत यश

**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

पिंपरी चिंचवड येथील ऑडेक्स क्लब अंतर्गत आयोजित १२०० किलोमीटर लाँग राइडर मॅराथॉन (ड्ठच्) सायकलिंग स्पर्धेत बार्शी येथील निलेश सरवदे आणि सुरज मुंडे यांनी यशस्वी कामगिरी केली आहे. ही स्पर्धा १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ५-३० वाजता सुरु झाली. या रेसमध्ये एकूण ११ सायकलस्वारांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी ९ सायकलस्वारांनी पूर्णत्वास नेली, तर १ स्पर्धक अपयशी ठरला. एक सायकलस्वार शेवटच्या टप्प्यात दमदार प्रदर्शन करत होता. बार्शीचे निलेश सरवदे आणि सुरज मुंडे यांनी उत्कृष्ट सायकलिंग कौशल्य दाखवून ही अवघड रेस पूर्ण केली. या स्पर्धेसाठी ९० तासांचा कटऑफ ठरवण्यात आला होता. त्याआधीच निलेश सरवदे यांनी ८९ तासांत, तर सुरज मुंडे यांनी केवळ ८० तासांत हे अंतर पार करत आपले कर्तृत्व सिद्ध केले.



### उत्कर्ष प्रतिष्ठानचा आज वर्धापन दिन

**सांगोला, दि. २१ फेब्रुवारी-**

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला या संस्थेचा ४६ वा वर्धापनदिन आज शनिवार दि.२२ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे. वर्धापन दिनानिमित्त पुणे येथील मधुरा कुलकर्णी यांचे समर्थ रामदास स्वामी व समाज प्रबोधन या विषयावर कै. सौ. लक्ष्मीबाई केळकर सभागृह, डॉ. केळकर हॉस्पिटल येथे दु. ३ वा. प्रवचन होणार आहे. प्रवचनाचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा प्रा. निलिमा कुलकर्णी यांनी केले आहे.

# राष्ट्र उभारणीसाठी सर्वोत्तम नेतृत्व हवे

## स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिप कॉन्क्लेव्हचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन



**◆ नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**

आज प्रत्येक नागरिकाचे विकसित भारत हेच लक्ष्य आहे, यासाठी प्रत्येक जण रात्रंदिवस काम करीत आहे. १४० कोटी लोकांच्या देशात आपल्याला राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येक क्षेत्रात आणि जीवनाच्या प्रत्येक पैलूत सर्वोत्तम नेतृत्वाची आवश्यकता आहे. नागरिकांचा विकास तरच राष्ट्र आणि पर्यायाने जगाचा विकास होण्यास मदत होते, असे प्रतिपादन शुक्रवारी राजधानी दिल्लीतील भारत मंडपम् येथे गुजरातच्या स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिप कॉन्क्लेव्हचे उद्घाटनाप्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी केले. राष्ट्र उभारणी आणि विकासासाठी नेतृत्त्वाचे महत्त्व अधोरेखित करताना मोदी म्हणाले, विकसित भारत घडविण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी दाखविलेल्या मार्गावर जावे लागेल. विवेकानंदांना भारताला गुलामगिरीतून बाहेर काढून परिवर्तन करायचे होते. त्यांचा असा विश्वास होता की, जर त्यांच्याकडे शंभर लीडर्स असतील, तर ते भारताला केवळ स्वातंत्र्यच नव्हे, तर ते जगातील अव्वल देशदेखील बनवू शकतात. आपण सर्वांनी हा मंत्र घेऊन पुढे जायला हवे. क्षेत्र कुठलेही असो नेतृत्व क्षमता महत्त्वाची आहे. नेतृत्वामुळेच देश आर्थिक स्वातंत्र्य आणि जगात अव्वलस्थानी पोहोचू शकेल. तुम्हाला कोणत्याही क्षेत्रात सर्वोत्तम व्हायचे असल्यास लोकांना केंद्रबिंदू ठेऊनच पुढे जावे लागेल. २१ व्या शतकात आपल्याला अशा संसाधनांची आवश्यकता आहे, जी नवोन्मेष आणि कौशल्यांना प्रभावीपणे चालना देऊ शकतील. आपण नेतृत्व विकासाला वैज्ञानिकदृष्ट्या गती दिली पाहिजे आणि या परिवर्तनात स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिप महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असेही पंतप्रधान म्हणाले.

**देशाला तरुणांकडून सर्वाधिक अपेक्षा**

आपण येत्या काळात लोकशाहीपासून ते तंत्रज्ञानापर्यंत एका नव्या नेतृत्वाला पुढे आणणार आहोत. याबाबत भारताचा प्रभाव अनेक पटींनी वाढणार आहे. त्यामुळे देशाचे धोरण सक्षम नेतृत्व तयार करण्यावर आहे. आपल्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत, जागतिक संस्थांमध्ये स्पर्धेत उतरायचे असेल, तर असे नेतृत्व हवे, ज्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे आकलन असेल. त्यामुळे देशाला तरुणांकडून सर्वाधिक अपेक्षा आहे. गुजरातमध्ये हिऱ्याची एकही खाण नाही, पण जगात १० पैकी ९ हिरे असे आहेत, ज्याला कोणत्या ना कोणत्या गुजराती व्यक्तीचा हात लागलेला असतो

**भूतानच्या पंतप्रधानांचे कौतुक**

भूतानचे पंतप्रधान त्शेरिंग तोबगे हेदेखील कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांच्या आगमनानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले, आज भूतानच्या राजाचा वाढदिवस आहे आणि आपण येथे हा प्रसंग साजरा करीत आहोत. भूतानच्या पंतप्रधानांना येथे पाठवण्यात विधात्याची मोठी भूमिका आहे. ◀(वृत्तसंस्था)

### विकासाचा सांगितला पंचसूत्री फॉर्म्युला

प्रत्येक कार्यक्षेत्रात सर्वोत्तम नेतृत्व निर्माण करणे काळाची गरज असून, त्याआधारावर सरकार योजना आणि धोरणे ठरवत आहे.- विकासासाठी केवळ नैसर्गिक संपदाच नव्हे, तर कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असून त्यासाठी तरुणांनी स्वतःतील गुण ओळखून क्षमता विकसित करावी. भारत एक जागतिक शक्ती म्हणून उदयास येत आहे आणि प्रत्येक क्षेत्र प्रगतीचा नवा उच्चांक गाठत आहे. विकासाचा वेग विस्तारण्यासाठी जागतिक दर्जाच्या नेत्यांची आवश्यकता आहे. भारताचा संपूर्ण दृष्टिकोन आणि भविष्य एका मजबूत नेतृत्व पिढीवर अवलंबून आहे म्हणून आपल्याला जागतिक विचारसरणी आणि स्थानिक शिक्षणासह पुढे जावे लागेल. आपल्याला असे नेतृत्व तयार करावे लागेल, जे भारतीय मानसिकतेसह आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन समजून घेतील. धोरणात्मक निर्णय, संकट व्यवस्थापन आणि भविष्याचा विचार करण्यास पारंगत असलेल्या नेतृत्वाची देशाला गरज आहे.




# लाडकी बहीण योजना बंद पडणार नाही : शिंदे

**गोंदिया, २१ फेब्रुवारी,**

अडीच वर्षांपूर्वी क्रांती झाली आणि त्यावेळची ठिणगी आता ज्वालामुखीसारखी सगळीकडे पसरत आहे. त्यामुळे शिवसेनेत येणाऱ्यांची रीघ लागली आहे. बाळासाहेबांच्या विचारांचा जो-तो शिवसेनेत येऊ लागला आहे. मी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री असो अथवा नाही, पदे येतात पदे जातात, पण राज्यातील कोट्यवधी लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ म्हणून मला ओळख मिळाली, याचा अभिमान आहे.

तेव्हा विश्वास देतो, कुणी काहीही सांगितले, तरी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. देवरी येथे शुक्रवार २१ फेबुवारी रोजी काँग्रेसचे माजी आमदार सहषराम कोरोटे यांचा शिवसेना पक्षप्रवेश व शिवसेना मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंत्री संजय राठोड, आ. नरेंद्र भोंडेकर, माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, माजी आमदार सहषराम कोरोटे, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र नायडू उपस्थित होते. शिंदे म्हणाले, काल एका बातमीत एसटी प्रवासात दिलेली ५० टक्के सवलत बंद होणार असल्याचे सांगण्यात येत होते. परंतु, एसटीत दिलेली ५० टक्के सवलत असो किंवा ज्येष्ठांसाठी सुरू केलेली योजना, कधीच बंद होणार नाही.

लेक लाडकी लखपती, लाडकी बहीण योजना किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केंद्रातील ज्या योजना सुरू केल्या, त्यादेखील सुरूच राहणार असल्याचे ते म्हणाले. २०२२ मध्ये उठाव केला, संघर्ष केला. महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या मनातले सरकार स्थापन केले. आम्ही अनेक योजना आणल्या, बंद पडलेले प्रकल्प, विदर्भ- मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प सुरू केले.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना २०१४ ते १९ मध्ये जलयुक्त शिवार योजना सुरू केली. मात्र, महाविकास आघाडीने ती बंद केली. शेतकऱ्यांच्या, माता- भगिनींच्या सर्व योजना आघाडी काळात बंद झाल्या. मोठमोठे प्रकल्प बंद झाले. मात्र, आमच्या सरकारच्या काळात अनेक विकास कामे आम्ही केली. तुमच्या नावात राम आहे. मात्र, तुम्ही यायला उशीर केला. तुम्ही आधीच आला असता, तर चित्र वेगळे असते. पण, असू देत; आता तुमच्या पाठीशी हा एकनाथ शिंदे उभा आहे, असा विश्वास त्यांनी दिला.

# दिल्ली विधानसभेत सादर होणार कॅगचा अहवाल

**◆ नवी दिल्ली, २१ फेब्रुवारी**

नव्याने स्थापन झालेल्या दिल्ली विधानसभेचे पहिले अधिवेशन या सोमवारपासून सुरू होणार आहे, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले.

हे अधिवेशन २४, २५ व २७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या अधिवेशनात २४ फेब्रुवारी रोजी मागील आप सरकारच्या कामगिरीवरील कॅगचा अहवाल सादर केला जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

नवीन निवडून आलेल्या आमदारांना २४ व २५ फेब्रुवारी रोजी शपथ देण्यात येईल. २६ फेब्रुवारी रोजी शिवरात्रीची सुट्टी असल्यामुळे भाजपा सरकार कॅगचा अहवाल सादर करेल.

यापूर्वी दिल्लीत आपच्या राजवटीत, भाजपाने सरकारला कॅगचे अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. भाजपाने आप सरकारवर भ्रष्टाचार लपविण्यासाठी कॅगचा अहवाल रोखल्याचा आरोप केला होता.

या महिन्याच्या सुरुवातीला विधानसभा निवडणुकीनंतर भाजपाने दिल्लीत नवीन सरकार स्थापन केले आहे. विधानसभेत त्यांचे ४८ आमदार आहेत, तर विरोधी पक्ष आम आदमी पार्टीचे २२ आमदार आहेत. ◀(वृत्तसंस्था)

# इस्रायलच्या ३ बसमध्ये साखळी बॉम्बस्फोट

**◆ तेल अवीव, २१ फेब्रुवारी**

मध्य इस्रायलच्या तेल अवीव शहरात गुरुवारी रात्री उशिरा ३ बसेसमध्ये साखळी बॉम्बस्फोट झाले. या बसेस बाट याम आणि होलोन भागातील पार्किंगमध्ये उभ्या होत्या. या स्फोटांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. पोलिसांनी दहशतवादी हल्ल्याचा संशय व्यक्त केला असून, देशभरात बस आणि रेल्वे सेवा बंद करण्यात आली आहे.

पोलिस प्रवक्ते असी अहरोनी यांनी निवेदन जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, तीन बसमध्ये एकूण पाच बॉम्ब ठेऊन त्यात टायमर लावण्यात आले होते. बॉम्बशोधक पथकाने दोन बसमधून दोन बॉम्ब निकामी केले, तर तीनचे स्फोट झाले. शुक्रवारी सकाळी बॉम्बस्फोट करण्याचे नियोजन होते. पण, त्यांचे टायमर चुकीचे सेट केल्याने गुरुवारी रात्री बॉम्बस्फोट झाले, सुदैवाने बसेस पार्किंगमध्ये उभ्या असल्याने जीवितहानी झाली नाही.

ज्या बसमध्ये स्फोट झाला त्यात प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला मागच्या सीटवर एक संशयास्पद बॅग दिसली. त्याने चालकाला याबद्दल माहिती दिली. त्यानंतर प्रवासी बसमधून उतरले, काही मिनिटांतच बसमध्ये स्फोट झाला. या घटनेनंतर पंतप्रधान नेतान्याहू यांनी इस्रायल संरक्षण दलांना अतिरेक्यांच्या अड्ड्यांविरुद्ध मोठ्या प्रमाणात कारवाई करण्याचा आदेश दिला. सुरक्षेच्या कारणास्तव सरकारने देशभरातील बस आणि रेल्वे सेवा बंद केल्या. बॉम्बस्फोट दहशतवाद्यांनी केल्याचा संशय असून अद्याप हल्ल्याची जबाबदारी कोणत्याही अतिरेकी संघटनेने घेतलेली नाही. ◀(वृत्तसंस्था)

# महाकुंभातील मुलींचे कपडे बदलतानाचे फोटो विक्रीला

**प्रयागराज, २१ फेब्रुवारी-**


महाकुंभ मेळ्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक प्रयागराज येथे पोहचले. त्यात महिलाही अधिक होत्या. पवित्र गंगा स्नान करण्यासाठी भाविकांची गर्दी त्रिवेणी संगमावर झाली होती. मात्र, याच ठिकाणी महिलांचे कपडे बदलतानाचे आणि आंघोळीचे फोटो सोशल मीडियावर विक्री केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

याचे गांभीर्य लक्षात घेऊन महाकुंभ परिसरातील कोतवाली पोलिसांनी १५ सोशल मीडिया चॅनेलविरोधात एफआयआर दाखल केला आहे. सध्या पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहेत. माहितीनुसार, महाकुंभ परिसरात महिलांचे स्नान केल्यानंतर कपडे बदलतानाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियाच्या टेलीग्रामवर १९९९ रुपयांना विकले जात आहेत. याची माहिती मिळताच पोलिसांनी पुढाकार घेत एफआयआर दाखल केला. प्रयागराज येथे गंगा स्नानासाठी आलेल्या महिला, मुलींचे खाजगी व्हिडीओ, फोटो बनवून ते व्हायरल केले जात आहेत.

हे व्हिडीओ आणि फोटो जेव्हा महिला त्रिवेणी संगमावर स्नान करीत होत्या आणि नंतर कपडे बदलण्यासाठी गेल्या, तेव्हा रेकॉर्ड केले गेले. धक्कादायक म्हणजे हे व्हिडीओ, फोटो टेलिग्रामवर विकले जात आहेत. मेटा प्लॅटफॉर्मवरही काही व्हिडीओ व फोटो शेअर केले आहेत. या प्रकरणाबाबत पोलिसांनी दोन वेगवेगळे एफआयआर केले आहेत. इन्स्टाग्रामवरील नेहा १२२४६७२०२४ आणि सीसीटीव्ही चॅनेल ११ कडून महाकुंभासाठी आलेल्या महिलांचे स्नान करतानाचे व्हिडीओ, फोटो विविध किमतीत उपलब्ध करून देण्याचा दावा करण्यात येत आहे.




# महाकुंभाच्या शेवटच्या वीकेंडला पुन्हा गर्दी



**पाहता-पाहता** महाकुंभमेळा शेवटच्या टप्प्यात आला असून, अजूनही गर्दी मात्र ओसरलेली नाही. शेवटचा वीकेंड असल्याने या शनिवारी आणि रविवारी मोठी गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सोबतच व्हीआयपी घाटही ओसंडून वाहत असल्याचे चित्र आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभाशी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. ते म्हणाले, संगमात मोठ्या संख्येने भाविक येत आहेत. प्रणालीमध्ये त्रुटींना वाव असता कामा नये. भाविकांना शक्य तितके कमी चालावे लागेल, अशी व्यवस्था करा.

शुक्रवारी महाकुंभाचा ४० वा दिवस होता. संगममध्ये ३५ हून अधिक व्हीआयपींनी स्नान केले. मेळा संपायला अजून पाच दिवस शिल्लक आहेत. सकाळी ८ वाजेपर्यंत ३१ लाख भाविकांनी संगमात स्नान केले. आतापर्यंत सुमारे ५८.३४ कोटी भाविकांनी स्नान केले आहे. शुक्रवारपासून महाकुंभात गर्दी वाढेल; कारण हा शेवटचा वीकेंड आहे.

संगमाकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर ८ ते १० किमीपर्यंत भाविकांची गर्दी आहे. शहराबाहेरील पार्किंगमध्ये वाहने पार्क केली जात आहेत. तिथून शटल बसची सुविधा आहे. तथापि, बस उपलब्ध नसेल, तर संगमला पोहोचण्यासाठी सुमारे १० किमी चालावे लागते.

गर्दीमुळे प्रयागराजमधील शाळांमध्ये आठवीपर्यंतचे वर्ग ऑनलाईन घेतले जातील. प्रयागराजला जाणाऱ्या आणि येणाऱ्या ८ गाड्या २८ फेब्रुवारीपर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. चार गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. दुसरीकडे, व्हीआयपी वाहने अरैल घाटापर्यंत जात आहेत. प्रयागराजमध्ये नोंदणीकृत वाहनांनाच शहरात प्रवेश दिला जात आहे. ■

# महाकुंभामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेत होणार तीन लाख कोटींची वृद्धी

**ट्रिलियन** अर्थव्यवस्थेचे लक्ष्य ठेवले आहे. भारत पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. उत्तरप्रदेशात महाकुंभाचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले आहे. या महाकुंभामुळे उत्तरप्रदेशच्या अर्थव्यवस्थेत तीन लाख कोटींची वृद्धी होणार आहे.

भारत आज जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे. २०२७ मध्ये भारत पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचा देश बनेल यात कोणतीही शंका नाही.

उत्तरप्रदेशचा विकास दर हा देशातील सर्वोत्तम आहे. आमच्या दहा क्षेत्रांमध्ये औद्योगिक विकास, एमएसएमई, आयटी इलेक्ट्रॉनिक्संचा समावेश आहे. दुसरे म्हणजे, कृषी क्षेत्रात शेतीशी संबंधित सर्व संस्था आहेत. तिसरे सामाजिक क्षेत्र, चौथे शहरी विकास, पाचवे महसूल कर क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, गृह क्षेत्र, वैद्यकीय आरोग्य क्षेत्र, सेवा क्षेत्र आणि पर्यटन यांचा विस्तार केला जात आहे.




विधानसभेत योगी म्हणाले, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात दहा वर्षांत २५ कोटी लोकांना गरीबीच्या रेषेतून वर काढण्याचे काम केले आहे. उत्तरप्रदेश सरकारने दहा वर्षांत सहा कोटी लोकांना गरीबी रेषेतून बाहेर काढले. फक्त महाकुंभ आयोजनाने उत्तरप्रदेशच्या अर्थव्यवस्थेत मोठी वृद्धी होणार आहे. महिलांनाही प्रत्येक विभागात प्रगतीची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. यावेळी समाजवादी पक्षावर टीका करताना मुख्यमंत्री आदित्यनाथ म्हणाले, उत्तरप्रदेश हा नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध राज्य होते. मात्र, समाजवादी पक्षाने त्याला एक आजारी राज्य बनवले. येणाऱ्या काळात उत्तरप्रदेश प्रगतीच्या शिखरावर असेल. ■

# संगमावरील पाणी अल्कलाईन एवढे शुद्ध

## पद्मश्री डॉ. अजय सोनकर यांचा दावा

**काही** दिवसांपूर्वी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने एनजीटीला अहवाल सोपविला होता, महाकुंभमधील संगमावरच्या पाण्यात फेकल कोलिफॉर्म बॅक्टेरिया सापडल्याचे तसेच हे पाणी अंघोळीसाठी किंवा पिण्यासाठी लायक नसल्याचे म्हटले होते. या गंगाजलाच्या शुद्धतेवर प्रश्न उपस्थित केले जात असताना, आता पद्मश्री डॉ. अजय सोनकर यांनी गंगाजलचे परीक्षण केले आहे. यात गंगाजल अल्कलाईन पाण्याएवढे शुद्ध असल्याचा दावा त्यांनी केला.

संगम, अरैलसह पाच घाटांवरील पाण्याच्या नमुन्यांची चाचणी करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. ५७ कोटी लोक आंघोळ करून गेले तरी या पाण्याच्या शुद्धतेत काही फरक पडला नसल्याचे ते म्हणाले. सोनकर यांनी त्यांच्या नैनी येथील लॅबमध्ये हे परीक्षण केले आहे. या पाण्याच्या शुद्धतेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना त्यांनी आपल्या प्रयोगशाळेत येऊन चाचणी करण्याचे आव्हानही दिले.

तीन महिन्यांच्या सतत संशोधनातून गंगेचे पाणी सर्वांत शुद्ध असल्याचे सिद्ध झाले आहे. येथे आंघोळ केल्याने कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ शकत नाही. बॅक्टेरियोफेज (जीवाणू खाणारा) असल्यामुळे गंगेच्या पाण्याची शुद्धता अबाधित राहते, असा दावा त्यांनी केला. पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत १४ तास ठराविक तापमानावर ठेवल्यानंतरही त्यात विषाणूंची वाढ झालेली नाही. गंगाजल केवळ आंघोळीसाठी सुरक्षित नाही, तर त्याच्या संपर्कात आल्याने त्वचेचे आजारही होत नाहीत, असे ते म्हणाले.

कोट्यवधी भाविकांनी स्नान केले असूनही, पाण्यात बॅक्टेरियाची वाढ झाली नाही किंवा पाण्याच्या पीएच पातळीत कोणतीही घट झाली नाही, असे यात दिसले आहे. ■

# केस का कापत नाहीत नागा साधू...!



**महाकुंभादरम्यान** पवित्र गंगा नदीत स्नान केले जाते. या भव्य दिव्य सोहळ्याला विविध देशांतून अनेक लोकं सहभागी झाले आहेत. या सोहळ्यादरम्यान अनेक लोकं एकत्र आले. महाकुंभाचे मुख्य आकर्षण म्हणजे नागा साधू मानले जातात. सर्व भाविकांना नागा साधूंना पाहाण्याची इच्छा असते. त्यांची जीवनशैली आणि त्यांच्या रहस्यमय राहिणीमानाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता असते. अनेकजण नागा साधूंच्या केसांमुळे देखील आकर्षित होतात. परंतु, तुम्हाला माहिती आहे का? नागा साधू कधीच केस कापत नाहीत.

शास्त्रानुसार, केस न कापणे, सांसारिक बंधन, इच्छा आणि भौतिक सुखाचा त्याग करणे हे संन्यास घेण्यासाठी महत्त्वाचे मानले जाते. केस न कापणे हा नागा साधूंच्या तपश्चर्या आणि ध्यानाचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. नागा साधूंना महादेवाचे कट्टर भक्त मानले जाते. नागा साधू महादेवाची कठोर पूजा आणि तपश्चर्या करतात. महादेवाला लाब सडक अशा जटा आहेत. मान्यतेनुसार, त्यांच्या जटांमध्ये गंगा देवी वास करते. नागा साधूंनी त्यांचे आयुष्य संपूर्णपणे महादेवाला समर्पित केले आहे. महादेवाला प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांचा आशीर्वाद मिळविण्यासाठी नागा साधू कधीच केस कापत नाही आणि केस वाढवण्यास पसंती देतात.

**नागा साधू होण्यासाठी तीन टप्पे**

नागा साधूंच्या जटा त्यांच्या शिवभक्तीचे आणि आध्यात्मिक साधनेचे प्रतीक मानले जाते. नागा साधूंच्या मते, केस कापल्यामुळे महादेव नाराज होतात. कोणत्याही नागा साधूने चुकूनही केस कापले, तर त्यांच्यावर महादेव नाराज होतात आणि त्यांची साधना अपूर्ण राहते. नागा साधूंनी केस कापल्यावर तपश्चर्या केली, तर त्यांना त्याचे फळ मिळत नाही आणि त्यांना महादेवाचे आशीर्वाद प्राप्त होत नाही तसेच केलेल्या तपश्चर्येचे फळ मिळत नाही. त्यामुळे ज्या लोकांना प्रश्न पडतो की, नागा साधू कधीच केस का कापत नाही, त्याचे मुख्य कारण म्हणजे महादेवांचा त्यांच्यावर आशीर्वाद राहणार नाही, अशी मान्यता आहे. नागा साधू बनण्याची प्रक्रिया खूप लांब आणि अडचणींनी भरलेली आहे. नागा साधू होण्यासाठी १२ वर्षे लागतात. नागा साधू होण्यासाठी तीन टप्पे पार करावे लागतात. पहिल्या टप्प्यात नागा साधू बनणाऱ्याला महापुरुष, दुसऱ्या टप्प्यात अवधूत आणि तिसऱ्या टप्प्यात दिगंबर मानले जाते. जेव्हा एखादी व्यक्ती नागा साधू बनते, तेव्हा त्याचे केस पहिल्यांदाच कापले जातात. त्यानंतर तो आयुष्यभर केस कापत नाही. ■

## चित्रपट वार्ता

### कंगनाचा इमर्जन्सी येणार ओटीटीवर



**मुंबई :** कंगना राणावतचा इमर्जन्सी हा चित्रपट लवकरच ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. अभिनेत्रीने स्वतः हे जाहीर केले. तिने शुक्रवारी त्याच्या सोशल मीडिया हँडलवर एक स्टोरी शेअर केली, ज्यात तिने या चित्रपटाच्या ओटीटी रिलीजबद्दल माहिती दिली. कंगनाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर इमर्जन्सी चित्रपटाचा आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा फोटो शेअर केला आहे. त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिले, 'इमर्जन्सी' हा चित्रपट १७ मार्च रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होईल. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर आधारित 'आणिबाणी हा चित्रपट १७ जानेवारी रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटात कंगनाने इंदिरा गांधींची भूमिका साकारली आहे. तर, अनुपम खेर, श्रेयस तळपदे, विशाख नायर, महिमा चौधरी, मिलिंद सोमण आणि सतीश कौशिक हे देखील तिच्यासोबत दिसले आहेत. ■

### राजकुमार राव साकारणार दादाची भूमिका



मुंबई : राजकुमार राव लवकरच भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीची भूमिका साकारताना दिसणार आहे. सौरवची भूमिका पडद्यावर कोण साकारणार, याबद्दल बऱ्याच काळापासून चर्चा सुरू होती. आता क्रिकेटपटूने स्वतः घोषणा केली आहे की, राजकुमार राव मोठ्या पडद्यावर त्याची भूमिका साकारणार आहे. पश्चिम बंगालमधील वर्धमान येथे माध्यमांशी बोलताना सौरव गांगुली म्हणाले, मी जे ऐकले आहे त्यानुसार, राजकुमार राव मुख्य भूमिका साकारणार आहे, परंतु तारखेबाबत एक समस्या आहे. त्यामुळे हा बायोपिक थिएटरमध्ये प्रदर्शित होण्यासाठी एक वर्षापेक्षा जास्त वेळ लागेल. या बायोपिक चित्रपटाचे चित्रीकरण सध्या सुरुवातीच्या टप्प्यात आहे. पण, त्याच्या घोषणेनंतर अभिनेत्याचे चाहते खूप उत्साहित आहेत. तथापि, निर्मात्यांनी चित्रपटाबद्दल जास्त माहिती दिलेली नाही. चित्रपटाचे नाव आणि इतर कलाकारांची नावे अद्याप उघड झालेली नाहीत. ■

### वैदेही म्हणते, प्रेम ही गुंतागुंतीची भावना

**मुंबई :** मराठमोळी अभिनेत्री वैदेही परशुरामीचे अनेक चाहते आहेत. तिला मराठीतील कॅटरिना कैफ असेही म्हटले जाते. तिच्या सौफ्लदर्याचे अनेक चाहते आहेत. मात्र, तिच्या स्वतःच्या प्रेमाविषयी फारच वेगळ्या कल्पना आहेत. एका मुलाखतीत ती म्हणाली, प्रेम ही खूपच गुंतागुंतीची भावना आहे. आपण आई आणि वडिलांवर एकाचवेळी प्रेम करतोच की. आईवर प्रेम आहे म्हणून बाबांवर नाही, असे होत नाही. त्यामुळे एकाचवेळी दोन, तीन, चार माणसांवरही प्रेम करतच असतो. मात्र, त्या प्रेमाची तीव्रता व्यक्ती कोण आहे, त्यावर ठरत असते. एका वेळेस दोन मुलांवर प्रेम करावे की नाही, हा मुद्दा नाही, तर ते करणे जमेल का, हा प्रश्न आहे. आपण कोणावर तरी एकसारखे प्रेम करू शकू का, असा प्रश्न तिने विचारला आहे. त्यावर नेटकऱ्यांनीही ती गोफ्लधळल्याचे म्हटले. काहींनी तर आईवडिलांशी तुलना नको, असेही म्हटले. ■



## अग्रलेख...

# दिल्लीची भाग्य'रेखा'

राजधानी दिल्लीतील ऐतिहासिक अशा रामलीला मैदानावर दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री म्हणून भाजपाच्या रेखा गुप्ता यांनी शपथ घेत इतिहास घडवला. दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी कोणाची निवड होते, याकडे दिल्लीतीलच नाही तर संपूर्ण देशातील जनतेचे लक्ष लागले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या नेहमीच्या धक्कातंत्राच्या राजकारणशैलीचा परिचय घडवत दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांची निवड केली. रेखा गुप्ता यांची निवड तशी धक्कादायक म्हणता येणार नाही, कारण पहिल्याच दिवसापासून दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदासाठी ज्या पाच-सहा नावांची चर्चा होती, त्यात रेखा गुप्ता यांचे नाव आघाडीवर होते. त्यामुळे त्यांची मुख्यमंत्रिपदी निवड करत भाजपाने महिला नेतृत्वाने पुन्हा एकदा पक्षातील निष्ठावान आणि तळागाळाच्या कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवला, असे म्हणायला हरकत नाही. रेखा गुप्ता यांचा रामलीला मैदानावरील शपथविधी समारंभही न भूतो न भविष्यति असा झाला. पंतप्रधान मोदी, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह भाजपा तसेच रालोआशासित राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते. यावरून दिल्लीतील विजय हा भाजपासाठी किती महत्त्वपूर्ण आहे, याचा आपण अंदाज करू शकतो. रा. स्व. संघाशी संबंधित असलेल्या घराण्यात पुढे आलेल्या रेखा गुप्ता या आपल्या महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी परिषदेच्या संपर्कात आल्या. विद्यार्थी परिषदेच्या परीसस्पर्शाने त्यांच्या आयुष्याचे खऱ्या अर्थाने सोने झाले. दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाचे सचिव आणि अध्यक्षपद त्यांनी सांभाळले आहे. नंतर अपेक्षेप्रमाणे राजकारणात आलेल्या गुप्ता यांची आक्रमक नेत्या म्हणून ओळख बनली. सलग तीनदा त्या दिल्ली महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आल्या. नगरसेवक म्हणूनही त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली. गुप्ता यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या भाजपासारख्या शिस्तबद्ध पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्या होत्या, त्यामुळे पक्षाने जे दिले ते त्यांनी प्रत्येकवेळी गोड मानून घेतले. मला हे का दिले नाही, मला हे मिळालेच पाहिजे, म्हणून कधी हट्ट धरला नाही. नगरसेवक असताना एकदा महापौरपदासाठी त्यांचे नाव चर्चेत आले, अर्ज भरण्याचीही त्यांनी तयारी केली, पण ऐनवेळी दुसऱ्याच उमेदवाराचे नाव पुढे आले. पण याची कोणतीही नाराजी त्यांनी कधी दर्शवली नाही. माणसाने कर्म करत राहावे फळाची अपेक्षा ठेवू नये, ही गीतेतील शिकवण त्यांनी आपल्या आचरणाने दाखवून दिली. भाजपाच्या कार्यकर्त्यांसाठी सर्वांत पहिले देश, मग पक्ष आणि तिसऱ्या स्थानावर तो स्वतः असतो. हे गुप्ता यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले. विधानसभेच्या सलग दोन निवडणुकांत त्यांचा पराभव झाला, त्यांच्या जागी दुसरा कोणताही नेता असता तर तो यामुळे निराश झाला असता, समाजकारणातून राजकारणातून निवृत्त होण्याचा विचार त्याने केला असता. पण यापैकी गुप्ता यांनी काहीही केले नाही, आपल्या वॉर्डातील नागरिकांची कामे त्या करत होत्या. फळाची अपेक्षा न ठेवता काम करण्याच्या सवयीमुळे मुख्यमंत्रिपदाचे मोठे फळ त्यांना मिळाले, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

रेखा गुप्ता या पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आल्या आणि भाजपा नेतृत्वाने त्यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ टाकत महिला सक्षमीकरणाच्या आपल्या धोरणाचा परिचय करून दिला. देशात भाजपाचे दीड डझन मुख्यमंत्री असताना एकाही महिलेला भाजपाने मुख्यमंत्री म्हणून संधी दिली नाही, म्हणून आरोप करणाऱ्यांची तोंडे भाजपाने दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांची निवड करत बंद केली. महिला आरक्षण विधेयक संसदेत पारित करवून घेणाऱ्या भाजपाची ही कृती आधी केले मग सांगितले अशी आहे. गुप्ता या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री आहेत, तर हरयाणाची पृष्ठभूमी असलेल्या दिल्लीच्या तिसऱ्या मुख्यमंत्री. आतापर्यंत हरयाणा पृष्ठभूमीच्या सुषमा स्वराज आणि अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषवले आहे. विशेष म्हणजे दिल्लीत भाजपा, काँग्रेस आणि आप या तीनही राष्ट्रीय पक्षांनी आतापर्यंत प्रत्येकी एकवेळा दिल्लीला महिला मुख्यमंत्री दिला आहे. भाजपाच्या सुषमा स्वराज या दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हटल्या पाहिजे. काँग्रेसच्या शीला दीक्षित या दुसऱ्या तर आपच्या आतिशी मार्लेना या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री होत्या. पण यातील शीला दीक्षित वगळता सुषमा स्वराज आणि आतिशी या दोन महिला मुख्यमंत्री फार कमी काळासाठी मुख्यमंत्री होत्या. सुषमा स्वराज या फक्त ५२ दिवस तर आतिशी १५२ दिवस मुख्यमंत्रिपदी विराजमान होत्या. फक्त शीला दीक्षित यांनाच प्रदीर्घ म्हणजे १५ वर्षे मुख्यमंत्रिपद भूषवता आले. महिला मुख्यमंत्र्यांचा विचार केला तर दिल्लीत शीला दीक्षित यांनाच आपला ठसा उमटवता आला. दिल्लीच्या जनतेची मने जिंकता आली. दिल्लीचा जो काही विकास झाला, तो त्यांच्याच कार्यकाळात झाला. आपचे नेते अरविंद केजरीवाल यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या जवळपास दहा वर्षांच्या कार्यकाळात दिल्लीचे वाटोळे झाले. केजरीवाल यांच्या कार्यकाळात विकास होईल म्हणून दिल्लीची जनता वाट पाहात असताना त्यांनी दिल्लीची पार वाट लावली. त्यामुळे कुठून केजरीवाल नावाचा भस्मासुर आपण दिल्लीत आणला, असे दिल्लीच्या जनतेला वाटू लागले. आधीच्या दोन विधानसभा निवडणुकांत झालेली चूक दिल्लीच्या जनतेने यावेळी दूर करत भाजपाला सत्तेवर आणले. दिल्ली हे पूर्ण राज्य नाही तसेच धड केंद्रशासित प्रदेशही नाही. देशाची राजधानी असल्यामुळे राज्याचा दर्जा मिळाल्यानंतरही दिल्लीला अतिशय मर्यादित असे अधिकार आहेत. त्यामुळे दिल्लीत मायबाप सरकार हे मुख्यमंत्र्यांचे नाही तर नायब राज्यपालांचे असते. देशाच्या अन्य राज्यात मुख्यमंत्र्यांनी सांगायचे आणि राज्यपालांनी ऐकायचे असे असते. पण दिल्लीत नेमके याच्या उलट आहे, दिल्लीत नायब राज्यपालांनी सांगायचे आणि मुख्यमंत्र्यांनी मम् म्हणायचे असते. सुषमा स्वराज या दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या, पण त्यांना फार कमी वेळ मिळाला. त्यामुळे मुख्यमंत्री म्हणून त्यांना आपला पाहिजे तसा ठसा उमटवता आला नाही. सुषमा स्वराज मुख्यमंत्री झाल्यानंतर दोनच महिन्यात म्हणजे १९९८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला. त्यानंतर भाजपाला दिल्लीची सत्ता मिळवण्यासाठी २७ वर्षे वाट पाहावी लागली. सलग तीन लोकसभा निवडणुकांत दिल्लीतील सातपैकी सातही जागा जिंकणाऱ्या भाजपाला मात्र दिल्लीची विधानसभा हुलकावणी देत होती. त्यामुळे यावेळचा भाजपाचा विजय देवदुर्लभ म्हणावा लागेल. रेखा गुप्ता यांच्यासोबत सहा मंत्र्यांचाही शपथविधी झाला आहे. मुख्यमंत्री म्हणून त्यांच्यासमोर पूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ आहे. त्यामुळे हा कार्यकाळ आव्हानात्मक आहे. दिल्लीच्या जनतेच्या त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. या अपेक्षांची पूर्तता त्यांना टप्प्याटप्प्याने करावी लागणार आहे. मुख्यमंत्री म्हणून आपली तसेच आपल्या मंत्र्यांची कोणतीही कृती आणि विधाने वादग्रस्त ठरणार नाहीत, याची काळजी त्यांना घ्यावी लागणार आहे. प्रशासनावर पकड बसवावी लागेल. कारण त्यांच्यासमोर केजरीवालांचा आम आदमी पक्ष विरोधक आहे. केजरीवाल हे आक्रमक आणि आक्रस्ताळे नेते आहेत. त्यामुळे रेखा गुप्ता यांच्या सरकारला अडचणीत आणण्याची एकही संधी ते सोडणार नाहीत, यात शंका नाही. शपथ घेतल्यानंतर झालेल्या आपल्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत रेखा गुप्ता यांनी काही महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेत आपली चुणूक दाखवून दिली आहे. आतापर्यंत दिल्लीच्या जनतेला लागू नसलेली केंद्र सरकारची आयुष्मान योजना त्यांनी दिल्लीत लागू केली. दिल्ली सरकारच्या भ्रष्ट कारभाराचा पर्दाफाश करणारा सीएजीचा अहवालही विधानसभेत सादर करण्याचा निर्णय घेतला आहे. केजरीवालांची राजकीय रेषा छोटी करताना आपली रेषा गुप्ता यांना मोठी करावी लागणार आहे. दिल्लीच्या जनतेची जीवनरेखा आणि भाग्यरेखा त्यांना व्हावे लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे पाठबळही त्यांची दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून जमेची बाजू राहणार आहे. आतापर्यंत आक्रमक नेता ही रेखा गुप्ता यांची ओळख होती, पण आता त्यांना संयमी, मुत्सद्दी, प्रशासनावर पकड असलेला मुख्यमंत्री अशी आपली प्रतिमा निर्माण करावी लागणार आहे. आपल्या अंगभूत गुणांनी, दूरदृष्टीने आणि संघटनकौशल्याने त्या यात यशस्वी होतील, याबाबत शंका नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# 'ती'ची आत्महत्या आणि त्यांचे बलिदान...

पुण्याच्या इंजिनीयरिंग कॉलेजच्या सहिती रेड्डी नावाच्या २० वर्षीय मुलीने १५ व्या मजल्यावरून उडी मारून जीव दिला. आधी सर्वांना यामागचं कारण माहीत नव्हतं. मात्र तिच्या मृत्यूनंतर तिच्या मैत्रिणीच्या मोबाईलवर ऑडिओ क्लिप आली आणि त्यात मृत्यूचं कारण दडलं होतं. मृत्यूनंतर तिचा मेसेज आल्याने मैत्रिणीला धक्काच बसला. पण तिने ही ऑडिओ क्लिप ऐकली व त्यानुसार ती त्या टेरेसवर पोहोचली आणि क्लिपमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सहितीचा मोबाईल व पासवर्ड तिला सापडला आणि एक नवा खुलासा समोर आला. प्रणव डोंगरे नावाचा तिचा मित्र तिला त्रास देत होता. तिला टॉर्चर करत होता. या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केली. त्यानंतर पोलिसांनी प्रणव डोंगरेला ताब्यात घेतले आहे. आता या प्रकरणात आणखी खुलासे होऊ शकतात. परंतु इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये शिकणारी अवघी २० वर्षांची हिंदू तरुणी हे जग सोडून गेली हा चिंतेचा विषय आहे. २०२२ मध्ये १,७१,००० लोकांनी आत्महत्या केली. आधीच्या वर्षांच्यापेक्षा ४.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोनुसार भारतात १८ ते २९ आणि ३०-४५ वर्षे वयोगटातील लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय आहे. ही खरोखरंच चिंतेची बाब आहे. त्यामुळे हा केवळ सहिती रेड्डीचा प्रश्न नसून आपल्या समाजाचा प्रश्न आहे.

आताच छावा हा चित्रपट प्रदर्शित झाला. छत्रपती संभाजी महाराजांनी देव, देश आणि धर्मासाठी बलिदान दिलं, हे आता संपूर्ण भारताला कळलेलं आहे. इथे कुणी प्रश्न उपस्थित करू शकेल की याआधी माहीत नव्हतं का? तर औरंगजेबाच्या परंपरेतल्या काही लोकांनी इतिहास विकृत पद्धतीने मांडला आहे. दुसरी गोष्ट आपलं दुर्दैव असं की आपण मराठी माणूस म्हणून एकमेकांशी जातीवरून इतके भांडत बसलो की आपला समृद्ध इतिहास सांगण्यात आपण कमी पडलो. कुणी कितीही म्हटलं की चित्रपट हा इतिहास नसतो, पण तरीही चित्रपटातून होणारा परिणाम दीर्घकाळ टिकून राहणारा असतो. कलेची ताकद सावरकरांनी ओळखली होती आणि म्हणूनच त्यांनी नाट्य लिखाणातून आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवले होते. लोकांच्या प्रतिक्रिया तुम्ही वाचल्या किंवा ऐकल्या असतील तर तुम्हाला कळेल की महाराजांचा पराक्रम पाहून लोक थक्क झाले आहेत. महाराज जगले देव, देश व धर्मासाठी आणि बलिदान सुद्धा याच कारणासाठी दिलं. स्वा. सावरकरांनी आत्महत्या आणि आत्मार्पण नावाचा एक निबंध लिहिला आहे. तरुणांनी हा निबंध अवश्य वाचला पाहिजे. जगण्यासाठी एक व्यापक ध्येय



असलं पाहिजे आणि माझ्या मते ''देव, देश आणि धर्म'' यापेक्षा व्यापक भौतिक ध्येय दुसरे असू शकत नाहीत. हिंदू धर्मातील मोक्ष, स्व-चा शोध हे ध्येय आता तितके प्रचलित राहिले नाहीत.

विस्तारवादी पंथाचे लोक पंथासाठी जगतात, पंथासाठी मरतात आणि पंथासाठी मारतात. उलट आपण तर सनातन वैदिक हिंदू धर्माचे पाईक आहोत. आपण विस्तारवादी नाही. उलट आपण समरसतावादी आहोत. प्रचंड अभिमानास्पद असा आपला इतिहास आहे, आपला सांस्कृतिक वारसा सर्वांत प्राचीन आहे, आपली परंपरा अद्‌भुत आहे, आपली आध्यात्मिक बैठक जगाला हेवा वाटेल अशी आहे. इतकं सारं आपल्याकडे असताना आपण इतके निराश का आहोत? धक्का तेव्हा बसतो जेव्हा ज्यांच्या पाया पडावे, ज्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावे असे लोक आत्महत्या करतात. इतका टोकाचा निर्णय घ्यावासा का वाटतो? त्या २० वर्षांच्या मुलीने तिची समस्या आई-वडिलांना सांगितली असती तर त्यांनी ती समस्या सोडवली नसती का? वडील आपल्या मुलीसाठी काहीही करू शकतात. मग प्रश्न पडतो की मुलं आणि पालक यांच्यामधील संवाद हरवत चालला आहे का? मुलांना आपल्या पालकांवर विश्वास राहिलेला नाही का? ''तू काळजी करू नकोस, मी आहे'' असं म्हणणारं त्यांच्या आयुष्यात कुणीच नसतं का? कुणाच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्यापूर्वी कायद्याचा आसरा घ्यावासा वाटत नाही का? जर तरुणीने पोलिसात तक्रार केली असती व पोलिसांनी त्यांच्या पद्धतीने समज दिली असती तर कदाचित त्या तरुणीचा जीव वाचला असता. पण तिला पोलिसात तक्रार कराविशी वाटली नाही. कारण कदाचित तिचा कायद्यावरही विश्वास नसेल. त्यामुळे जेव्हा अशा प्रकारची एक आत्महत्या घडते तेव्हा असे अनेक प्रश्न निर्माण होतात. आपण मोबाईलवर एक टॅप करून काहीही जाणून घेऊ शकतो इतके आपण प्रगत झालेलो असताना समाज म्हणून आपण मागास होत आहोत का?

मी या विषयावर एक पुस्तक लिहिलं आहे. ''सावरकर - सकारात्मक विचारांची गुरुकिल्ली.'' स्वा. सावरकरांचा झालेला छळ, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केलेलं कार्य हे तरुणांसमोर येणं खूप गरजेचं आहे. त्यांच्या आयुष्यात असे अनेक प्रसंग होते, जे आत्महत्येस प्रवृत्त करतील. परंतु त्यांनी आत्महत्येचा विचार झुगारून जीवनाचा स्वीकार केला आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. त्याही पलीकडे जाऊन अस्पृश्य उद्धार, सामाजिक सुधारणा, राजकारण अशा अनेक पातळींवर त्यांनी कामे केली. त्या काळी अंदमान हे वेड लागण्याचं ठिकाण होतं. पण सावरकर गेले आणि ते मानसोपचाराचं ठिकाण झालं. कसं ते या पुस्तकात तुम्हाला वाचता येईल. सांगायचं तात्पर्य असं की तुमच्यासमोर व्यापक ध्येय असेल तर तुम्ही आत्महत्येच्या विचारांवर नियंत्रण मिळवू शकता. देश स्वातंत्र्य हे सावरकरांसमोरील व्यापक ध्येय होतं. म्हणजेच ''देव, देश आणि धर्म'' हे व्यापक ध्येय समोर ठेवल्यावर आपल्या आयुष्याला एक वेगळी दिशा मिळते. स्वतःचं कल्याण, यशस्वी होणे - हे ध्येय असायलाच हवे. पण आपली प्रत्येक कृती ही देव, देश आणि धर्माला समर्पित असायला हवी. उदा. आपण डॉक्टर झालो तर आपलं भलं होईलंच. पैसे मिळतीलच. पण त्याचबरोबर देशबांधवांना रोगमुक्त करून देशाचं सुद्धा भलं करता येईल. हे व्यापक ध्येय आहे. वाचकहो, भारतीय समाजातील आत्महत्येचं वाढतं प्रमाण चिंताजनक आहे. आपण जर मुलांना देव, देश आणि धर्माचं बाळकडू पाजून व्यापक ध्येय त्यांना दिलं तर कदाचित चित्र बदललेलं दिसेल. माझ्या वर नमू केलेल्या पुस्तकात ''आत्महत्या करण्यापूर्वी सावरकर चरित्र वाचा'' या नावाचा एक अध्याय आहे. महापुरुषांच्या चरित्रातून आपल्याला व्यापक ध्येय सापडेल आणि जगण्याची इच्छा बळावेल. तुम्हाला जगण्याचे बळ मिळो, ही विश्वेश्वर चरणी प्रार्थना...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय पांढरीपांडे**

# सतर्क राहा!

सोळावे वरीस धोक्याचं असं आधी म्हटलं जायचं. तसे एक गाणे देखील होते. आता ही धोक्याच्या वयाची मर्यादा सहा सात वर्षांनी खाली घसरली आहे की काय अशी परिस्थिती दिसते. शाळेत जाणारी सहा सात वर्षांची मुलं देखील हातात मोबाईल आल्यापासून, सोशल मीडिया अन् विविध ॲपला नादावल्यापासून त्यांचे तिशीतले आई-वडील त्रस्त आहेत. हा संसर्गजन्य रोग एका गावापुरता, शहरापुरता, राज्यापुरता मर्यादित राहिला नाही. तो देशभर व्हायरल झाला आहे.

आता लहान, तरुण मुलांना ना आई-वडिलांचा धाक राहिला, ना शाळेतल्या शिक्षकाचा. पूर्वी शाळेतल्या शिक्षकाचा दरारा होता. वेळ पडल्यास कान उपटणे, छडीचा प्रसाद देणे हा अधिकार पालकांनीच त्यांना दिला होता. आता लाखो रुपयांची फी आकारणाऱ्या शाळेत शिस्तीची व्याख्याच बदलली आहे. शिक्षक, प्राचार्य कुणाचेच या मुलांवर नियंत्रण राहिले नाही. आपल्या कामात व्यस्त असलेल्या पालकांनाही शाळेतल्या शिस्तीची फिकीर नाही. उलट आज जमाना बदलला आहे हे पालुपद उगाळत ते शिक्षकांना, प्राचार्यांना दुर्लक्ष करायला सांगताहेत. दोन्ही कमावत्या पालकांच्या हातात लाखोंचे पॅकेज खेळत असल्याने महागड्या बर्थ डे पार्टीज, विमानाने प्रवास अन् आलिशान रिसॉर्टयुक्त हॉलिडेजची सवय या मुलांना लहानपणातच झाली आहे. अर्थात या गोष्टी शहरी वातावरणापुरत्या मर्यादित असल्या तरी तारुण्यसुलभ आकर्षणापोटी जन्माला येणाऱ्या भानगडी लहान गावात देखील कॉमन झाल्या आहेत. नवे तंत्रज्ञान फायद्याचे, सोयीचे असले तरी ज्या चक्रवेगाने त्यातील कन्टेन्ट, ॲप, व्हिडीओ, गेम्स वाढताहेत, अन्? लहान पोरांना नादी लावत आहेत, ते बघता आता कुठेतरी यावर नियंत्रण हवे हा विचार पुढे यायला लागला आहे. कारण अवती भवतीचे वातावरण इतक्या वेगाने बदलते आहे की पालकांना देखील कुठे कसे नियंत्रण ठेवावे हे कळेनासे झाले आहे. विचारस्वातंत्र्य, व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य, खाण्यापिण्याचे, कपडे घालण्याचे फॅशन स्वातंत्र्य प्रत्येकाला हवे हा आधुनिक विचार एकीकडे बळावत चालला असताना, दुसरीकडे आपली जुनी परंपरा, संस्कार, देव, धर्माच्या मर्यादा याचाही बोलबाला वाढतो आहे. पण मोबाईल, इंटरनेट, सोशल प्लॅटफॉर्म या सुखसोयींच्या तंत्रज्ञानाचा अजगर विळखा आता इतका घट्ट आवळला गेलाय की त्यातून कुणाचीच सुटका नाही. आता मुलांना पॉकेट मनी नव्हे तर थेट क्रेडिट-डेबिट कार्ड, ऑनलाईन पेमेंटची सवय झाली आहे. महागडे ड्रेसेस, शूज, गिफ्ट्स हे सवयीचे झाले आहेत. लहान मुलांच्या तोंडी घाणेरड्या शिव्या आल्या आहेत. डेटिंग, चॅटिंग, अफेअर्स आता आठ दहा वर्षांच्या वयात सुरू होतात. व्हॉट्स ॲप मेसेजेस, व्हिडीओ शेअरिंग हे खालच्या पातळीवर आले आहे. कशाचाच कुठे ताळतंत्र राहिला नाही. मुलांना पालक बोलले, रागावले तर ती चक्क उलट उत्तरे देताहेत. रागावून आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलण्याच्या घटना घडताहेत. एकूणच परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाताना दिसते आहे. हा पद्धतशीरपणे रचलेला सापळा आहे का? किंवा आजच्या राजकीय भाषेत हे नवे नॅरेटिव्ह आहे का कुठल्या बाह्य शक्तीचे किंवा अदृश्य हाताचे? तरुण पिढी बिघडली, शिक्षणापासून विचलित झाली की राष्ट्र डळमळते. आपली संस्कृती पोखरली जाते. फार पूर्वी मोगलांनी हेच केले. ब्रिटिशांनी देखील तोच कित्ता गिरवला. आता आपण नव्या दिशेने, नव्या जोमाने वाटचाल सुरू केली आहे. नव्या उद्दिष्टांच्या दिशेने झेप घेतली आहे. पण हे नवे तंत्रज्ञान वरदान ठरण्याऐवजी शाप ठरू पाहते आहे. यामुळे आपले जीवन सुसह्य भलेही झाले असेल. पण आपला आनंद हिरावून घेतला गेला आहे. आपण इमोशनकडून इन्फॉर्मेशनकडे वाटचाल सुरू केली तेव्हाच या धोक्याच्या वळणाला सुरुवात झाली. गेल्या काही दशकांचा नीट अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल. भावनिक नात्याला घरघर लागली. कुटुंबातला लळा जिव्हाळा संपला. कोणे एके काळी जी घरे भरलेली होती ती विभक्त कुटुंब पद्धतीत रोडावली. स्वार्थ बोकाळला. दोन पिढ्यांतले अंतर वाढले. आजी-आजोबांच्या नशिबी एकटेपण आले. तरुण पिढी एकतर परदेशात स्थिरावली किंवा याच देशात आई- वडिलांपासून विलग होत लाखोंच्या वार्षिक पॅकेजच्या नादी लागून आपल्या नव्या मृगजळातील महालात रममाण झालीत. हा बदल सर्वांनीच गुण्यागोविंदाने स्वीकारला. कारण दुसरा पर्यायच उरला नव्हता. असला तरी तो शोधायची गरज भासली नाही कुणाला. आपल्या कुटुंबव्यवस्थेचा तालत बिघडला. आता तर कृत्रिम बुद्धिमत्ता काय, मशीन लर्निंग काय अशी नवी भुते आपल्या मानगुटीवर बसायला तत्पर झाली आहेत. माणसाला अधिकाधिक आळशी, निरुपयोगी करण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू आहेत. आपली भावना, विचारशक्ती, विवेक जर या तंत्राने आपल्याकडे गहाण ठेवून घेतला तर आपले काय होईल याचा आपण वेळीच विचार केलेला बरा.

७६५९०८४५५५

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# असा धक्का देऊ की...

'मच्छर चावला तर, खाजवायचं कसं अशी परिस्थिती माझी होती', अशी कबुली स्वतः देणारे आणि दसरा मेळाव्याप्रसंगी खाली बसल्यावर पुन्हा उभं राहायला दोन लोकं लागणारे, गणपतीची आरती करताना आरतीचं वजन हाताला न झेपणाऱ्या उधोजींनी यावेळी 'असा धक्का देऊ की ते पुन्हा उठणारच नाहीत' असा इशारा दिलाय्? म्हणे... कुठे धक्का देणार तर, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत!.. गद्दारांना धडा शिकवू, गद्दारांना गाडा... सूड सूड सूड आणि सूड उगवण्याच्या प्रचंड यशानंतर 'आता असा धक्का देऊ की...' हा एकपात्री हास्यप्रयोग घेऊन येत आहेत, आपले हास्यसम्राट उद्धव ठाकरे साहेब...

आजवर वाघ बनून फिरणारे यावेळी भिजलेल्या कोकरासारखे झालेले दिसत आहेत. यापेक्षा वस्तुस्थितिदर्शक वेगळं वर्णन उद्धव ठाकरेंच्या परिस्थितीत दुसरं काही होऊ शकत नाही. एकेकाळी राज्यात डरकाळी फोडणाऱ्या वाघाचं अस्तित्व वाचविण्याची म्हणजेच आता राज्यात 'वाघ वाचवा मोहीम' उद्धव ठाकरेंनी हाती घेतली आहे. करणार तरी काय साहेबांवर परिस्थितीच तशी ओढवली आहे. आता सोबत असणारा नेता 'पलक झपकतेही' असे हिंदीत म्हणतात ना तसा सेकंदात एकनाथ शिंदेंसोबत दिसतो. आणि वर्षानुवर्षे सोबत असणारा, सेकंदापूर्वी दुसरीकडे गेला की तोच प्रामाणिक नेता, कार्यकर्ता लगेच गद्दारही ठरतो. हे उद्धवजींच्या नेतृत्वाचं विशेष आहे, बरं का!... म्हणजे वर्षोन्‌वर्षे पक्षात खपविलेला नेता अचानक पक्ष सोडून जातो याचे श्रेय उद्धवजींच्या नेतृत्वालाच जाते. हे श्रेय कोणीही त्यांच्याकडून हिरावून घेऊ शकत नाही.

आता ५४ आमदारांपैकी ४० गद्दार, १८ खासदारांपैकी ११ गद्दार, आता नेते, उपनेते, प्रवक्ते, मुंबईचे शाखा प्रमुख, जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, नगरसेवक, अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, अध्यक्ष, पंचायत समिती सदस्य, सभापती, नगर पंचायत सदस्य, अध्यक्ष, ग्राम पंचायत सदस्य, सरपंच अशी सगळी मोठ्या संख्येने सोडून गेलेली नेते मंडळी सगळी गद्दार ठरविली गेली. आणि यातली महत्त्वाची बाब म्हणजे या सगळ्या जुन्या मंडळींना बाळासाहेबांनी घडविले होते. आता बाळासाहेबांचे पुत्र या बाळासाहेबांच्या शिलेदारांना गद्दारीचं प्रमाणपत्र वाटप करत फिरत आहेत. त्यामुळे प्रश्न असे निर्माण होतात की, बाळासाहेबांनी शिवसैनिक नव्हे तर, गद्दार घडविले का? बाळासाहेबांच्या नेतृत्वावर उद्धवजींना शंका उपस्थित करायची आहे का?, बाळासाहेबांना माणसांची परख नव्हती, असे उद्धवजींना सुचवायचे आहे का?, या प्रश्नांची उत्तरं



आधी उद्धव साहेबांनी शिवसैनिकांना आणि महाराष्ट्राला देण्याची गरज आहे. यावेळी बाळासाहेबांचं सोडा अधिक खोलात जाऊन विचार केला तर, मुळात गद्दार घडविण्याची फॅक्टरीच उद्धवजी चालवतात का? असा प्रश्न देखील निर्माण होतो. त्यामुळे उद्धवजी ॲण्ड कंपनीने 'ह्याला गाड त्याला गाड'चे राजकारण करण्यापेक्षा गेल्या चार साडेचार वर्षांमध्ये घरी बसून अर्थात अख्खं राज्य घरी बसून चालविणाऱ्यांना वेगळ्याने सांगण्याची गरज नाही, कारण ते घरी बसून दरबारी राजकारण करण्यात पारंगतच आहेत. तरीदेखील घरी बसून शांतपणे आत्मपरीक्षण केले असते तर, त्यांना 'वाघ वाचवा मोहीम' राबवावी लागली नसती. आणि आजवर मान खाली घालून बसणारे छाती फुगवून उघड माथ्याने तुमच्या छाताडावर पाय ठेवून, दणक्यात फिरताना दिसले नसते. महत्त्वाची, चिंतेची गंभीर बाब म्हणजे काल-परवापर्यंत एकनाथ शिंदेंना पाण्यात पाहणाऱ्या, नोकर समजणाऱ्या उद्धव ठाकरेंना शिंदेंच्या 'ऑपरेशन टायगर'ची भीती वाटली नसती. पण आजची परिस्थिती तर उद्धवजींसाठी भीतिदायकच आहे. अर्थात त्यांच्याच शब्दात सांगायचं झाल्यास त्यांच्या नोकरानेच त्यांची झोप उडवून ठेवली आहे. ही 'शिवसेना' आहे की, 'शिव्यासेना' म्हणत, वाघाची पार शेळी करून ठेवली आहे. मुळात वाघाची शेळी काय शिंदे तर यांना वाघच मानायला तयार नाहीत. वाघाची झूल ओढून वाघ असल्याचा बनाव करणारे डोंबारी असल्याचं सांगत यांना हिणवताना ते दिसतात.

यावेळी उद्धव ठाकरेंच्या लोकसभा आणि विधानसभेतील शिलेदारांना केंद्रात आणि राज्यात २०२९ पर्यंत विरोधातच बसायचं आहे. त्यामुळे उरलेल्यांना अजून पाच वर्षे सांभाळणे उद्धव ठाकरेंसाठी मोठे आव्हान आहे. त्यातही सोबत असलेल्यांचा संयम कधी तुटेल याचीही काही शाश्वती नाही. कुणीही सत्तेच्या बाजूने राहणे पसंत करतात. त्यातून स्वतःची आणि स्वतःच्या मतदारसंघातील चार कामं होणे त्यांना अपेक्षित असते. त्यामुळे उद्धव यांचे शिलेदार किती दिवस त्यांच्या भूलथापांना बळी पडून विरोधात राहणे पसंत करतात, याची कोणीही हमी देऊ शकत नाही. ठाकरेंचे आर्थिक स्रोत घटले आहेत. उत्पन्नाचा मुख्य स्रोत बृहन्मुंबई महानगर पालिका होती. ती आज यांच्या ताब्यात नाही आणि पुढे येईल याची खात्री नाही. हे सगळं ठाकरेंसोबत असलेल्या आत्ताच्या शिलेदारांना चांगल्याने कळून चुकलं आहे. त्यामुळे त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची, भवितव्याची चिंता लागली आहे. यावेळी नऊ खासदारांमध्ये केवळ अरविंद सावंत आणि अनिल देसाई हे दोघेच सोबत राहतील अशी खात्री स्वतः ठाकरेंना आहे. दुसरीकडे २० आमदारांचा विचार केलाच तर, आदित्य ठाकरे, वरुण सरदेसाई हे दोन घरचे आणि अजय चौधरी या तीन नावांच्या पलीकडे कोणावरही विश्वास आजघडीला नाही. आता संघटनात्मक बांधणीचा घाट ठाकरेंनी घातलेला दिसत आहे. ती त्यांची अपरिहार्यता आहे. कारण आजघडीला त्यांच्याकडे संघटनाच उरलेली नाही. पण तेथेही ठाकरेंनी गडबड केल्याचं दिसतं. पक्ष कार्यकर्त्यांमध्ये सर्वमान्य नसलेले, किंबहुना नाराजी असलेल्या संजय राऊतांकडे याची जबाबदारी देण्यात आली आहे. ज्यांनी पक्षाची वाट लावली त्याच व्यक्तीकडे पुन्हा संघटन बांधणीची जबाबदारी देणे म्हणजे चोराच्या हातात चावी देण्यासारखं असल्याच्या प्रतिक्रिया कार्यकर्त्यांकडून येत आहेत. ठाकरेंना स्वतःची, पक्षाची एवढी वाताहत होऊनही घरी बसून राजकारण करण्याचा मोह काही आवरता येत नसल्याचे दिसते. बरं येथे 'बाप से बेटा सवाई' आहे. बापाला नसेल जमत तर, मुलाने पुढाकार घ्यावा तर त्यालाही नाईट लाईफपासून फुरसत नाही. अशा परिस्थितीत हातापायात जोर नसताना, मैदानात येऊन लढण्याची कुवत नसताना, कोणाच्या जिवावर धक्का देण्याची टिमकी हे लोक वाजवतात, याचेच आश्चर्य वाटते. धक्के खाऊन खाऊन मी धक्कापुरुष झालोय्, म्हणणारे उद्धव ठाकरे आज कोणाला धक्का देण्याच्या परिस्थितीत नाहीत. मात्र, आजही कार्यशैलीत सुधारणा केली नाही तर, शिंदे अजून मोठे धक्के देतील यात शंका नाही.

९२७०३३३८८६

### तपासणी तर सर्व शासकीय कामांची व्हायला हवी

निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आणली आणि महिलांची मतदानाची टक्केवारी सुद्धा वाढली गेली. त्यानंतर सरकारी तिजोरी भर पडताच याचा परिणाम मात्र सामान्य माणसाच्या खिशावर होतो आहे. त्यानंतर अत्यावश्यक बाबींमध्ये भाववाढ झाली, एसटी तिकीट दरात वाढ झाली, सरकारी कर्मचारी वेतनात वाढ झाली, अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडत आहेत. यात मरण मात्र सामान्य माणूस, शेतकरी, कामगार वर्गाचे होते आहे. महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. मात्र त्यातही बोगस लाभार्थींवर आळा घालण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. कागदपत्रांची छाननी, तपासणी केली जाते आहे. केवळ दीड हजार प्रति लाभार्थी याप्रमाणे यात लाभ मिळत असला तर तपासणी केली जाते ही बाब विचार करायला लावणारी आहे. एकीकडे दिवसाढवळ्या ठिकठिकाणी अवैधरीत्या उत्खनन, नैसर्गिक साधनसंपत्तीवर अनेकांनी आपली घरे भरली आहेत, तर दुसरीकडे बोगस कागदपत्रांवर नोकरी मिळवणारे हजारो शासकीय कर्मचारी ऐशोआरामात आयुष्य काढत आहेत. तेव्हा यांच्या शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्रांची सखोल तपासणी का केली जात नाही असा प्रश्न पडतो. बोगस मतदानावर आळा घातला जात नाही. प्रत्येक क्षेत्रात बोगस कागदपत्रे दाखवून कोटींचा निधी हडप होताना दिसतो. आवास योजनेत बोगस लाभार्थी दिसतात. घरात सरकारी नोकरदार असूनही दारिद्र्य रेषेखालील यादीत अनेकांची नावे दिसतात. याबाबत सरकार गांभीर्य का दाखवत नाही. कागदपत्रांची तपासणी तर अशांची करायला हवी. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून कोटींचा निधी दरवर्षी खर्च होताना दिसतो. मात्र यात गुणवत्तापूर्ण विकासकामे होतांना दिसत नाही. उलट प्रामाणिकपणे कागदपत्रांची छाननी व कामांची पाहणी केल्यास भ्रष्टाचार होत असल्याचेही चित्र अनेक ठिकाणी नक्कीच दिसून येईल यात शंका नाही. शासकीय निधी हा जनतेच्याच खिशातला निधी असतो हे सत्य आहे. पण याचा योग्य विनियोग होतो की नाही याची शहानिशा सरकारने सुद्धा करायला हवी. राज्यातील बोगस लाभार्थींवर आळा घालण्यासाठी तसेच वारंवार विविध योजनांचा लाभ घेणाऱ्यांचीही कागदपत्रांची तपासणी होणे अत्यावश्यक आहे.

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

## वाचक पत्रे

### हाव आणि हेवा

मानवी मन विविध भावनांची एक गुंतवण आहे. काही भावना व्यक्तीच्या जीवनात आनंद फुलवतात तर काही भावना व्यक्तीचे जीवन प्रदूषित करीत जातात. हाव आणि हेवा या मानवी मनातल्या अत्यंत प्रदूषित अशा भावना आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करणे आवश्यक असते परंतु इच्छा आणि गरज यामधील फरक ज्यांना कळतो त्यांचे जीवन अधिक आनंदमय होऊ शकते. परंतु इच्छा आणि गरज यामधील भेद ज्यांना कळत नाही आणि प्रत्येक इच्छेला गरज समजून जी माणसे ती गरज पूर्ण करण्याकरिता सतत धावपळ करीत असतात. त्यांच्या जीवनात सतत अस्वस्थता आणि अशांती असते. अशा व्यक्तीच्या मनात हाव आणि हेवा या प्रदूषित भावना सतत घर करून बसलेल्या असतात. प्रत्येक इच्छा ही गरज समजून ते ती इच्छा पूर्ण करण्याकरिता सतत पैसा कमविण्याचा प्रयत्न करीत असतात सुख आणि चैनीची गरज त्यांना सतत मागे फिरवत असतं ते सदैव अस्वस्थ असतात आणि त्यासाठी गरज पडल्यास अवैध मार्गाचा अवलंब करून वेड्यासारखे पैशाच्या मागे धावत असतात. श्रीमंत लोकांचे अनुकरण करून ते अधिक श्रीमंत होण्याचा, प्रभावशाली होण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यासाठी वेळप्रसंगी तुरुंगवास भोगण्यास मागे पुढे पाहत नाही. आपल्यापेक्षा श्रीमंत आणि लोकप्रिय प्रभावी माणसे जे असतील त्यांचा ते हेवा करतात. हाव आणि हेवा यामुळे अशा व्यक्तींचे जीवन अधिक दुःखमय आणि प्रदूषित होत जाते. संत रामदास स्वामींचे मनाचे श्लोक त्यांना आवर घालू शकत नाही किंवा तुरुंगाची हवा त्यांची हाव कमी करू शकत नाही.

अशा व्यक्तींवर समाजातील लोक आवर घालू शकतात. वेळप्रसंगी त्यांच्यावर बहिष्कार टाकून त्यांना योग्य जागा दाखवू शकतात. अशा लोकांच्या मागे केवळ समाजच नसतो तर त्यांच्या कुटुंबातील लोक सुद्धा त्यांचे कौतुक करत असतात. त्यामुळे ते अधिकाधिक हावरट होत जातात. वेळप्रसंगी देशाचा सुद्धा हेवा हे करू लागतात. कुटुंबातील लोकांनी अशा लोभी आणि हावरट लोकांवर नजर ठेवून त्यांना योग्य मार्ग दाखविला पाहिजे. असे केल्यास समाजातील वातावरण अधिक सुखदायक होईल. चांगल्या मूल्यांची जोपासना होईल आणि येणाऱ्या पिढीला योग्य वळण लागेल.

**शशिकांत पांडे**/नागपूर

### शाळा, महाविद्यालयांत छावा चित्रपट दाखवा

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा हा दर्जेदार चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा हा चित्रपट सर्वार्थाने दर्जेदार आहे. यातील कलाकारांचा अभिनय दर्जेदार आहे. चित्रीकरण सुंदर आहे. या चित्रपटातून छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील अनेक अपरिचित प्रसंगांची माहिती मिळते. संभाजी महाराजांचे शौर्य, त्यांचा राज्यकारभार, या गुणांचा उलगडा होतो. छत्रपती संभाजी महाराजांना स्वराज्य रक्षक का म्हणतात? हे हा चित्रपट पाहिल्यावर समजते. स्वराज्य रक्षणासाठी त्यांनी स्वतःचे बलिदान दिले. संभाजी राजांच्या बलिदानाची महती विद्यार्थ्यांना कळावी यासाठी हा चित्रपट शाळा व महाविद्यालयांत मोफत दाखवण्यात यावा.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शहरातील विविध शाळांमध्ये शिवजयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

**शहरातील विविध शाळा, संस्था व महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्राचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराजांच्या जीवनावरील पोवाडे, गायन अन् भाषणातून शिवरायांना अभिवादन करुन शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.**



**शिवजयंतीनिमित्त जय भारत प्राथमिक शाळेत शाळेतील शिवकन्या यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.**

### जय भारत प्राथमिक शाळा

येथील जय भारत प्राथमिक शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बन्सीसिंग मन्सावाले होते. तर यावेळी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले, सचिव दीपक फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी तसेच शिक्षकवृंद व पालक वर्ग उपस्थित होते. प्रमुख अतिथी व शाळेतील शिवकन्या यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विक्रांत भैरे, प्रतीक्षा म्हेत्रे, कार्तिक कुमार, नागेश दीड्डी, पूजा आरगोळू, संस्कृती भंडारे आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक सूर्यवंशी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास थोडक्यात विद्यार्थ्यांसमोर मांडला व विद्यार्थ्यांना प्रेरित केले. सूत्रसंचालन रेश्मा म्हेत्रे यांनी; प्रास्ताविक घाटे यांनी तर आभार कविता लेंगरे यांनी मानले.

### लोकमंगल कृषी, जैवतंत्रज्ञान महाविद्यालय

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. सागर महाजन हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात करण्यात आले. याप्रसंगी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. अंकिता पवार तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदवी स्वराज्य स्थापना, शिवजयंतीचे महत्व आणि आजच्या पिढीची जबाबदारी, शिवछत्रपतींची स्वराज्य संकल्पना व आजचा भारत, शिवरायांचे विचार तरूणांसाठी प्रेरणा आदी विषयांवर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

### सिद्रामप्पा हत्तुरे शाळा

श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक सचिन जाधव, सुधाकर कामशेट्टी, स्वराली यादव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावरील गोष्टी, पोवाडा, गायन व भाषणे केली. सूत्रसंचालन अक्षता करवीर, प्रास्ताविक जुलेखा मुजावर, आभार सर्वेश करजोळे यांनी मानले.



## मधला मारुती शिवजन्मोत्सव मंडळ

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

मधला मारुती शिवजन्मोत्सव मंडळातर्फे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मंडळाचे संस्थापक प्रतिक लिगाडे तसेच उद्योजक सागर गायकवाड यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची पूजा करण्यात आली.

पोवाडा सादर करण्यात आला त्यानंतर लाडू वाटप करण्यात आले. यावेळी मंडळाचे आधारस्तंभ ॲड. उमेश घंटे, ॲड. प्रणित जाधव, दौलत होळे, शुभम आठवले, संतोष कदम, हरीश लांडगे, प्रणित सातपुते, ओंकार सातपुते, वैभव बोरगावकर, सुबोध शेजवाल, योगेश हत्तुरे, समर्थ वाले, स्वप्नील वाबळे उपस्थित होते.

### भारत मराठी विद्यालय

मजरेवाडी परिसरातील भारत मराठी विद्यालयात शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.के. सरसंबे होते. टी.टी.वडावराव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कावेरी पंजलोर, तमन्ना शेख, अब्दुल हिरापुरे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन एन.झेड. सय्यद यांनी केले तर आभार एस.एम. शेख यांनी मानले.

### विद्यानिकेतन हायस्कूल



विद्यानिकेतन हायस्कूल व हिंगुलांबिका प्राथमिक शाळा व बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेत शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रतिक बासुतकर, न्हिशा हंचाटे, चैत्रा संभारम, नंदिनी सिडगिद्यी, अक्षया मादगुंडी, रोहित गोटीपामूल, प्रशिक्ष गायकवाड, अर्णव आरकेल, ईश्वरी हंचाटे, सोमेश महिंद्रकर, श्रावणी हंचाटे, मीनल कोंकत्ती यांनी भाषणे सादर केली. यावेळी सहशिक्षक नितीन मुसळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब ढगे, मुख्याध्यापक गोपीनाथ नवले उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष बनसोडे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक शंकर गिरी यांनी मानले.

### राजर्षि शाहू विद्यालय

राजर्षि शाहू मराठी विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका चंद्रकला गायकवाड होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषण, पोवाड्यातून शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली. यावेळी मनिषा झेंडगे, प्रतिभा गायकवाड, अभिजीत गुंजले, इरय्या स्वामी, साक्षी जाधव, प्रियंका गायकवाड, सोनाली माने उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन डोईफोडे, आभार विश्वासराव घंटेनवरु यांनी मानले.

### ममता मूकबधिर विद्यालय

ममता मूकबधिर विद्यालय व राजीवगांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाईंड यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा कल्पना दरगड उपस्थित होते. नॅब संस्थेचे सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सौरभ शिंगाडे यांनी केले. सूत्रसंचालन अन्नपूर्णा साखरे, आभार एम.एस.जोशी यांनी मानले.

### मोहिते-पाटील विद्यालय, केगांव

स.म. शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय, केगांव येथे शिवजयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे सचिव रणजित पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शिक्षक आबा कोष्टी, शिरीष पाटील व विद्यार्थी निरंजन कसबे यांनी मनोगत व्यक्त केले.

### भारत उर्दू विद्यालय

मजरेवाडी येथील भारत उर्दू विद्यालयात शिवजयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शाहीन अत्तार होत्या. प्रास्ताविक शिक्षक रिजवान शेख यांनी केले. यावेळी मुनजरीन मुल्ला, अब्दिुल मुल्ला, आलिया हिरापुरे, जिया इनामदार या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शहेनाज सय्यद यांनी केले तर आभार समीना शेख यांनी मानले.

## नेताजी प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ फेब्रुवारी-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार होते. व्यासपीठावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, राजराजेश्वरी प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते. प्रथम वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविकेतून ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र मुलगे यांनी केले. यावेळी गंगोत्री चिप्पा, लक्ष्मी विटकर, क्षितिजा जमादार, स्वराली रॅका, प्रतीक्षा कोळी, शितल बाबा, राकेश गुत्तीकोंड, श्रीशैल निंबर्गी, यशोदा पुजारी,पूर्वा रेके या विद्यार्थ्यांनी मनोगतातून शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी ज्येष्ठ शिक्षक काशिनाथ माळगोंडे, राजकुमार मरगुरे, बसवराज तेग्गेळी, विजयालक्ष्मी माळवदकर वर्गशिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन आदिती घुगरे यांनी केले तर विश्वाराध्य मठपती यांनी आभार मानले.


मनोरमा परिवार अंतर्गत

॥ जो जे वांछिल तो ते लाहो ॥

**श्री सदाशिव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर**

कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर | ६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर | ९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. पुरुषोत्तम अनंत साखरे, चेअरमन (मो. ९१७५३६३९४५) | श्रीमती अनिता सुरेशराव जगताप, व्यवस्थापिका (मो. ८७८८३७४४३६)



**CHANGE IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME ANJU DEENDAYAL SANWAL HAS BEEN CHANGED AFTER MARRIAGE TO **ANJU VIVEK GOYADANI** RESIDING C-702, ROHAN NILAY-1, OPP.SPICER COLLEGE, AUNDH-411007 KINDLY NOTE THE SAME.



### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व तालूका उत्तर सोलापूर पैकी मौजे मजरेवाडी येथील बिनशेती ग. नं. ११/१/ब/२/अ/२/ब पैकी प्लॉट नंबर ९२ याचे क्षेत्र ७९.७५ चौ. मी., ही प्लॉट जागा श्री. वाजीद अब्दुल सत्तार सालार व अफरीन वाजीद सालार यांचे मालकीची असून प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे.

श्री. वाजीद अब्दुल सत्तार सालार व अफरीन वाजीद सालार यांनी सदरची मिळकत आमचे पक्षकार कंपनी श्रीराम फायनान्स कंपनी लिमिटेड, शाखा सोलापूर यांचेकडे कर्ज मागणी करून सदर कर्जास वर नमूद मिळकत तारण देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

सबब सदर मिळकतीबाबत कोणाचेही, कसलेही कायदेशीर हक्कहितसंबंध, अधिकार असल्यास अगर कोणाचा सदर गहाणखताबाबत हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द इ वाल्यापासून आठ दिवसाचे आत आमच्याशी संपर्क साधावा व तशी लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीशी श्री. वाजीद अब्दुल सत्तार सालार व अफरीन वाजीद सालार यांचेव्यतिरिक्त कोणाचाही कसलाही संबंध नाही व गहाणखताबद्दल कोणाचीही तक्रार नाही, असे समजून सदर मिळकतीचे गहाणखत आमचे पक्षकार कंपनीचे हक्कात नोंदवे जाईल, त्यानंतर कोणाचीही, कसलीही तक्रार चालणार नाही. सर्वांचे माहीतीकरिता हे जाहीर प्रसिध्दीकरण केले असे. तारीख २१/०२/२०२५

सही/-
जाहीर नोटीस देणार
ॲड. प्रवीण परशुराम करंजकर
रघु - वंश, कर्मवीर नगर, पाटील प्लॉट्स, बार्शी



### जाहिर नोटीस

दिवाणी किरकोळ अर्ज नं.५०/२०२४
निशाण नंबर ९

**सांगोला येथील मे. सि. ज. ज्यु. डी यांचे कोर्टात**

**श्री. संतोष गणपत सोनवणे**
वय ३९, धंदा पेंटीग -- **अर्जदार**
रा. सुकेवाडी, ता. संगमनेर
जि. अहमदनगर, हल्ली मु. खांडगांव
ता. संगमनेर जि. अहमदनगर,
**विरूध्द**
**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै. गणपत बाळकृष्ण सोनवणे यांची सख्खी बहीण कै. शारदा बाळकृष्ण सोनावणे हिचे अल्पशा आजाराने दिनांक २८/०६/२०२४ रोजी मौजे खांडगांव, ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथे निधन झाले. अर्जदार यांचे वडील कै. गणपत बाळकृष्ण सोनवणे यांची सख्खी बहीण कै. शारदा बाळकृष्ण सोनावणे यांची मौजे सांगोला, ता.सांगोला जि. सोलापुर येथे खालीलप्रमाणे स्थावर मालमत्ता आहे. त्याचा सिटी सर्व्हे नंबर २४४३ एकुण क्षेत्र १८९ चौरस मिटर पैकी ३१.५ चौरस मिटर (पत्रा खोली.) या मिळकतीस अर्जदार यांचेशिवाय त्यांचे पश्चात त्यांना अन्य कोणतेही कायदेशिर वारस नाहीत. म्हणुन वारस सर्टिफिकेट मिळणेकामी सदरचा अर्ज अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी ज्या कोणाची, त्याबाबत हरकत असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख ६/०३/२०२५ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत लेखी हरकत द्यावी. अन्यथा अर्जदार यांचे शिवाय वर नमुद मिळकतीस अर्जदार यांना वारस म्हणुन वारस दाखला देणेबाबत मे कोर्ट योग्य ते हुकुम करतील. मग कोणाचीही तकार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. ता.२०/०२/२०२५

शिक्का

सही/-
हुकुमावूरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, सांगोला



### जाहीरप्रकटन

वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज
दि.कि. अर्ज नं.२४/२०२५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि साहेब यांचे कोर्टात**

१) **श्री. दिपक इंद्रसेन भड**, उ. वय ५५ वर्षे,
धंदा- शेती, रा. मु.पो. गौडगांव
ता. बार्शी जि. सोलापूर -- **अर्जदार**
२) **श्री. संतोष इंद्रसेन भड,** उ.वय- ४५ वर्षे,
धंदा- शेती व व्यवसाय, रा. सदर
३) **श्रीमती. रूक्मिणी इंद्रसेन भड,** उ.वय ८३ वर्षे,
धंदा- घरकाम रा. सदर
४) **सौ. रंजीता मोहन लोहोकरे,** उ.वय- ५३ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. सदर
५) **सौ. सुप्रिया प्रमोद भोसले,** उ.वय- ५१ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. टेभुर्णी ता. माढा जि. सोलापूर
**विरुध्द**
कोणी नाही -- **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे**

यात अर्जदार कळवितो ते खालीलप्रमाणे

**ज्याअर्थी,** यातील अर्जदार नं. १ व २ व ४ व ५ यांचे वडिल व अर्जदार नं. ३ यांचे पती इंद्रसेन गणपतराव भड यांचा मृत्यु दि. ११/०८/२०२१ रोजी सुविधा हॉस्पीटल उस्मानाबाद येथे झालेला आहे. मयत कै. इंद्रसेन गणपतराव भड यांचे अर्जदार नं. १ ते ५ हे वारस असल्याने त्यांचा सांभाळ व मृत्युनंतर अंत्यविधी वगैरे सर्वकाही अर्जदाराने केले आहे. मयत कै. इंद्रसेन गणपतराव भड यांना अर्जदार नं. १ ते ५ शिवाय इतर कोणीही वारस नाही.

**त्याअर्थी,** वर नमुद अर्जदार यांचे शिवाय मयत कै. इंद्रसेन गणपतराव भड यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनीसदर चोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. २५/३/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुनकागदपत्रानिशी आपले म्हणणे अगरहरकत द्यावी अथवा कोणाचेहीकाही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील इंद्रसेन गणपतराव भड याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे. हे जाहीरप्रकटन दिला ता. २१/२/२०२५.

सही/-
क. लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय कस्तर बार्शी



### जाहिर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. २४/२०२५

**बार्शी येथील मे. अप्पर जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**वेदांत रघुनाथ सिरसट,** वय - ०६ वर्षे,
धंदा - शिक्षण, रा. बुद्रुकवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
अ.पा.क. आई श्रीमती आशा रघुनाथ सिरसट, -- **अर्जदार**
वय - ४६ वर्षे, धंदा शेती व घरकाम,
रा. बुद्रुकवाडी, ता. माढा, जि. सोलापूर ह.मु-पुणे
**विरूध्द**
महाराष्ट्र शासन (याचे समन्स/नोटीस -- **सामनेवाला**
मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेवर बजवावे)

ज्याअर्थी अज्ञान अर्जदाराचे नावावरील डि सोलापूर सब डि व ता. माढा पैकी पैकी मौजे बुद्रुकवाडी ग्रामपंचायत हद्दीतील बिनशेती प्लॉट भूमापन क्र. ८५/२/ब यापैकी प्लॉट नं. २०/१ याचे सातबारा उतारेप्रमाणे क्षेत्रफळ १.६०.०० असून याचा बिनशेती आकार रू. ०८ ०० पै. आहे. याचा ग्रामपंचायत मिळकत नं २१४ असून याचे क्षेत्रफळ १६३६.०० चौ.फुट आहे. यापैकी अज्ञान अर्जदार वेदांत रघुनाथ सिरसट चे अविभक्त १/३ हिश्याचे क्षेत्र ५४५.३३ चौ. फुट इतके आहे.

येणेप्रमाणे मिळकत अज्ञान अर्जदाराचे मालकीची असून सदर मिळकत अज्ञान अर्जदाराचे पालनकर्ते आई यांनी अज्ञान अर्जदाराचे भविष्यार्तील शिक्षण व गरजा याचा विचार करून सदर मिळकत विक्री करणेचा निर्णय घेवून व्यवहार ठरविलेला आहे. तथापी, अर्जदार हा अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. सदर व्यवहार योग्य व गरजेचा असून अज्ञानाचे हिताचा आहे, त्यामुळे अज्ञानाचे कोणतेही नुकसान होत नाही. असे कथन करून अर्जदाराचे वतीने त्याचे अज्ञानपालनकर्ती आईने या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदाराच्या वरील मागणी संबंधाने जर कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास् या सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क, अधिकार, करार, मदार, साठेखत, ब्रेदी, बोजा, गहाणखत इ. असलेस संबंधीतांतनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमली तारीख २५/३/२०२५ रोजी या मे. न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व व मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. तारीख २१/२/२०२५.

सही/-
क. लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
अप्पर जिल्हा न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर



### जाहीरप्रकटन

वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज
दि.कि. अर्ज नं.२५/२०२५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु. डि साहेब यांचे कोर्टात**

१) **श्री. संजय सुभाष भोसले,** उ.वय-४४वर्ष,
धंदा- शेती, रा. मु.पो. रऊळगांव
ता. बार्शी जि. सोलापूर
२) **श्रीमती. कमल सुभाष भोसले,**
उ.वय- ७० वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर -- **अर्जदार**
३) **रेखा विलास मेंढेकर,**
उ. वय- ५१ वर्षे, धंदा- घरकाम
रा. आरणी ता. जि. धाराशिव
४) **अलका विश्वनाथ नरवडे,** उ.वय- ४७ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. मसला खुर्द
ता. तुळजापुर जि. धाराशिव
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे**

यात अर्जदार कळवितो ते खालीलप्रमाणे

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १,३ व ४ यांचे वडिल व अर्जदार नं. २ यांचे पती सुभाष नागनाथ भोसले यांचा मृत्यु दि. २५/०३/१९९९ रोजी डॉ. जगदाळे मामा हॉस्पीटल बार्शी येथे झालेला आहे. मयत कै. सुभाष नागनाथ भोसले यांचे अर्जदार नं. १ ते ४ हे वारस असल्याने त्यांचा सांभाळ व मृत्युनंतर अंत्यविधी वगैरे सर्वकाही अर्जदाराने केले आहे. मयत कै. सुभाष नागनाथ भोसले यांना अर्जदार नं. १ ते ४ शिवाय इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार यांचे शिवाय मयत कै. सुभाष नागनाथ भोसले यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनीसदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. २५/३/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुनकागदपत्रानिशी आपले म्हणणे अगरहरकत द्यावी अथवा कोणाचेहीकाही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील के. सुभाष नागनाथ भोसले याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे, हे जाहीरप्रकटन दिला ता. १८/२/२०२५.

सही/-
क. लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर बार्शी



### जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बाशी. ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील शेतजमीन तिचे वर्णन-

गट नं. ३१० पैकी क्षेत्र ०० हे. २१ आर, आकार ०० हे. ८२ आर यांसी चतुःसीमा -पूर्वस - गट नं. ३११ शिवाजी पाटील, दक्षिणेस गट नं. ३११ शिवाजी पाटील, पश्चिमेस गट नं. ३१० पैकी शिवाजी पाटील व उत्तरेस गट नं. ३०९ दत्तात्रय पाटील. येणेप्रमाणे शेतजमीन आतील झाडझुडूप, दगडमाती वगैरे आतील सर्व तदंगभुत वस्तूसह. तसेच जमीन गट नं. ३७१ क्षेत्र ०० हे. ३९ आर, आकार ०१ रु. ३० पैसे यांसी चतुःसीमा पूर्वस गट नं. ३७१ पैकी विनायक सुरवसे, दक्षिणेस गट नं. ३७५ बंडेवार, पश्चिमेस गट नं. ३७१ पैकी श्रीकांत सुरवसे व उत्तरेस गट नं. ३५७ देशमुख. येणेप्रमाणे शेतजमीनी गट नं. ३७१ मधील एक चालू पाण्याच्या विहीरीमध्ये १/७ पाणी घेण्याच्या व जाणे येणेच्या हक्कासह तसेच आतील झाडझुडूप, दगडमाती वगैरे आतील सर्व तदंगभुत वस्तूसह.

वर नमुद जमीनीचे रेकॉर्डला अनुक्रमे चंद्रकांत सुरेश शहा, रमेश सुरेश शहा व अजिभित सुरेश शहा यांचे नांवे ७/१२ हक्कपत्रकी मालक व वहिवाटदार सदरी दाखल असून त्यांचे खरेदी मालकोच्या आहेत. सदरील मिळकती त्यांनी त्यांचे गरजेपोटी आमचे आशिलास विक्री करणेचा ठराव करून आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारली आहे. सदरचौ मिळकत मिळकतींचे मालकांनी निवेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे आशिलास दिलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, चंद्रकांत सुरेश शहा, रमेश सुरेश शहा व अजिभित सुरेश शहा यांचेशी इतर कोणाचा वरील नमूद मिळकतीबाबत खरेदी, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा, चोळीबांगडी, पोटगी इ. प्रकारचा कसल्याही प्रकारे हस्तांतरणाबाबत व्यवहार असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर कागदपत्रानिशी आमचे आशिलास शहानिशा करून द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे आशिल वर नमुद ठरावाप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागावून कोणाची तक्रार चालणार नाही कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. कळावे, ता. २१/०२/२०२५

सही/-
श्री. एस. एस. ठोंबरे,
(ॲडव्होकेट), सुयश निवास, फुले
प्लॉट, बाशी, मो.नं. ९३७११६२४२५
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग सोलापूर, यांचे
९११, सिव्हील लाईन, राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर - ४१३००३

दूरध्वनी :- ०२१७ - २३११२८९४ email:- elsolapur.ee@mahapwd.gov.in

**तिबार ई- निविदा सुचना क्र. ०६ / २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग सोलापूर हे B -1 (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे ऑनलाइन मागवित असून कंत्राटदाराचे वर्गाविषयीची माहिती निवेदेत नमूद करण्यात आली आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाउनलोड करण्यात यावी तसेच निविदा करण्याचा अथवा न करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम |
| --- | --- | --- |
| १. | Estimate No. :1340178 of 2023-2024 Providing Internal Electrification, Switchgear, Distribution Transformer, DG Set for backup power supply Campus street light, Submersible pump, Passenger Lift to Proposed dministrative Building at Madha Tal - Madha Dist-Solapur. | 97,52,900/- |

१. निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २७/०२/२०२५ ते दिनांक ०६/०३/२०२५
२. निविदा पुर्व बैठक व स्थळ : निरंक
३. ई-निविदा उघडणे : दिनांक १०/०३/२०२५ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग सोलापूर, यांचे कार्यालय, ९११, सिव्हील लाईन, राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर - ४१३००३
४. खालील संकेतस्थळावर ई निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
www.mahatenders.gov.in

सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

सही/-
(श्री.सु. गुजरे)
कार्यकारी अभियंता
सा.बां. सोलापूर विद्युत विभाग, सोलापूर

(प्रसिध्दीकरिता तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम सोलापूर विद्युत विभाग, सोलापूर या कार्यालयाचे सुचना फलक).

विमाका-पुणे-जाहि-३७७-२०२४-२५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### कार्लोस अल्काराझला धक्का, जिरी लेहेका उपांत्यपूर्व फेरीत



**कतार** : येथे सुरू असलेल्या कतार ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत २५ व्या क्रमांकाच्या जिरी लेहेकाने अव्वल मानांकित कार्लोस अल्काराझला ६-३, ३-६, ६-४ असा पराभवाचा धक्का दिला. स्पेनच्या अल्काराझचा या वर्षी दुसऱ्यांदा पराभव पत्करावा लागला. यापूर्वी त्याला ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत नोवाक जोकोविचकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. २१ वर्षीय अल्काराझने या महिन्याच्या सुरुवातीला रॉटरडॅम ओपन जिंकला. २३ वर्षीय लेहेका आता पुढील सामना आठव्या मानांकित जॅक ड्रॅपरशी खेळेल. ड्रॅपर मॅत्तिओ बेरेतिनीवर ४-६, ६-४, ६-३ असा विजय नोंफ्लदविला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच मी अनेक चढ-उतारांचा सामना केला. अल्काराझसारख्या खेळाडूविरुद्ध सामना जिंकणे ही माझ्यासाठी खूप मोठी कामगिरी आहे. मला स्वतःवर विश्वास होता. मला माहित होते की माझ्याकडे अशा प्रकारचे टेनिस तयार करण्याची पातळी आहे, असे लेहेका म्हणाला. तत्पूर्वी, पाचव्या मानांकित आंद्रे रुबलेव्हने दुसऱ्या मानांकित ॲलेक्स डी मिनौरला ६-१, ३-६, ७-६ (८) असे पराभूत करताना एक मॅच पॉइंट वाचवला. रुबलेव्हने दोहा येथे चौथ्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. तिथे त्याने २०२० मध्ये जेतेपद जिंकले.

### गुजरात टायटन्समधील ६७ टक्के भाग टोरेन्ट समूह खरेदी करणार

**अहमदाबाद** : इंडियन प्रीमियर लीग फ्रॅन्चायझी गुजरात टायटन्स मधील ६७ टक्के हिस्सा ऊर्जा व आरोग्य क्षेत्रातील प्रमुख समूह टोरेन्ट समूहाला विकणार आहे. भारतीय स्पर्धा आयोगाने टोरेन्ट समूहाला गुजरात टायटन्समध्ये हिस्सा खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. प्रस्तावित संयोजनाचे (इरेलिया स्पोर्ट्स इंडिया प्राइव्हेट लिमिटेड) ६७ टक्के भागभांडवल खरेदी आणि अधिग्रहणकर्त्याच्या (टोरेन्ट इन्व्हेस्टमेंट) नियंत्रणाशी संबंधित असल्याचं म्हटलं. टोरेन्ट इन्व्हेस्टमेंट्स ही टोरेन्ट समूहाची होल्डिंग कंपनी आहे. इरेलियाकडे ३३ टक्के हिस्सा आहे. इरेलिया स्पोर्ट्स इंडिया इंडियन प्रीमियर लीगमध्ये गुजरात टायटन्सची अहमदाबाद फ्रँचायझी चालवते. स्पर्धा कायद्याच्या कलम ६ (४) अन्वये प्रस्तावित संयोजन अधिसूचित केले जात असल्याचे म्हटले आहे. गेल्या आठवड्यात टोरेन्ट ग्रुपने गुजरात टायटन्समध्ये बहुसंख्य हिस्सा खरेदी करण्याची घोषणा केली होती. यामुळे अहमदाबादची ही कंपनी आता क्रीडा क्षेत्रातही उतरली आहे. या करारानुसार इरेलियाचा फ्रॅन्ययझीमध्ये ३३ टक्के हिस्सा असेल. आयपील २२ मार्चपासून सुरू होणार आहे.

### मुंबई इंडियन्सच्या जर्सीचे अनावरण

**मुंबई** : पाच वेळच्या आयपीएल विजेत्या मुंबई इंडियन्सने (एमआय) २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या २०२५ च्या आवृत्तीसाठी आपल्या अधिकृत जर्सी अनावरण केले. जर्सीमध्ये मुंबई इंडियन्सच्या साराचे प्रतीक असलेले निळा आणि सोनेरी रंग कायम आहे. निळा रंग विश्वास, आत्मविश्वास आणि संघाच्या अमर्याद क्षमतेचे प्रतीक आहे, तर सोने गौरव, यश आणि उत्कृष्टतेचा अथक प्रयत्न दर्शवते, असे मुंबई इंडियन्सने म्हटले आहे. एमआयचा कर्णधार हार्दिक पंड्याने या प्रसंगी चाहत्यांसाठी एक हृदयस्पर्शी संदेश शेअर केला, यात रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांच्या संघाच्या गाभ्यासह मुंबईचा अभिमानास्पद वारसा जपण्याचे आश्वासन दिले. प्रिय पलटन, २०२५ मध्ये हा वारसा पुढे आणण्याची संधी आहे. निळ्या आणि सोनेरी रंगाच्या कपड्यांसह, आम्ही मुंबईसारखे खेळण्यासाठी मैदानात उतरू. ही केवळ आमची जर्सी नाही. हे तुम्हाला वचन आहे. चला वानखेडेवर भेटूया, असे तो म्हणाला. स्पर्धेच्या इतिहासातील संयुक्तपणे सर्वात यशस्वी संघ असलेल्या एमआयने २०२४ च्या आवृत्तीत गुणतालिकेत तळाशी स्थान मिळवले होते.

### बंदीमुळे जॅनिक सिनर प्रदर्शनी सामन्यातून बाहेर

**लास वेगास** : पुढील महिन्यात लास वेगासमध्ये होणाऱ्या प्रदर्शन टेनिस स्पर्धेतून इटलीच्या जॅनिक सिनरला वगळण्यात आले आहे. प्रथम विश्वमानांकित सिनर डोपिंग चाचणी अपयशी ठरल्यामुळे त्याच्यावर तीन महिन्यांची बंदी घालण्यात आली आहे. सिनरऐवजी कॅस्पर रुड आता २ मार्च रोजी मंडाले बे रिसॉर्ट आणि कॅसिनो येथे होणाऱ्या एमजीएम रिवॉर्ड्स प्रदर्शनी टेनिस सामन्यात खेळणार आहे. कॅस्पर रुड ॲलेक्झांडर इवेरेव्ह, टेलर फ्रिट्झ आणि टॉमी पॉल यांच्यासोबत सहभागी होणार आहे. नुकतीच या बदलाची घोषणा करण्यात आली. सिनर अलीकडील निलंबनानंतर खेळणार नाही, असे आयोजकांनी सांगितले.

# विदर्भ सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत

### रणजी करंडक क्रिकेट
### हर्ष दुबेचे ५ बळी

◆ **नागपूर, २१ फेब्रुवारी**

नागपूरच्या व्हीसीए स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात विदर्भाने विक्रमी ४२ वेळच्या विजेत्या मुंबई संघाचा ८० धावांनी पराभव करून सलग दुसऱ्यांदा व एकूण चौथ्यांदा स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. तिकडे अहमदाबादमध्ये आदित्य सरवटेच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर केरळने गुजरातविरुद्ध पहिल्या डावात मिळविलेल्या २ धावांच्या आघाडीच्या बळावर पहिल्यांदाच स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. पहिल्या डावांत ५४ व दुसऱ्या डावांत १५१ धावांची शतकी खेळी करणारा विदर्भाचा यश राठोड याला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आता आगामी २६ फेब्रुवारी ते २ मार्चदरम्यान व्हीसीए स्टेडियम नागपूर येथे विदर्भ आणि केरळ यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे.





विजयाचा आनंद साजरा करताना विदर्भाचे रणजी क्रिकेटपटू

विदर्भाने पहिल्या डावात ३८३ धावा उभारल्या, प्रत्युत्तरात मुंबईला २७० धावांपर्यंतच मजल मारता आली. पहिल्या डावात ११३ धावांची आघाडी मिळवणाऱ्या विदर्भाने दुसऱ्या डावात २९२ धावा उभारून मुंबईसमोर विजयासाठी ४०६ धावांचे लक्ष्य ठेवले. मुंबईने चौथ्या दिवस अखेर ३ बाद ८३ धावा केल्या होत्या. आज अखेरच्या दिवशी मुंबईला आणखी ३२३ धावा काढण्याची गरज होती, परंतु त्यापैकी त्यांना आज २४२ धावांचीच भर घालता आली व त्यांचा दुसरा डाव ९७.५ षटकांत ३२५ धावांतच आटोपला. याबरोबरच विदर्भाने मुंबईवर ८० धावांनी मोठा विजय मिळवला.

शिवम दुबे (१२), सूर्यकुमार यादव (२३), शम्स मुलानी (४६), शार्दुल ठाकूर ( ६६), तनुष कोटियान (२६) व मोहित अवस्थी (३४) यांनी मुंबईला विजय मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला, परंतु विदर्भाचे गोलंदाज हर्ष दुबे, यश ठाकूर व पार्थ रेखडेने प्रभावी मारा करत मुंबईचे मनसुबे उधळून लावले आणि मुंबईला ३२५ धावांत रोखले.

विदर्भाच्या हर्ष दुबेने १२७ धावांत ५ बळी, तर यश ठाकूर व पार्थ रेखडेने प्रत्येकी २ बळी टिपलेत. (वृत्तसंस्था)

# आदित्य सरवटेची प्रभावी गोलंदाजी, केरळ प्रथमच निर्णायक फेरीत

◆ **अहमदाबाद, २१ फेब्रुवारी**

येथे खेळल्या गेलेल्या रणजी करंडकाच्या पहिल्या उपांत्य सामन्यात चौथ्या दिवसापर्यंत केरळविरुद्ध खेळताना गुजरातला पहिल्या डावात आघाडी मिळवून अंतिम फेरी गाठण्याची आशा होती, परंतु पाचव्या दिवशी सकाळच्या सत्रात मूळ विदर्भाचा परंतु सध्या केरळचे प्रतिनिधीत्व करत असलेला डावखुरा फिरकी गोलंदाज आदित्य सरवटेने गुजरातचा स्वप्नभंग केला व केरळला प्रथमच रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळवून दिला. नाबाद १७७ धावांची शतकी खेळी करणारा केरळचा मोहम्मद अझरुद्दीन सामनावीर ठरला.

केरळच्या पहिल्या डावातील ४५७ धावांना प्रत्युत्तर देताना जयमीत पटेलच्या नाबाद ७४ धावांच्या खेळीच्या बळावर चौथ्या दिवस अखेर गुजरातने १५४ षटकांत ७ बाद ४२९ धावांपर्यंत मजल मारली होती. ते केवळ २८ धावांनी पिछाडीवर होते



आदित्य सरवटेचे १११ धावांत ४ बळी

व ही पिछाडी भरून काढण्याची त्यांना आशा होती. परंतु जयमीत पटेलसह उर्वरित तीन फलंदाजांना आदित्य सरवटेने आपल्या फिरकीच्या जाळ्यात ओढले आणि गुजरातला १७४.४ षटकांत ४५५ धावांत गुंडाळले. गुजरातला पिछाडी भरून काढण्यास तीन धावा कमी पडल्या. केरळच्या आदित्य सरवटे व जालाज सक्सेनाने प्रत्येकी ४ बळी, तर मोहम्मद निधेश व नेदुमनकुझी बासीलने प्रत्येकी १ बळी टिपला.

परिणामी केरळने गुजरातविरुद्ध पहिल्या डावात अवघ्या २ धावांची आघाडी मिळविली. हीच महत्त्वपूर्ण आघाडी केरळला अंतिम फेरीत प्रवेश करण्यास पुरेशी ठरली. दिवस अखेर केरळने दुसऱ्या डावात ४७ षटकांत ४ बाद ११४ धावा नोंफ्लदवल्या, परिणामी केरळ व गुजरातदरम्यानचा सामना अनिर्णीत राहिला. (वृत्तसंस्था)

# दहावी, बारावी ग्रेस गुणातील 'आपले सरकार' ॲपमधील त्रुटी रद्द करा

### सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक महासंघाची मागणी



**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

दहावी, बारावी ग्रेस गुणातील आपले सरकार या ॲप मधील १८ अनावश्यक त्रुटी रद्द कराव्यात, असे निवेदन सोलापूर शहर जिल्हा शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक महासंघाने जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांना दिले. यावेळी तालुका क्रीडाधिकारी गणेश पवार, क्रीडाधिकारी नदीम शेख, महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन गायकवाड, शहर अध्यक्ष प्रा.संतोष खेंडे, सचिव सुहास छंचुरे, उपाध्यक्ष गंगाराम घोडके, वसीम शेख, सहसचिव श्रीधर गायकवाड, नावेद मुन्शी, मारुती घोडके, शिवानंद सुतार, धनंजय धेंडे, संतोष पाटील, विठ्ठल सरवदे आदी उपस्थित होते. महासंघाने सोलापूर व महाराष्ट्रातील क्रीडा शिक्षकांना येणाऱ्या ग्रेस गुणाबाबतच्या अडचणी दूर करून ग्रेस गुणचे फॉर्म सहज व सोप्या शब्दात उपलब्ध करून द्यावे. या सर्व त्रुटीबद्दल महासंघासोबत जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांच्याशी सविस्तर चर्चा झाली व त्यांनी हे निवेदन राज्य क्रीडा आयुक्त व पुणे बोर्ड यांना पाठवण्यात येईल, असे आश्वासीत केले.

#### या आहेत ॲपमधील त्रुटी

- स्कूल कोड मध्ये यु-डायस कोड किंवा इंडेक्स नंबर यापैकी एक असावा.
- विद्यार्थ्यांचा पत्ता, मोबाईल नंबर, ईमेल आयडी, झेंडर, वय, जन्मतारीख, शाळेचा पत्ता, पिन कोड, टेलीफोन, नंबर विद्यार्थ्यांचा पिनकोड, कॅटेगरी, सब कॅटेगिरी, डिलिव्हरी मोड याची आवश्यकता नाही.
- ऑनलाइन फॉर्म सबमिट केल्यानंतर एडिटची सोय असावी.
- आट्यापाट्या, वुशू, क्रिकेट, थ्रो बॉल व सेपक टकरा या पाच खेळांचा समाविष्ट करावा.
- घरीच कुणासाठी आपले सरकारमध्ये फक्त एका फॉर्मेटमध्ये एकच फॉर्म असावा.





# जिल्हा स्केटिंग स्पर्धेत विनर्स फाउंडेशनला विजेतेपद

### साई स्केटिंग क्लब उपविजेता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

जिल्हा स्केटिंग स्पर्धेत विनर्स फाउंडेशन स्केटिंग क्लबने विजेतेपद पटकाविले. उपविजेतेपद साई स्केटिंग क्लबने संपादिले. बार्शीच्या साईदूत स्केटिंग क्लबने तृतीय स्थान मिळविले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने विनर्स स्केटिंग फाउंडेशनच्या वतीने ही स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित केली होती. याचे उद्घाटन भारतीय सेनेतील ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे अधिकारी राधेश्याम कोरे आणि बिक्रमजीत सिंग व पोलीस दलातील सागर मठपती, तृप्ती काळे यांनी केले. यावेळी दीपक वासुदेव कैरकोंडा, सिद्धू सुतार, मानसी मुंदडा, दिपाली मुंदडा, यादवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशिक्षक सागर राठोड यांनी केले व पाहुण्यांचा सत्कार सोलापुर रोलर स्केटिंग असोसिएशनचे सचिव सम्यक मोहोळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

**स्पर्धेचा निकाल (प्रथम, द्वितीय व तृतीय) :**

**५ वर्षांखालील मुली :** संयुक्ता पोतदार, आदीश्री बाटगुळे, आर्या गदगे. मुले : वेदांत कोठारी, मोहम्मद खान

**८ वर्षांखालील मुली**
रिया प्रहार, आर्या क्षीरसागर, ऋषीता माळवतकर, मेदिनी जगताप, आईना गदगे. मुले : सर्वेश जिनगे, सक्षम हूच्चे, विराज आरकल, ओम हत्ते, साई शिरसागर.

**१० वर्षांखालील मुली**
शिवन्या हत्ते, प्राची गुंडेली, स्वानंदी काळे, निशा सरवदे, गंगा नादरगी. मुले : शर्विल माळवतकर, शौर्य कदम, यायहा शेख, देवांश सरवदे, कार्तिक फुलारी.

**१२ वर्षांखालील मुली**
उत्तरा पोद्दार, स्वराली काळे, वसुधा सब्बन. मुले : निर्भय कोरे, शिवांश राऊत वृषांक कटारे, श्रेयस धनशेट्टी. इनलाईन मुले : सारंग मठपती, प्रज्ञेश यादवाड. क्वाड मुले : असित कांबळे, हर्षा सब्बन, सोहम वाघमोडे. मुली : स्नेहा बोकडे, मधुपर्णा दराडे, अक्षता बिरोळी.

**१४ वर्षांखालील मुले**
**ईनलाईन :** शिवम वाघमोडे, ओमकार वास सरला, रोहन वलसा. **मुली :** श्रद्धा फलमारी, श्रीलेखा बामन्ना. क्वाड मुले : प्रतीक शिंदे, श्रवण पेरला, विनायक हूच्चे.

**१६ वर्षांखालील**
राजनंदिनी सदरखेड, प्रशांत बामन्ना, प्रद्युम्न बिराजदार. **खुला गट :** आयुष मोहोळकर, विनायक घोडके, प्रतीक धनशेट्टी.

## मॅरेथॉन स्पर्धेत मेघराज हिरेमठ प्रथम





**सोलापूर दि. २१ फेब्रुवारी**

आत्मन स्पोर्ट्स क्लब व सुयश गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चाईल्ड मॅरेथॉन स्पर्धेत वि. मो. मेहता शाळेच्या मेघराज हिरेमठ याने प्रथम क्रमांक पटकाविला. त्यास सुयश गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष केशव शिंदे, सुयश शिंदे, आंतरराष्ट्रीय धावपटू अरुण राठोड यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. मेघराजला प्रार्थना अकॅडमीचे प्रशिक्षक सुनील जाधव, एकता जाधव व क्रीडा शिक्षक अमित कोर्टिकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यास वि. मो. मेहता शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, वैशाली दुणगे यांनी अभिनंदन केले.

## निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीस विजेतेपद

### युनायटेडविरुद्ध दोन दिवसीय सामन्याची मालिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

एनजीसीए विरुद्ध युनायटेड क्रिकेट क्लब दोन दिवसाच्या तीन सामन्याच्या मालिकेत निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीने दोन विरुद्ध एकने चषक पटकावला.



पुष्प जिमखाना डोणगाव रोड येथे या स्पर्धा झाल्या. यात अभिजीत सरवदेने द्विशतक केले. त्याने दोन डावातून ३८५ आणि सर्वोच्च २८५ धावा तर आनंद शेंडेने पाच डावातून २८२ व सर्वोच्च १३० धावा केल्या. गोलंदाजीत श्रवण माळी याने सहा डावात १८ बळी व एका सामन्यामध्ये ११ बळी टिपले. कर्णधार सोहम कुलकर्णी याने सहा डावात १५ बळी व फलंदाजी करताना एकशे दोन धावा केल्या.

युनायटेड क्लबकडून वार्षिक साठे याने सहा डावात १२४ धावा व श्रीराज गवळी याने ११० धावा केल्या. गोलंदाजीत सम्राट बोबडेने पाच डावात दहा बळी व यश लोंढे सहा डावामध्ये ८ बळी घेतले. सामनावीर श्रवण माळी, उत्कृष्ट फलंदाज अभिजीत सरवदे, उत्कृष्ट गोलंदाज श्रवण माळी तर मालिकावीर सोहम कुलकर्णी उत्कृष्ट फलंदाज अभिजीत सरवदे, उत्कृष्ट गोलंदाज श्रवण माळी, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यशराज टेकाळे, उत्कृष्ट झेल यशराज टेकाळे यांनी वैयक्तिक पारितोषिके पटकाविली. बक्षीस वितरण समारंभ सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु, निवड समिती चेअरमन सुनील मालप, राजेंद्र गोटे, सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार संतोष बडवे, कॉन्टॅक्टर दीपक गायकवाड व विनोद पाटील यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले

## बालाजी अमाइन्सकडून लॉन टेनिसपटू संध्याराणी बंडगरला आर्थिक सहाय्य



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

येथील बालाजी अमाइन्सकडून लॉन टेनिसपटू संध्याराणी बंडगर यांना ५० हजार रुपयाचे आर्थिक सहाय्य देण्यात आले.

टर्की येथे इंटरनॅशनल टेनिस फेडरेशनने ९ ते १४ मार्च या कालावधीत आयोजित केलेल्या वर्ल्ड मास्टर्स चॅम्पियनशिप लॉन टेनिस स्पर्धेमध्ये भारतीय संघाचे कर्णधार म्हणून संध्याराणी प्रतिनिधित्व करीत आहे.

तिच्या या कामगिरीमुळे तिला आर्थिक सहाय्य म्हणून रु.५० हजार रकमेच्या धनादेश बालाजी अमाइन्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांच्या हस्ते सुपूर्द केला. यावेळी सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई उपस्थित होते.

# पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा शेवगावला

### नोंदणीसाठी 10 मार्च अंतिम मुदत

**मुंबई, ता. २१ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने ६० वी (हिरक मोहत्सवी) पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा १३ ते १६ मार्च २०२५ या कालावधीत शेवगाव (जि.अहिल्यानगर) येथे रंगणार आहे. याबाबतची अधिकृत घोषणा राज्य खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी केली आहे.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतून ५७ व्या पुरुष-महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ निवडले जाणार आहेत. राज्यभरातील उच्च खेळ करणाऱ्या खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवर झेप घेण्याची सुवर्णसंधी देणारी ही स्पर्धा खेळाडूंसाठी महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे खो-खो रसिकांसाठी शेवगावमध्ये या रोमांचक सामन्यांचा थरार अनुभवण्याची संधी असणार आहे. स्पर्धेचे आयोजन शेवगाव स्पोर्ट्स, बहुउद्देशीय फाऊंडेशन, सत्यभामा प्रतिष्ठान व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यु आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने खंडोबा मैदान शेवगाव येथे केले आहे.

राज्यातील सर्व जिल्हा संघटनांनी आपल्या संघाच्या प्रवेशिका १० मार्चपर्यंत राज्य संघटनेकडे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सहभागी खेळाडूंनी १२ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत शेवगाव येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेतलेल्या खेळाडूंची नोंदणी झालेली असणे अनिवार्य असून, संबंधित जिल्हा संघटनेकडून त्यांची अधिकृत यादी राज्य संघटनेकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे. प्रत्येक संघात १५ खेळाडू, १ प्रशिक्षक आणि १ व्यवस्थापक असे १७ सदस्य सहभागी होऊ शकतात. विशेषतः, महिला संघांसाठी महिला व्यवस्थापिकेची नेमणूक अनिवार्य आहे. राज्यातील सर्व जिल्हा संघांनी या स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीव नाईक-निंबाळकर, सचिव प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांच्यासह सर्व सहसचिवांनी केले आहे.

### प्रसाद सोनवणेची राज्य लॉन टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**



नांदेड येथे होणाऱ्या राज्य महसूल क्रीडा स्पर्धेसाठी लॉन टेनिस या क्रीडा प्रकारात सातारा येथे झालेल्या पुणे विभागीय स्पर्धेतून येथील प्रसाद सोनवणेची निवड झाली. विभागीय स्पर्धेत एकेरी व दुहेरीत त्याने सुवर्ण पटकाविले. त्यास प्रशिक्षक सुधीर सालगुडे, महेश झांबरे यांचे मार्गदर्शन लाभले. सोनवणे हे जिल्हा निवडणूक कार्यालयात कार्यरत आहेत. त्यास उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, राज्य लॉन टेनिस मानद सचिव राजीव देसाई, सॉफ्ट टेनिसचे सचिव प्रा. संतोष गवळी यांनी पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

## पुरुष व महिला गटाची जिल्हा खो खो स्पर्धा बुधवारी सोलापुरात

### शाबादी, बिज्जरगी व कोळी यांच्यातर्फे फिरते करंडक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

पुरुष व महिला गटाची जिल्हा अजिंक्यपद खो खो स्पर्धा बुधवारी दि. २६ फेब्रुवारी रोजी येथील हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर होईल.

या स्पर्धेतून अहिल्यानगर येथे १३ ते १६ मार्च दरम्यान होणाऱ्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी जिल्ह्याचे संघ निवडण्यात येणार आहेत. इच्छुक संघानी आपली नोंदणी तांत्रिक समितीचे सचिव उमाकांत गायकवाड (मो.९८८१३२३०६०)यांच्याकडे मंगळवारी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत नोंदणी शुल्क रुपये पाचशे भरून करावी. नोंदणी फी थकीत असलेल्या संघाचे नाव भाग्य पत्रिकेत टाकण्यात येणार नाही. या स्पर्धेची भाग्यपत्रिका (लॉट्स) मंगळवारी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता टाकण्यात येईल.

पुरुष संघासाठी कै. राजेश विजय शाबादी यांच्या स्मरणार्थ शाबादी परिवारातर्फे महिलांसाठी उद्योजक रेवणसिद्ध बिज्जरगी व गणेश कोळी यांच्यातर्फे फिरता करंडक देण्यात आले आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त संघानी भाग घ्यावा, असे आवाहन सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सरचिटणीस ए. बी. संगवे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# अँटी करप्शन रेडप्रकरणी पोलीस पाटलाचा जामीन मंजूर

**एसीबी कस्टडची मागणी नाकारली; बार्शी अतिरिक्त सत्र न्यायालयाचे महत्त्वपूर्ण आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यातील मौजे बावी (आ) येथील पोलीस पाटील राहुल रमेश उंबरे यांची ण्टी करप्शन विभागाने केलेल्या रेडप्रकरणी अॅड. प्रशांत शेटे यांचा युक्तीवाद मान्य करुन ए.सी.बी. ची कस्टडीची मागणी नामंजुर करुन जामीनावर मुक्तता करण्याचे आदेश बार्शीच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश विक्रमादित्य मांडे यांनी दिले आहेत.

१२ फेब्रुवारी रोजी विशाल बालाजी फोपले यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांचेशी फोनवरुन संपर्क साधून त्यांची तक्रार सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक पिंगुवाले, शासकीय पंच व त्यांचे पथक बार्शी कुडूवाडी रोडवरील जैन मंदिराजवळ आल्यानंतर त्यावेळी पंचासमक्ष लेखी तक्रार दिली. त्यानुसार पोलीस हवालदार सर्जेराव गायकवाड हे विशालची आई मीना फोपले यांनी दाखल केलेल्या गुन्ह्याचे चार्जशीट कोर्टामध्ये दाखल करण्यासाठी पैसे लागतात व त्यासाठी हवालदार गायकवाड यांना जाऊन भेटा असा बावी (आ) गावाचे पोलीस पाटील राहुल उंबरे यांनी फोन करुन सांगितले. त्यानंतर दुपारी १२ वाजणेचे सुमारास ते बार्शी पोलीस ठाणे येथे गेले असता हवालदार गायकवाड यांनी गुन्हयाचे काम पूर्ण झालेचे सांगुन कोर्टात चार्जशीट पाठविण्यासाठी र.रु. १०,००० द्यावे लागतील असे सांगितले. त्यानंतर चुलत भाऊ गणेश फोपले याने चार्जशीटसाठी पैसे द्यावे लागत नाहीत असे सांगितले, त्यामुळे हवालदार गायकवाड हे लाचेची मागणी करीत असल्याचे लक्षात आल्याने तक्रार दिली.

त्यानंतर लाचेची रक्कम तडजोडीने ५००० ठरवून हजर केलेल्या रु. ५०० च्या नोटांना स्टाफच्या हस्ते अँथ्रॉसिन पावडर लावून नोटा जिन्सच्या पाठीमागच्या खिशात ठेवल्या, त्याप्रमाणे सापळा कारवाईच्या अनुषंगाने तुळजापूर चौक येथे उंबरे यांना ५००० रुपये दिले व उंबरे यांनी हे पॅन्टच्या मागच्या खिशात ठेवले. सापळा कारवाई यशस्वी झाल्याचा ईशारा मिळताच पो.नि. पिंगुवाले यांनी पोलीस पाटलांची मोटारसायकल थांबवून त्यांना ताब्यात घेतले व गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन तो बंद करुन ताब्यात घेतला व नंतर प्राथमिक तपासण्या वाहनात कृत्रिम अंधार करुन करण्यात आल्या. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. संशयितास अटक करुन मे. न्यायालयात हजर करुन ए.सी.बी.तर्फे कस्टडीची मागणी केली गेली. न्यायालयीन कोठडी दिली गेली.

सदर मागणी अमान्य करुन संशयितास संशयिताचे जामीन अर्जावर ॲड. प्रशांत शेटे यांचा तथा सरकारी वकीलांचा युक्तीवाद ऐकून घेऊन संशयितास रु. ५०००० च्या जामीनावर मुक्त करण्याचे आदेश मे. कोर्टाने दिले.



## कस्तुराई फीडस् कंपनीचे उद्घाटन

**टेंभुर्णी, दि. २१ फेब्रुवारी-**

यशराज ग्रो इंडस्ट्रीजचे कस्तुराई फीडस् या पशुखाद्य निर्मिती कंपनीचे उद्घाटन माजी आ. बबनराव शिंदे, आ. अभिजीतआबा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी आ. संजयमामा शिंदे होते.

यशराज ग्रो इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक गोरख खटके-पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी हभप सुसेन महाराज नाईकवाडी यांचे कीर्तन झाले. दुग्ध व्यवसाय तज्ञ डॉ. शैलेश मदने, संजय कोकाटे, मधुकर देशमुख, राजेंद्र ढेकणे, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन तुकाराम ढवळे, नागनाथ खटके-पाटील, बाळासाहेब ढवळे, दिलीपराव भोसले,औंदुबर महाडिक, रमेश पाटील, सचिन जगताप, भारत पाटील, नागनाथ पाटील, सुरेश ताटे, डॉ. शैलेश मदने, डॉ. पराग घोगळे, राजेंद्र वायसे, आण्णासाहेब पवार, दत्तात्रय ढवळे, शिवसेनेचे अध्यक्ष मधुकर देशमुख, बाळासाहेब ढवळे, सतीश सुर्वे, माणिक लांडे, नितीन कापसे, संदीप पाटील, हभप सुसेन महाराज नाईकवाडे, माजी सभापती पिंटू काळे, मुन्ना साठे, दीपक देशमुख, विजय खटके-पाटील, नागेश खटके, धनंजय मोरे, संतोष खटके, शिवाजी पाटील, सतिश पाटील, नानासाहेब ढवळे, प्रभाकर परबत, राजेंद्र परबत-पाटील, नागनाथ ढवळे, गणेश ढवळे, डॉ. मनोज काळे, दादासाहेब पाटील, संदीप गायकवाड, सोम नाथ नाळे, राहुल लांडे, विजय जगताप, संजय भांगे, अतुल सरडे, संजय दुपडे, धनंजय ढवळे, रामभाऊ आसबे, राजाभाऊ शिंदे, सचिन देशमुख, ऋषिकेश बुडे-पाटील, सरपंच बाळासाहेब ढेकणे, भजनदास खटके, सुरेश लोंढे, राजेंद्र ढेकणे, डॉ. राहुल पाटील, अशोक खटके, जयवंत पोळ, दादा कोल्हे, अमोल जगदाळे, नितीन खटके, विवेक येवले, हरिदास माने, सचिन लोंढे, श्रीपती खटके, नवनाथ खटके, दीपक खोचरे, महेश देशमुख उपस्थित होते. सूत्रसंचलन राजाभाऊ पाटील, राजेंद्र मुळे यांनी केले तर आभार संचालक नागेश खटके-पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश खटके, रणजीत खटके, सागर खटके, गणेश गुंड, उदय खटके, ओंकार खटके, बालाजी साळुंके यांनी परिश्रम घेतले.



## खुदावाडीत शिवजयंती साजरी

**अणदूर, दि. २१ फेब्रुवारी-**

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती खुदावाडीतर्फे एक नवीन उपक्रम यावर्षी घेण्यात आला, तो म्हणजे गावातील युवकांनी व्यसनापासून दूर राहण्यासाठी शपथ घेऊन आपल्या मृत्यू पश्चात आपले देहदान करण्याचा निर्णय घेतला आहे. कार्यक्रमाला गावातील जेष्ठ समाजसेवक डॉ.सिद्रामपा खजुरे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना अनंत अंहंकारी यांनी केली यावेळी देहदान करणाऱ्यांसाठी मार्गदर्शन म्हणून डॉ.यशवंत नरवडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सरपंच सरोजिनी कबाडे, डॉ. प्रतिभा नरवडे, राम जवळगे, माजी पंचायत समिती सदस्य गुरुनाथ नाना कबाडे,पांडू बापू बोगरगे नागनाथ खंदारे, उपस्तिथ होते. यावेळी श्रीधर नरवडे, यश नरवडे, अप्पा काकडे, शरणापा कबाडे, व्यंकट नरवडे, गणेश मोरे, बापट सुरवसे या सात युवकांनी आपले देहादान करणाचा संकल्प करून नाव नोंदणी केली आहे. असा आगळा वेगळा उपक्रम घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. आभार महादेव सालगे यांनी मानले.

# जिल्हा विकासाचा मार्ग झालाय ‘काटेरी’!

- ना जिल्ह्याला मिळतंय मंत्रीपद ना निधी?
- विकासकामांच्या घोषणांचा मात्र पडतोय पाऊस
- स्थानिक लोकप्रतिनिधींही झाले खूपच ‘उदासिन’

**तभा वृत्तसेवा/ अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील विविध विकासकामांना रेटा लावण्यासाठी जिल्ह्यात एकाही आमदारांची मंत्रीपदी वर्णी लागली नाही; यामुळे सत्तेतील नेतेगण चांगलेच उदासीन दिसत असून, यामुळेच जिल्हा विकासासाठी मंजूर झालेल्या कोट्यवधी रूपयांच्या विकासकामांचा आलेख रूंदावण्यापेक्षा खालावत असल्याचे सध्यातरी दिसून येत आहे. केवळ स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे चेन्नई-सुरत, पंढरीतील दर्शन मंडप निविदा निघालेल्या कोट्यवधींच्या कामांनाही लगाम लागला असल्याने जाणकार नागरिकांतून आश्चर्य व्यक्त होत आहे. केवळ जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी जोर लावून उपयोग नाही तर त्यांना लोकप्रतिनिधींच्या सहकार्याची सांगड असणे जरूरीचे आहे; असे सध्यातरी दिसून येत आहे.

नुकतेच पंढरपूर विकास आराखड्यातील दर्शन मंडप उभारण्यासाठी ऑनलाईन टेंडर काढले पण लगेचच ते काम वरिष्ठ पातळीवरून थांबविल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे भाविकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. उजनी जलपर्यटन विकास आराखड्याच्या बोटी खरेदी टेंडर रद्द झाले; याला कारण काय तर पर्यटन विभाग आणि कृष्णा-खोरे विकास महामंडळ यांच्यात करार होत नसल्याने तेही रखडले, सुरत चेन्नई महामार्गासाठी निवाडे झाले पण केंद्र सरकारकडून निधी येईना, त्यामुळे सोलापूरच्या विकासाचे मोठे तीनही प्रकल्प अधांतरीच दिसू लागले आहेत.

होटगी रोड विमानसेवेचे उद्घाटन झाले मात्र गेल्या अनेक महिन्यापासून डिजीसीएच्या केवळ एका परवानगीसाठी ही विमानसेवाही अधांतरीच आहे. याचबरोबर शहरातील उड्डाणपुले, एम आयडीसी संदर्भातील अडचणीही चालूच आहेत.

या विकासकामांना चालना देण्यासाठी कोणतेही लोकप्रतिनिधी सध्या पाठपुरावा करताना दिसून येत नाहीत. यामुळे शहर-जिल्ह्याची प्रगती होण्यापेक्षा अधोगतीकडेच वाटचाल दिसून येत असल्याची जाणकार नागरिकांची खंत आहे. नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांना रूळायला अजून ४ ते ६ महिने जाणार असून, त्यांचे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे नीट सुत जमले तर पुढील जिल्हा विकासाच्या गोष्टी मार्गी लागणार आहेत; अन्यथा जिल्हा विकास राम भरोसेच आहे.




### मुख्यमंत्र्यांनी सुचविलेल्या कामालाही लावली कात्री?

मुख्यमंत्र्यांनी १०० दिवस सात कलमी कार्यक्रम जाहीर केला, त्यात पंढरपूर विकास आराखड्यातील कामाचा समावेश केला. त्यासाठी टेंडर काढले, येत्या आषाढीपर्यंत पहिला स्तर तयार व पहिल्या मजल्याचे शेड तयार होईल, असे नियोजन आहे. पण आता टेंडरच स्थगित झाल्याने पुन्हा नव्याने टेंडर कधी निघणार की त्यात काही दुरुस्त्या होणार हे काहीच निश्चित नाही. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी सांगितले की, यात तांत्रिक अडचण आल्याने हे टेंडर थांबविले गेले आहे. वास्तविक तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठकीत निर्णय झाला होता; आता मंत्रीमंडळ बदलल्याचा परिणाम असल्याचे कळते.

### दर्शन मंडप निविदा थांबल्याने भाविकांतून तीव्र नाराजी

प्रयागराज, वाराणसीच्या धर्तीवर पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार केला. त्यातील एक भाग दर्शन मंडप तयार करण्याचा होता. त्यासाठी जानेवारीच्या अखेरीस टेंडर प्रसिध्दही केले गेले. पण दोन दिवसापुर्वी ते अचानक तांत्रिक कारण देवून स्थगित केले गेले. त्याचे कारण गुलदस्त्यात राहिले आहे. यामुळे वारकरी आणि दिंडीप्रमुखांनी खंतही व्यक्त केली आहे.

### उजनी जलपर्यटन बोटींच्याही कामावर कोसळली संक्रात!

शहर-जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या संधी त्यांच्या गावातच मिळाव्यात म्हणून उजनी जलाशय आणि परिसरात पर्यटनवाढीसाठी बोटींगसह अन्य सुविधा उभारण्याचा जवळपास २८२ कोटी रुपयांचा प्रकल्प सुरु केला गेला. याद्वारे जिल्हा प्रशासनाकडून बोटींगसाठी पाण्यातील स्थितीची माहिती गोळा करण्यासाठी सर्वे झाला. त्याचा अहवाल आला. त्यानंतर बोटींग खरेदीचे टेंडर निघाले. यातून पर्यटन विभागाने बोटींग खरेदीचे टेंडर काढले होते. मात्र उजनी जलाशय आणि तेथील सर्व जमीन ही कृष्णा-खोरे महामंडळ, जलसंपदा विभागाच्या ताब्यात आहे, त्यामुळे या विभागाने हरकत घेतली. त्यानंतर पर्यटन विभाग आणि जलसंपदा विभाग याच्यात करार करण्याचा प्रस्ताव २ महिन्यापूर्वी पाठविला गेला. पण अजुन निर्णय झाला नसल्याचे चालू काम थांबले. दरम्यान, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांच्या पातळीवर हा विषय रेटला जात नाही. त्यामुळे सहज शक्य असूनही कामासाठी निधी मिळूनही काम मार्गी लागेना अशी स्थिती आहे.

### ‘सुरत-चेन्नई’ जमीन भूसंपादनाचे बळीराजाचे तटविले पैसे

जवळपास ५१३.२५ किमी लांबीचा सुरत-नाशिक-अहमदनगर-सोलापूर इकॉनॉमिक कॉरिडॉर ६ पदरी महामार्ग चालू केला आहे. धाराशिव जिल्ह्यातील बहुतांश सर्व शेतकऱ्यांना भूसंपादनाचे पैसेही वाटप झाले आहेत. मात्र सोलापूर जिल्ह्यात ३२ गावांतून ४५०० शेतक-यांची जवळपास २०७ हेक्टर जमिनीचे निवाडे झालेत, त्यासाठी ४८९ कोटी रुपये लागणार आहेत. दोन वर्षापासून प्रस्ताव दिला पण अजून केंद्र सरकारच्या राष्ट्रीय महामार्गाकडून तो निधी मिळत नाही. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाने भूसंपादन प्रक्रियेची तयारी करून प्रस्ताव दिला, एनएचआयने केंद्रीय अर्थमंत्रालयाकडे पैसे मागितले, तेथून अजून निधी आला नाही. हा निधी कधी मिळेल हे अंधांतरीच आहे. या ६ पदरी रस्त्याचे काम का थांबले? हा सवालही कोणीही लोकप्रतिनिधी करीत नाहीत.




# कंबरेला पिस्टल लावून फिरणाऱ्याला अटक

**पंढरपूर येथे पोलिसांची कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ फेब्रुवारी -**

पंढरपुर शहरामध्ये कंबरेला पिस्टल लावुन फिरणाऱ्यास येथील शहर पोलिसांच्या गुन्हा प्रकटीकरण शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात घेतले. ही कारवाई गुरुवारी (दि.२०) करण्यात आली.

लखन चंद्रकांत ननवरे (वय ३५ वर्षे रा. आंबाबाई पटांगण, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर) असे पकडलेल्या संशयित इसमाचे नाव आहे. या कारवाईची शहर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, येथील शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळालेल्या गोपनिय माहिती नुसार गुरुवारी (दि.२०) शहरातील जुना दगडी पुलाजवळ नविन पुलाचे खाली गाळा क्र. ०३ मध्ये एक इसम संशयीतपणे वावरताना दिसला. त्यास पोलीस पथक पकडणेस जात असताना तो पळून जाणेचे तयारीत असताना त्यास पोलीसांनी गराडा घालुन जागीच पकडले. पकडलेले इसमास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव लखन चंद्रकांत ननवरे (वय ३५ वर्षे रा. आंबाबाई पटांगण, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर) असे असलेचे सांगीतले.

दरम्यान लखन ननवरे याच्या अंगझडतीमध्ये कमरेचे उजव्या बाजूस एक लोखंडी देशी बनावटीचे एक पिस्टल मॅक्झीनसह मिळाले. पिस्टल वापरण्याचा परवाना बाबत त्याला विचारले असता त्याने नसल्याचे सांगीतले. त्यानंतर ननवरे यास पंढरपुर शहर पोलीस ठाणेस आणुन पंढरपुर शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ११६/२०२५ भारतीय हत्यार कायदा १९५९ चे कलम ३ व २५ प्रमाणे व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे फिर्याद दाखल केली आहे.

ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग डॉ. अर्जुन भोसले, पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, पोसई राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, सपोफौ कल्याण ढवणे, पोलीस हवालदार सिरमा गोडसे, सुरज हेंबाडे, प्रसाद औटी, सचिन हेंबाडे, विठ्ठल विभुते, पोलिस शिपाई शहाजी मंडले, समाधान माने, पोलिस कॉन्स्टेबल बजरंग बिचुकले, निलेश कांबळे तसेच सायबर शाखा सोलापुर ग्रामीणचे पोलिस शिपाई रतन जाधव यांनी केली.

# पालखी मार्गाला निधी देण्यासाठी खासदारांना निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

शेळगाव (आर) येथील नागरी समस्या तसेच शेळगाव (आर) ते कळमण पालखी मार्ग रस्त्या करिता निधी मिळणे संदर्भात खा.ओमराजे निंबाळकर यांना निवेदन देण्यात आले. मराठवाडा व बार्शी तालुक्याचेचे प्रवेशद्वार म्हणून ओळख असणाऱ्या शेळगाव (आर) तालुका बार्शी या गावातील विविध नागरी समस्या तसेच शेळगाव (आर) ते कळमन आणि शेळगाव ते पांढरी माळ रस्ता विकास कामा करिता निधी मिळावा म्हणून धाराशिव मतदारसंघाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांची शुक्रवारी शिष्टमंडळाद्वारे भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

यामध्ये गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, विविध रस्त्यांची दुरुस्ती, विशेष करून शेळगाव ते कळमण रस्ता व पांढरी माळ यांच्याकडे जाणारा रस्ता हा अंदाजे पाच किलोमीटर रस्ता तयार करणे या कामासाठी विकास निधी मिळावा व पंचवीस वर्षापासून रखडलेला रस्ता पूर्ण व्हावा यासाठी निवेदन देण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषदेचे माजी कार्यकारी अभियंता तुकाराम देवकर अॅड. सुरेश गायकवाड अॅड. विश्वास देवकर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते बबलू अडसूळ प्रफुल्ल देवकर, पिंटू देवकर आदींनी शिष्टमंडळा व्दारे धाराशीव येथे जाऊन माननीय खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या समवेत चर्चा केली व मागण्यांचे निवेदन ही सादर केले. त्यावेळी माननीय खासदार ओमराजे निंबाळकर यांनी समस्या जाणून घेऊन त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला शिवाय लवकरच पहिल्या टप्प्यातील रस्त्याचे काम करण्याची हामी त्यांनी दिली. शिवाय संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करण्याच्या सूचना त्यांनी त्यांच्या खाजगी सचिवाना दिल्या. त्यामुळे गेली अनेक वर्ष त्या भागातील गावकरी व शेतकऱ्यांना होणारा त्रास लवकरच कमी होईल असे अशी शक्यता निर्माण झाली आहे. यासंदर्भात ग्रामस्थांकडून या रस्त्याच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात पाठपुरावा सुरू होता आता त्याला यश येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# बार्शी शहर परिसरात शिवजयंतीचा उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

बार्शी शहर व तालुक्यातील गावागावात शिवजयंतीच्या निमित्ताने शिवप्रेमींच्या उत्साहाला उधाण आले होते. छत्रपती शिवाजी महाराज की जय भवानी...जय शिवाजीच्या जयघोषात शिवजयंती साजरी झाली शिवप्रेमींनी छत्रपतींना अभिवादन केले. शिवजयंतीच्या निमित्ताने विविध मंडळांच्या वतीने शिवरायांचे महाआरती शिवभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

बार्शी शहरात नगरपालिकेच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या शिवसृष्टी येथील अश्वारूढ पुतळा परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई तसेच पुष्पमालांची सजावट करण्यात आली होती त्यामुळे शिवसृष्टीचे रूप आणखीनच खुलून दिसत होते बार्शी शहरातील शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी महाविद्यालयासमोरील अश्वारूढ पुतळा येथेही विद्युत रोषणाई तसेच फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला या दोन्ही ठिकाणी शिवप्रेमींनी गर्दी केली होती.

**सुयश विद्यालयाचे लक्षवेधक सादरीकरण**

बार्शीतील सुयश विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बाल शिवाजी तसेच मावळ्यांचा पेहराव केला होता. ढोल ताशांच्या गजरात लेझीम आदी खेळ प्रकारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. हे सादरीकरण लक्षवेधक ठरले.

**राज-विजय क्रीडा मंडळाची रॅली**

बार्शीतील राज विजय क्रीडा मंडळ व भाजपच्या वतीने माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली भगवंत मैदान येथे सकाळी १०.३० वाजता मोटरसायकल रॅली काढण्यात आली. बाजार समितीचे प्रशासक विजय राऊत यांच्यासह भाजप पदाधिकारी तसेच शिवप्रेमी यात उत्साहाने सहभागी झाले होते. महिला व युवती यात फेटा बांधून सहभागी झाल्या होत्या. महिला मोटारसायकलवर रॅलीच्या अग्रभागी होत्या. शिवरायांचा जयघोष करत ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून शिवसृष्टी येथे व त्यानंतर शिवाजी कॉलेज येथील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळा येथे नेण्यात येवून विसर्जित करण्यात आली. माजी आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महाआरती करण्यात आली.यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, बाबासाहेब कापसे, केशव घोगरे आदी उपस्थित होते.

**विविध मंडळांतर्फे शिवभोजन**

बार्शी शहरात युवा प्रतिष्ठान, शिवप्रेमी प्रतिष्ठान, महात्मा ज्योतिबा फुले भाजी मंडई, बप्पा ग्रुपच्या वतीने शिवभोजन करण्यात आले होते. हजारो शिवप्रेमींनी याचा आस्वाद घेतला.

**युवा प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबीर**

शहरातील हांडे गल्ली येथील युवा प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात १०२ शिवप्रेमींनी रक्तदान करून छत्रपती शिवरायांना अभिवादन केले.

**शहर भगवेमय, कमानी, विद्युत रोषणाईने लखलखाट**

बार्शी शहरात विविध मंडळांनी रस्त्याच्या कडेने तसेच रंगीबेरंगी विद्युत माळा, भगवे झेंडे लावले आहेत. शहरात चौकात भगव्या स्वागत कमानी उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे शहर भगवेमय झाले असून शहरात सर्वत्र विद्युत रोषणाईने लखलखाट आहे. काही मंडळांनी सामाजिक संदेश देणारे फ्लेक्स लावले आहेत.



## बार्शीत छत्रपती शिवरायांचा पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मध्यवर्ती पालखी सोहळा समितीच्या वतीने शहरातून परंपरेनुसार काढण्यात आलेल्या पालखी सोहळ्यात हजारो महिला, पुरुष व आबालवृद्ध सहभागी झाले होते.

उपळाई रोडवरील लहू चव्हाण यांच्या निवस्थानापासून हा सोहळा निघाला. शिवाजी महाविद्यालयाच्या आवारातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्या जवळ सायंकाळी ४ वाजता मान्यवरांच्या हस्ते जयघोषात प्रारंभ झाला. या पालखी सोहळ्यात अश्वावर बाल वेशातील मावळे स्वार झाले होते. सोबत शिवप्रेमी मावळे, विविध सामाजिक संघटनाचे तरुण कार्यकर्ते, आणि शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. छत्रपती शिवरायांचा जयघोष, पारंपरिक ढोल-ताशांच्या निनादात हा सोहळा प्रेरणादायी ठरला. शहरातील मुख्य मार्गांवरून पालखीचे मार्गक्रमण झाले. मार्गावर फुलांची सजावट, पारंपरिक वेशभूषेतील मावळे, घोडेस्वार आणि लेझीम पथकांच्या जोरदार सादरीकरणाने सोहळ्याला ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले आहे. सजवलेल्या पालखीत शिवरायांची मूर्ती ठेवण्यात आली होती. पालखी च्या आजूबाजूला भोई, अष्टप्रधान मंडळ त्याच वेशात सहभागी झाले होते. महिला पुरुष भगवे फेटे बांधून शिस्तबद्ध पणे चालत होते. शिवसृष्टी जवळ डीवायएसपी जालिंदर नालकुल, पोनि बालाजी कुकडे, विजय राऊत, किरण गाढवे यांच्या उपस्थितीत शिवरायांची आरती करण्यात आली.

# कर्णकर्कश सायलेन्सर बुलेट चालकांवर कारवाई

- १६ बुलेट गाड्यांचे सायलेन्सर जप्त
- बुलेटचालकांकडून १६ हजारांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

रात्री अपरात्री शहर, तसेच उपनगरातून फटाके किंवा बंदुकीतून गोळी सुटल्याप्रमाणे आवाज करणाऱ्या सायलेन्सरचा वापर बुलेटचालक करतात. मध्यरात्री गाढ झोपेत असलेल्या नागरिक फटाक्यासारख्या आवाजामुळे दचकून जागे होतात. कर्णकर्कश सायलेन्सरचा वापर करणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध सोलापूर शहर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला.

१६ बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याविरुद्ध दंडात्म कारवाई केली, तसेच सायलेन्सर जप्त करण्यात आले. पोलिसांनी केलेल्या कारवाईचे स्वागत नागरिकांनी केले आहे.

सोलापूर शहरात बुलेटचालक तरुण भरधाव वेगाने जातात. कर्णकर्कश सायलेन्सरमधून फटाके फुटल्यासारखे आवाज येतात, अशा तक्रारी या भागातील



नागरिकांनी पोलिसांकडे केल्या होत्या. त्यानंतर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी कारवाईसाठी विशेष पथक तयार केले. या पथकात अधिकारी, पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला. शहरातील वेगवेगळ्या भागात पोलिसांच्या पथकाने कारवाई करुन १६ बुलेटचालकांविरुद्ध कारवाई केली. कर्णकर्कश आवाज करणाऱ्या सायलेन्सर असणाऱ्या बुलेट ताब्यात घेण्यात आले. कारवाई करण्यात आलेल्या बुलेटचे सायलन्सर पोलिसांनी जप्त केले. अशा प्रकारचे सायलेन्सर वापरणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली. बुलेटचालकांकडून १६ हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

# नाट्याविष्कारातून घडले २१ वर्षातील स्त्री सक्षमीकरणाच्या प्रवासाचे दर्शन

- उद्योगवर्धिनीला २१ वर्षे पूर्ण
- स्नेहमिलनास सोलापूरकरांची प्रचंड गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

समाजातील आर्थिकदृष्ट्या वंचित महिलांची होणारी परवड ते अक्षरश: हजारो महिलांची आर्थिक स्वयंपूर्णता असा कौतुकास्पद उलगडत गेलेला प्रवास आणि त्या नाट्यमय प्रवासाला सोलापूरकरांची उत्स्फूर्तपणे मिळालेली दाद अशा चैतन्याने भारलेल्या वातारणात नाट्याविष्कारातून उद्योगवर्धीनी संस्थेच्या २१ वर्षांतील स्त्री सक्षमीकरणाच्या प्रवासाचे दर्शन सोलापूरकरांना घडले. तब्बल २० हजार गरजू महिलांना स्वावलंबी बनविणाऱ्या उद्योगवर्धिनी संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शुक्रवारी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित स्नेहमिलनास सोलापूरकरांनी तुडुंब गर्दी केली होती.

प्रारंभी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ प्रचारक उदय तथा तात्या जोगळेकर, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार प्रमोद कुलकर्णी, उद्योगवर्धिनी संस्थेच्या सचिवा मेधा राजोपाध्ये यांच्या हस्ते भारतमातापूजन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार प्रमोद






कुलकर्णी म्हणाले, महिला मृदू, हळवी, संवेदनशील असली तरी कठीण परिस्थितीत अत्यंत कठोरपणे संकटांचा सामना स्त्रीच करु शकते. राष्ट्रमाता जिजामाता आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे म ोठे आदर्श आपल्यासमोर आहेत. चंद्रिका चौहान यांनी एकट्याने सुरू केलेला प्रवास हजारो महिलांच्या साथीने २१ वर्षांमध्ये यशस्वी झाला ही कौतुकास्पद बाब आहे. यासाठी चंद्रिका चौहान यांचे उत्तम संघटन, नवीन शिकण्याची वृत्ती हे गुण वाखाणण्याजोगे आहेत, असेही श्री. कुलकर्णी म्हणाले. यानंतर उद्योगवर्धिनी संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'मी ते आम्ही' - प्रवास उद्योगवर्धिनीचा' हा नाट्यरूपातील कार्यक्रम सादर झाला. या नाट्याविष्कारात उद्योगवर्धीनी संस्थेच्या १५० महिला कलाकारांनी सहभाग घेत विविध प्रसंग सादर केले. अश्विनी तडवळकर यांनी याचे लेखन तर आमीर तडवळकर यांनी दिग्दर्शन केले.'मी ते आम्ही' - प्रवास उद्योगवर्धिनीचा' या नाट्याविष्कारात चंद्रिका चौहान यांचे बालपण, हलाखीचे दिवस, गरजू म हिलांना सोबत घेऊन आर्थिक स्थैर्य मि ळवण्यासाठी केलेली धडपड, कौटुंबिक हिंसाचारातून महिलांची केलेली मुक्तता, रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी केलेले मार्गदर्शन आणि सहाय्य, उद्योगवर्धीनी संस्थेची स्थापना, हजारो महिलांना मिळवून दिलेला रोजगार, कम्युनिटी किचन, फराळ, शिवणकाम आदींच्या माध्यमातून महिलांना दिलेली स्वयंपूर्णता, अन्नपूर्णा क्षुधाशांती योजना, शिलाई प्रशिक्षण व उत्पादन, मंगलदृष्टी भवन, सेवा पाथेय प्रकल्प, विविध बचतगटांना मार्गदर्शन व प्रशिक्षण, शांतसंध्या, सम ुपदेशन केंद्र आदी सेवाभावी प्रकल्पांची माहिती नाट्याविष्काराच्या माध्यमातून साकारण्यात आली. या नाट्यप्रसंगांना सोलापूरकरांनी प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी प्रास्ताविक केले. अंजली बलदवा यांनी सूत्रसंचालन तर ड. गीतांजली चौहान यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान, उपाध्यक्षा शोभा श्रीवास्तव, सचिवा मेधा राजोपाध्ये, खजिनदार वर्षा विभूते, संचालिका मृणालिनी भूमकर, ड. गीतांजली चौहान, सुलोचना भाकरे, गौरी मुळे, दीपाली देशपांडे, शुभांगी बुवा, स्मिता लाहोटी, कांचना श्रीराम, म ीनाक्षी सलगर, वृषाली कुलकर्णी, जयश्री भोसले,आदी उपस्थित होत्या.

### आगळा वेगळा सत्कार

या कार्यक्रमासाठी आलेल्या पाहुण्यांना सन्मानचिन्हासोबत उद्योगवर्धीनीच्या महिलांनी तयार केलेल्या सोलापुरी चादरीपासून बनवलेले जॅकेट, खणाचा शेला तसेच विविध खाद्य पदार्थ देऊन त्यांचा अनोखा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व सोलापूरकरांनाही उद्योगवर्धिनी संस्थेने बनवलेले गोमय साबण आणि खाद्यपदार्थ भेट देण्यात आले.

# माजी नगरसेवक पुत्रासह इतर ठेवीदारांची १५ कोटी ४० लाखांची फसवणूक

- शेअर बाजार सल्लागार पैलवानला ३ दिवस पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

शेअर बाजार मध्ये गुंतवणूक करण्याचे व मोबदला मिळवून देण्याचे आमिष दाखवून माजी नगरसेवक पुत्रासह इतर ठेवीदारांकडून तब्बल १५ कोटी ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शेअर बाजार सल्लागाराला ३ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश विशेष न्यायाधीश जे जे मोहिते यांनी दिल.

निवृत्ती मारुती पैलवान (रा. १०५, आर्यश रेसिडेन्सी, एसआरपीएफ कॅम्प जवळ, विजापूर रोड, सोलापूर) असे पोलिस कोठडी मिळालेल्याचे नाव आहे. याबाबत आशिष अशोक पाटील (वय २५, रा. न्यू संतोष नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निवृत्ती पैलवान याने सोलापूर येथील न्यू संतोष नगर जुळे सोलापूर येथील राहणारे माजी नगरसेवक पुत्र आशिष अशोक पाटील यांचा विश्वास संपादन करून त्यांना शेअर मार्केटम



ध्ये पैसे गुंतवणूक करण्यास सांगून त्यांना ५ टक्के दराने मोबदला देण्याचे आमिष दाखविले. त्यामुळे पाटील यांच्याकडून पैलवान याने वेळोवेळी रोख व ऑनलाईनच्या माध्यमातून एकूण ८० लाख रुपये घेऊन त्यांना ठरल्याप्रमाणे कोणताही मोबदला न देता त्यांचा विश्वासघात करून फसवणूक केली. याप्रकरणी आशिष पाटील यांनी विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने आरोपी निवृत्ती मारुती पैलवान व त्यांची पत्नी सुरेखा निवृती पैलवान यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झालेला होता.

सदर गुन्ह्याची व्याप्ती ही मोठी असल्याने सदर गुन्ह्याचा तपास गुण्याचा तपास हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासांमध्ये आरोपी निवृत्ती पैलवान यांनी एकूण १२४ ठेवीदारांकडून शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक करण्याचे व मोबदला मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल १५ कोटी ४० लाख रुपयाची फसवणूक झाल्याची बाब निष्पन्न झाली.

तसेच सदर फसवणुकीची रक्कम हे मोठे असल्याने व अनेक गुंतवणूकदारांना त्यांनी फसवणूक केल्याने महाराष्ट्र ठेवीदारांचे हित संबंधाचे संरक्षण कलम ३ प्रमाणे कलम वाढ करून निवृत्ती पैलवान यास २१ फेब्रुवारी २०२५ रोजी सोलापूर येथील विशेष न्यायाधीश जे.जे. मोहिते यांच्यासमोर हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायाधीश मोहिते यांनी पैलवान यास ३ दिवस पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला. या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे करीत आहेत. याप्रकरणांमध्ये मूळ फिर्यादीच्यावतीने ॲड. रियाज एन शेख, सरकार पक्षातर्फे ॲड. माधुरी देशपांडे यांनी तर आरोपी तर्फे ॲड. विद्यावंत पांढरे यांनी काम पाहिले.

# सोलापुरात एप्रिलमध्ये होणार आठवी आर्थिक गणना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

आर्थिक उत्पन्नाचे सोर्स काय काय आहेत, याची माहिती शासकीय कर्मचारी आता आपल्या घरी येऊन घेणार आहेत. लवकरच आठवी राष्ट्रीय आर्थिक गणना होणार असून, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय यासाठी तसेच म हानगरपालिका पातळीवर समिती गठीत करण्यात आली असल्याची माहिती सांख्यिकी कार्यालयाकडून



मिळाली.

घरात एकूण किती माणसं राहतात, घराच्या ठिकाणी कोणते व्यवसाय सुरू आहेत, घरातील प्रत्येकाचा उत्पन्नाचा सोर्स काय आहे, घरातील किती लोकांकडे मोबाईल आहेत, चार चाकी वाहन आहे का, यासह अनेक प्रश्न विचारून आर्थिक माहितीचे संकलन करणार आहेत.

यासाठी राज्यस्तरीय कमिटीकडून शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. १ एप्रिलपासून ही आर्थिक गणना सुरू होणार आहे. त्याची तयारी आतापासूनच सुरू केली आहे. आर्थिक गणना करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली असून, त्याची तयारी सांख्यिकी कार्यालयाकडून सुरू आहे. ६ जानेवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या सहीने आर्थिक गणना करण्यासंदर्भात पत्र काढले आहे. तालुका पातळीवर आर्थिक गणनेची जबाबदारी प्रांताधिकारी यांना देण्यात आली असल्याचीही माहिती मिळाली.

# 'स्थापत्य २०२५' प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

## स्थापत्य प्रदर्शन ही सोलापूरकरांसाठी सर्वोत्तम पर्वणी : मनपा अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

घर बांधणे आणि सजवणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. या स्वप्नपूर्तीसाठी स्थापत्य प्रदर्शन ही सोलापूरकरांसाठी सर्वोत्तम पर्वणी आहे, असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी केले. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सतर्फे स्थापत्य २०२५ या बांधकाम व अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी नॉर्थकोट मैदानावर अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते झाले.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील, मेटारोल इस्पात प्रा. लि. (जालना) चे व्यवस्थापकीय संचालक डी. बी. सोनी, मेटारोलचे प्रमुख वितरक इब्राहिम मोतीवाला, असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे, सचिव इंजि. मनोहर लोमटे, उपाध्यक्ष इंजि. भगवान जाधव, खजिनदार इंजि. संतोषकुमार बायस उपस्थित होते.प्रारंभी अतिरिक्त आयुक्त श्री. कारंजे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आणि फीत कापून 'स्थापत्य २०२५' प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. तसेच स्थापत्य २०२५ या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. 'स्थापत्य २०२५' या स्थापत्य प्रदर्शनाचे प्रायोजकत्व मेटारोल इस्पात प्रा. लि. जालना यांनी घेतले आहे.महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे म्हणाले, घर कसे बांधावे, घर बांधणीनंतर त्याची अंतर्गत सजावट



### सोलापूरकरांनी भेट देण्याचे आवाहन

स्थापत्य २०२५ प्रदर्शन २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी नॉर्थकोर्ट मैदानावर सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सर्वांसाठी पाहण्यास उपलब्ध राहणार आहे. सोलापूरकरांनी या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स अध्यक्ष प्रशांत मोरे यांनी केले.

कशी करावी याचे संपूर्ण मार्गदर्शन एकाच छताखाली सोलापूरकरांना असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सने स्थापत्य २०२५ या प्रदर्शनाच्या माध्यम ातून उपलब्ध करून दिले आहे. घरबांधणी आणि सजावटीसाठी चांगल्या दर्जाच्या मटेरियलची माहिती येथे मिळत आहे. मध्यम आर्थिक परिस्थिती असणाऱ्यांना या प्रदर्शनाचा मोठा फायदा होणार आहे. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स या संस्थेने अनेक लोकोपयोगी सामाजिक कार्य केली आहेत. या संस्थेशी संबंधित अभियंत्यांनी सोलापूरकरांना चांगली सेवा दिली आहे, असेही श्री. कारंजे याप्रसंगी म्हणाले.

उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील म्हणाले, स्थापत्यशास्त्रावर अवघे विश्व उभे आहे. स्थापत्यशास्त्राला मोठा इतिहास आहे. घर बांधताना विविध साहित्य माफक दरात आणि उच्च दर्जाचे मिळावे हा या प्रदर्शना मागचा उदात्त हेतू आहे. सोलापूरकरांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही तहसीलदार निलेश पाटील यांनी याप्रसंगी केले.मेटारोल इस्पात प्रा. लि. (जालना) चे व्यवस्थापकीय संचालक डी. बी. सोनी म्हणाले, सोलापुरातील अनेक इमारतींम ध्ये मेटारोल कंपनीचे स्टील वापरण्यात आले आहे. त्यामुळे सोलापूरकरांशी आमचा अनेक वर्षांपासून ऋणानुबंध आहे. ग्राहकांना अधिकाधिक चांगल्या दर्जाचे आणि फायद्याचे स्टील देण्याचा आमचा प्रयत्न आहे. सोलापूरकरांनी मेटारोल कंपनीचे स्टील वापरून घर मजबुतीची निश्चिती करावी, असेही मेटारोलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सोनी याप्रसंगी म्हणाले.नव्याने घर बांधू इच्छिणाऱ्यांसाठी तसेच घराच्या अंतर्गत सजावटीसाठीची अतिशय उपयुक्त आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती 'स्थापत्य प्रदर्शन २०२५' मधून सोलापूरकरांना देण्यात येत आहे. या प्रदर्शनात जागा विक्रीचे विविध प्रकल्प, प्रमोटर आणि बिल्डर, गृह कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था, सिमेंट कंपन्या, कन्स्ट्रक्शन केमिकल्स, स्टील, प्लंबिंग आणि सॅनेटरी वेअर, इलेक्ट्रिक मटेरियल, बांधकामास लागणारी अत्याधुनिक यंत्रे आणि उपकरणे, दरवाजे आणि खिडक्या, रूफिंग म टेरियल, टाईल्स, घरातील अंतर्गत सजावट, फर्निचर, लँडस्केपिंग, सोलार एनर्जी, लिफ्ट असे एकूण ७० स्टॉल आहेत.

या कार्यक्रमासाठी क्रेडाईचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इंजि. सुनिल फुरडे, असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे सहसचिव इंजि. जवाहर उपासे, सहखजिनदार इंजि. मनोज म हिंद्रकर, माजी अध्यक्ष इंजि. अमोल मेहता, कार्यकारी समिती सदस्य इंजि. वैभव होमकर, इंजि. चंद्रमोहन बत्तूल, इंजि. सिद्धाराम कोरे, इंजि. काशिनाथ हरेगावकर, इंजि. गणेश इंदापुरे, इंजि. शैराज होमकर, इंजि. रामकृष्ण येमुल, इंजि. सुनील दूधगुंडी, माजी अध्यक्ष इंजि. प्रकाश तोरवी, माजी अध्यक्ष इंजि. इफ्तेखार नदाफ यांची प्रमुख उपस्थिती होती. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष इंजि. भगवान जाधव यांनी परिचय करुन दिला. नर्मदा कनकी यांनी सूत्रसंचालन तर असोसिएशनचे सचिव इंजि. मनोहर लोमटे यांनी आभार प्रदर्शन केले.

# सीए सुशील बंदपट्टे यांचे नियोजन व संकल्पनेतून मध्यवर्ती शिवजन्मोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

सोलापुरात व बाळीवेस परिसरात गणेश उत्सव श्रीकृष्ण दहीहंडी उत्सव किंवा शिवजन्म उत्सव असो या व प्रत्येक सामाजिक कार्यास संघटित व तत्पर असलेले सीए सुशील बंदपट्टे यांची यावर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मध्यवर्ती शिवजन्मोत्सव अध्यक्ष म्हणून निवड झाली.

ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे व मंडळ मार्गदर्शक उत्सवास सुशील बंदपट्टे यांच्या नवनवीन संकल्पनेतून व नियोजनातून शिंदे चौक कन्या प्रशाला येथे मध्यवर्ती मंडळावतीने आमदार विजयकुम ार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते श्रींचे अधिवत पूजन करण्यात आले. यावेळेस श्री बंदपट्टे यांच्या संकल्पनेतून पारंपारिक व वेशभूषेत शेकडोंच्या संख्येत महिलांची मोटर गाडी भव्य शोभयात्रा करण्यात आली. या यात्रेत शेकडो हजारो महिलांनी सहभाग घेतला. यानंतर कन्या प्रशाला येथे शालेय मुलांचे आरोग्य यशस्वी तपासणी शिबिर व बांधकाम कामगारांना आधार देण्यासाठी नवीन व नूतनीकरणाचे मोफत शिबिर आयोजित केले. यानंतर छत्रपतींची सरकारी वकील मिलिंद थोबडे वकील प्रदीप सिंग रजपूत यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांची पूजा संपन्न झाली. यानंतर लालमाती व हलगीच्या कडाडयात लहानापासून ते मोठ्यापर्यंत कुस्ती स्पर्धा आयोजित केली होती. या कुस्ती स्पर्धेत कुस्ती प्रेमींकडून हजारोचे बक्षीस ठेवण्यात आले.



वीर पत्नींच्या हस्ते बाल शिवाजी पाळणा शिवजन्मोत्सव साजरा करून श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त पोलीस आयुक्त एम. राजकुमार व आमदार सुभाष देशमुख, उपआयुक्त श्री कबाडे यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तींचे विधिवत पूजन करून भव्य मिरवणूक प्रारंभ करण्यात आली. उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांच्या नियोजनातून अत्यंत मोठ्या प्रम ाणात ड्रोनद्वारे अत्यंत शांततेत व नियोजित यशस्वी झालेल्या उत्सवात समाजात शांतता व विश्वास निर्माण झाल्याने श्री बंदपट्टे यांचे व सर्व उत्सव मंडळातील पद्माकर काळे, श्रीकांत घाडगे, सुनील रसाळे, राजन जाधव, मनोज गादेकर, मीनाक्षी नलावडे, सुनंदा साळुंखे, लता ढेरे, सुनीता गरड, माधुरी चव्हाण व समाजातील अनेक मान्यवराकडून सी ए श्री बंदपट्टे यांचे यशस्वी उत्सवाबद्दल व पुढील सामाजिक कार्याबद्दल अभिनंदनांचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# राष्ट्रवादीच्यावतीने भुईकोट किल्ल्याची स्वच्छता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, उपाध्यक्ष सुजित अवघडे यांनी भुईकोट किल्ला येथे स्वच्छता अभियान उपक्रम घेऊन स्वच्छ भारत मिशनचा संदेश दिला.

राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून शिवजयंती निमित्त स्वराज सप्ताह तसेच संत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे ओचित्य साधून स्वच्छता अभियानाचे आयोजन केले. यावेळी माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, सहकार सेल विभाग अध्यक्ष भास्कर आडकी, अल्पसंख्याक विभाग शहराध्यक्ष अमीर शेख, ग्रामीण अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष नजीर इनामदार, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, वाहतूक सेल विभाग अध्यक्ष इरफान शेख, प्रज्ञासागर गायकवाड, दत्ता बनसोडे, सोशल मीडिया वैभव गंगणे, महिला आघाडी सचिव प्राजक्ता बागल, विजयानंद काळे, आनंद ईगंळे, विनायक रायकर, रोहीत गायकवाड, सुरज कांबळे, चेतन वाघमारे, हार्दीक सरवदे, संचीत कांबळे, बबली शिरसट, छोट्या निकाळजे, अमर कांबळे, मदन मुळे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पुण्यात १ मार्चला मातंग समाजाचे राज्यव्यापी महाअधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शनिवार दि. १ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता गणपती मैदान, सहकार नगर, पुणे येथे सायंकाळी मातंग समाजाचे राज्यव्यापी महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या अधिवेशनास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अधिवेशन होत आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षणात अ, ब, क, ड साठी आयोगाच्या शिफारसी येताच त्याची अंमलबजावणी करावी. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारकासाठी अतिरिक्त निधी देण्यात यावा. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न किताब मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज प्रकरणासाठीच्या जाचक अटी शिथिल कराव्यात आदी मागण्या या अधिवेशनात मांडण्यात येणार आहेत. या अधिवेशनासाठी सोलापूर जिल्ह्यातून पाच हजार समाज बांधव जाणार आहेत, असेही यावेळी सुरेश पाटोळे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस महादेव भोसले, सुधाकर पाटोळे, खंडू बनसोडे, अनिल बनसोडे, वसंत देडे , सोमनाथ कसबे, बालाजी घोडके, योगेश सोनवणे, लक्ष्मण दुणगे, वसंत देडे आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### प्रा. महेश बोराटे यांना पीएच.डी पदवी प्रदान

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

तळेहिप्परगा येथील प्रा. महेश बोराटे यांना मुंबई विद्यापीठाने मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विद्याशाखेतील पीएचडी ही पदवी प्रदान केली आहे.



त्यांचे संशोधन मार्गदर्शक डॉ. प्रशांत देशमुख (मुंबई) होते. प्रा. बोराटे यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी शिक्षण सोलापूर गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेजमधून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातील व्हिक्टोरिया टर्मिनस गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये प्री-डिग्री शिक्षण घेतले आणि ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगची पदवी मुंबईतील ऑटोमोबाईल्स कॉलेजमधून प्राप्त केली. तसेच त्यांनी मुंबई विद्यापीठातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये मास्टर डिग्री मिळवली आहे. सध्या ते पुणे येथील मिलिटरी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. प्रा. बोराटे यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक सुरेखा कोरे, लिंबराज जाधव, विनोद कदम, विनायक घाटे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांचे बुधवारी व्याख्यान

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त छत्रपती प्रतिष्ठान, बोरामणी यांच्या वतीने प्रसिद्ध इतिहासकार व शिवव्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांचे जाहीर व्याख्यान बुधवार २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता एस.व्ही.सी.एस हायस्कूल,बोरामणीच्या प्रांगणात होणार असल्याची माहिती छत्रपती प्रतिष्ठानचे मार्गदर्शक प्रा. डॉ. राज साळुंखे यांनी दिली.



### जखमी अवस्थेत मिळालेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

सोलापूर ते पुणे महामार्गावरील अग्रवाल कोल डेपोच्या बाजूला झाडीत बेशुध्दावस्थेत मिळालेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला. अशोक रामहरि गुत्ती (वय ४९, रा. तरटगाव, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. २१ फेब्रुवारी रोजी दुपारी सोलापूर ते पुणे महामार्गावरील हायवे लगत असलेल्या अग्रवाल कोल डेपोच्या बाजूला झाडीत अशोक गुत्ती हे बेशुध्दावस्थेत मिळून आले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे हवालदार बी जे कसबे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता गुत्ती यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. पूजा लवटे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पूर्व वैमनस्यातून चाकूने वार


**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

पूर्व वैमनस्यातून अमन हॉटेलजवळ चाकूने वार केल्याने एकजण जखमी झाला. मधुकर निवृत्ती कांबळे (वय ५५, रा. साईनाथ नगर भाग २, मजरेवाडी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास अमन हॉटेलजवळील ईस्माईल बेकरीजवळून जात असताना मधुकर कांबळे यांच्यावर बालाजी भिसे याने पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून चाकूने वार करून जखमी केले. जखमी अवस्थेत मधुकर यांना मुलगा प्रकाश कांबळे याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पैशाच्या कारणावरून तरूणास लोखंडी पाईपने मारहाण

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

नविन विडी घरकुल येथे पैशाच्या कारणावरून तरूणास लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आली. मोहन शिवाजी अनमल्लू (वय २९, रा. नविन विडी घरकुल, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २० फेब्रुवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास मोहन अनमल्लू यास घराजवळ वाजिद शेख व इतर एकाने पैशाच्या कारणावरून लोखंडी पाईपने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे मोहन अनमल्लू यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# ६२ हजार नागरिकांना मिळणार आज हक्काचा निवारा

- जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम
- ग्रामपंचायतींकडून लाभार्थ्यांची नावे डिजिटलवर प्रकाशित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत दिनांक २२ फेब्रुवारी रोजी एकाच दिवशी एका क्लिकवर ६२ हजार ९६७ घरकुल लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात पहिला हप्ता व मंजुरीच्या पत्राचे वितरण होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.



श्री. जंगम म्हणाले की, राज्यस्तरावरील मुख्य कार्यक्रम शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे असून राज्यातील यात २० लाख घरकुलांची मंजुरी पत्र व १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण पुणे येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार असून सदर कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, ग्रामीण गृहनिर्माण विभागाचे संचालक डॉ. राजाराम दिघे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. जिल्हास्तरीय कार्यक्रम नियोजन भवन सात रस्ता सोलापूर येथे दुपारी २ वाजता होणार असून प्रातिनिधिक स्वरूपात घरकुलांच्या ५०० लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व अनुदान देण्यात येणार आहे. तसेच त्याच दिवशी प्रत्येक तालुक्यात प्रातिनिधिक स्वरूपात ३०० लाभार्थ्यांना व ग्रामपंचायतस्तरावर उर्वरित सर्वच लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व अनुदान देण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय कार्यक्रमास सर्व खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, सर्व विभाग प्रमुखांना निमंत्रित करण्यात आले आहे. सर्व लाभार्थ्यांनी या घरकुल उत्सवासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी केले आहे.




**सोलापूर : प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोनमध्ये मंजूर झालेल्या लाभार्थ्यांच्या नावांचे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दर्शनी भागात फलक लावण्यात आले आहेत.**

**घरकुल लाभार्थ्यांची नावे डिजिटलवर :** प्रत्येक गावातील पंतप्रधान आवास योजना लाभार्थ्यांची नावे डिजिटलवर प्रकाशित करण्यात येणार आहे. ग्रामसभा आयोजित करून लाभार्थ्यांना मंजुरी पत्रे व पहिला हप्ता वितरित करण्यात येणार आहे. शिवाय ग्रामपंचायत व पंचायत समिती कार्यालयात राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमांचे लाईव्ह प्रक्षेपण दाखविण्यात येणार आहे.

**-डॉ. सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर**




# लक्ष्मीची पूजा करा बरकत येईल म्हणऱ्याने लांबविले मंगळसूत्र

### सोलापुरातील वेणुगोपाल नगरात घडलेला प्रकार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

घरात लक्ष्मीची पूजा करा असे म्हणून सांगणा-या व्यक्तीने पूजेत ठेवलेले मंगळसूत्र लांबविले. हा प्रकार वेणुगोपाल नगरात १९ फेब्रुवारी रोजी दुपारी पावणे एकच्या सुमारास घडला.

याबाबत निर्मला नागनाथ किणीकर (वय ४६, रा. वेणुगोपाल नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनोळखी व्यक्तीविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेच्या दिवशी यातील फिर्यादी आणि त्यांच्या सासू या घरात होत्या. त्यावेळी घराच्या बाहेरून आवाज आल्याने त्या बाहेर आल्या. त्यावेळी अंगात पांढरे कपडे व गळ्यात लक्ष्मीचा फोटो व कवड्याची माळ घातलेली व्यक्ती समोर उभी होती. त्या व्यक्तीने तुमला मल्हारी खंडोबा आहे ना, अशी विचारणा केली. त्यावर फिर्यादी हो म्हणाली. त्या व्यक्तीने फिर्यादीला घरात लक्ष्मीची पूजा करा, बरकत येईल, घरात पैसा येईल असे सांगितले. लक्ष्मीची घरात पूजा घालण्यास अकरा हजार लागतील असे तो व्यक्ती म्हणाला. परंतु तेवढे पैसे नाहीत फक्त १ हजार ५०० आहेत असे फिर्यादीने सांगितले. त्यावर त्या व्यक्तीने होकार दिला, परंतु पूजेला सोन्याचा दागिना लागेल अशी अट घातली. तेंव्हा फिर्यादीने त्यांच्याकडे सोने नसल्याचे सांगितले. मात्र त्या व्यक्तीने सासूच्या गळ्यातीलही चालेल, पूजेनंतर परत देतो असे सांगून फिर्यादीच्या सासूच्या गळ्यातीलज मंगळसूत्र पूजेसाठी काढून घेतले. त्यानंतर दिशाभूल करून त्या व्यक्तीने फिर्यादीच्या सासूचे मंगळसूत्र व रोकड असा सुमारे ३६ हजार ५०० रुपयांचा ऐवज घेऊन गेला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास हवालदार भांगे करत आहेत.



# मराठीच्या परीक्षेला ९६८ परीक्षार्थ्यांची दांडी

- दहावीच्या परीक्षांना झाली सुरुवात
- एका केंद्रावर आढळली कॉपी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्यात शुक्रवार २१ फेब्रुवारीपासून दहावीच्या परीक्षा सुरु होत असून १७ मार्चपर्यंत दहावी परीक्षा सुरू राहणार आहेत. दहावी परीक्षेसाठी एकूण ५९ हजार ५१५ परीक्षार्थींपैकी ५८ हजार ५४७ परीक्षार्थी हजर होते. तर ९६८ परीक्षार्थी गैरहजर होते. तर एका केंद्रावर कॉपी आढळून आले.

परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त करण्यासाठी शिक्षण विभागाने विविध नवीन अभियान सुरू केले आहेत. परीक्षा केंद्रांवरील कॉपीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रांवर सीसीटीव्ही व पर्यवेक्षकांजवळ मोबाईल झूम मिटिंग सुरु करण्यात आली आहे. शिवाय परीक्षा केंद्राबाहेरील गोंधळ व कॉपी रोखण्यासाठी ड्रोन कॅमेरा व व्हिडिओ शुटिंग सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षण विभागाचे कॉपीमुक्त यशस्वी होण्यासाठी महसूल, पोलीसही प्रयत्न करीत आहेत. शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी दहावीच्या मराठी विषयाची परीक्षा होती. बारावीच्या परीक्षेतील बदल पाहून दहावीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी केल्याचे दिसून आले. कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व शिक्षण अधिकारी सचिन जगताप यांच्या योग्य नियोजनामुळे दहावीच्या मराठी परीक्षेला कॉपी प्रकार दिसून आला नाही. परीक्षा केंद्राबाहेरून कॉपीचा पुरवठा होऊ नये यासाठी सर्वत्र पोलीस तैनात करण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनाकडून वॉररूम स्थापन करून कॉपीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. पर्यवेक्षकांच्या मोबाईलवरून झूम मिटिंगचा कॅमेरा सुरू करून संपूर्ण हॉलवर नियंत्रण ठेवले जात असल्याने परीक्षा सुरळीत व शांततेत सुरू आहेत. परीक्षा केंद्राचे केंद्रसंचालक व पर्यवेक्षक कॉपी होणार नाही, याची काळजी घेत आहेत. १८४ परीक्षा केंद्रांत दहावीच्या परीक्षा सुरळीत सुरू होते. शिवाय जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, माध्यमिक व प्राथमिक शिक्षण अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुखांचे भरारी पथकही परीक्षा केंद्रावर दिसून आले. सर्वच परीक्षा केंद्रावर केंद्रप्रमुख, तलाठी, ग्रामसेवक, शिक्षकांचे बैठे पथकही कार्यरत असल्याचे दिसून आले.



# फोटो व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार

### सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

सोशल मिडीयावर फोटो व्हायरल करण्याची धमकी देत विवाहितेवर जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत विवाहितेने दिलेल्या फिर्यादीवरुन दिपक हणमंतु पेद्दी (रा. बापूजी हौसिंग सोसायटी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता आणि आरोपी दिपक हे ओळखीचे आहेत. पिडीत महिला ही ८ फेब्रुवारी रोजी सकाळी कामाला कामाला जात असताना दिपक याने पिडीत महिलेचा पाठलाग केला. कर्णिक नगरजवळ दिपक याने पिडीत महिलेला बळजबरीने त्याच्या गाडीवर बसवण्याचा प्रयत्न केला. परंतु, पिडीत महिला ही गाडीवर न बसता ती तिच्या कामाच्या ठिकाणी निघून गेली. त्यानंतर दुपारच्या सुमारास दिपक याने पुन्हा पिडीत महिलेला गाठून तिला तु माझ्या गाडीवर बस नाही तर तुझे व माझे पूर्वीचे फोटो तुझ्या नवऱ्याला दाखवतो आणि सोशल मिडीयावर व्हायरल करतो अशी धमकी देत पिडीतेला त्याच्या गाडीवर बसविले. तेथून पिडीतेला दिपकने पुणे रोडवरील एका लॉजमध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवणी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

# ४ लाखांची खंडणी घेऊन अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी -**

महिलेला तिच्या मुलांना ठार मारण्याची धमकी देऊन ४ लाखांची खंडणी घेऊन तिच्यावर अत्याचार करणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन विक्रम भगवान भजनावळे (रा. सांगोला, जि. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत महिलेचा भाऊ व विक्रम भजनावळे यांची एकमेकांची ओळख आहे. त्यातूनच पिडीत महिला व भजनावळे यांची डिसेंबर २०२२ मध्ये ओळख झाली. या ओळखीतूनच डिसेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विक्रम भजनावळे याने पिडीत महिलेला तिच्या मुलांना ठार मारतो अशी धमकी देत वेळोवेळी जबरदस्तीने तिच्यावर अत्याचार केला. या दरम्यान विक्रम भजनावळे याने पिडीत महिलेला तुझ्या नावाची बदनामी करतो अशी धमकी देत सुमारे ४ लाख रुपयांची खंडणीदेखील घेतली. म्हणून पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. पोलिस निरीक्षक संगीता पाटील तपास करीत आहेत.



# सोलापूरच्या केळीला रशियात मागणी

### जिल्ह्यातील केळी निर्यातीला चालना मिळणार : किरण डोके

**तभा वृत्तसेवा । नंदकिशोर वलटे**
**करमाळा, दि. २१ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्यातील केळीला निर्यातीसाठी रशियामध्ये मोठी संधी उपलब्ध असून केवळ अरब देशांतील बाजारपेठेवर अवलंबून न रहाता भविष्यात या नऊ हजार कोटींच्या बाजारपेठेचा पर्यायी बाजारपेठ म्हणून विचार केला जाऊ शकतो, असे प्रतिपादन कंदर (ता. करमाळा) येथील केळी निर्यात किरण डोके यांनी भारतीय व्यापारी शिष्टमंडळासह रशिया दौऱ्यावरून आल्यानंतर व्यक्त केले.

आपेडाच्या वतीने भारतीय निर्यात श्रेणीतील खाद्य पदार्थांची विक्री व व्यावसाय संधीसाठी आयोजित रशिया दौऱ्यातील व्यापारी शिष्टमंडळात केळी निर्यातदार प्रतिनिधी म्हणून कंदर (ता. करमाळा) येथील केळी निर्यातदार किरण डोके यांनी सहभागी झाले होते. मास्को येथे दोन दिवस चाललेल्या द्विपक्षीय बैठक व चर्चेत सहभागी होऊन प्रतिनिधींनी विविध करार केले असून यामुळे भविष्यात सोलापूर जिल्ह्यातील केळी निर्यातीला चालना मिळणार असल्याची माहिती डोके यांनी दिली आहे.




**सोलापूर : कंदर (ता.करमाळा) येथील केळी निर्यातदार किरण डोके हे रशियातील मास्कोमध्ये रशियन व्यावसायिकांना सोलापूरच्या केळीविषयी माहिती देताना.**

भारत सरकारच्या व उद्योग व वाणिज्य मंत्रालयाच्या अंतर्गत कृषी आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण त्यांच्या वतीने केळी, भुईमूग आणि प्रक्रिया केलेली अन्न उत्पादने प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत रशिया येथील भारतीय दूतावासाच्या सहकार्यातून मास्को येथील हॉटेल हॉलिडे येथे अकरा व बारा फेब्रुवारी रोजी निर्यात प्रोत्साहन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये भारतीय व्यापारी प्रतिनिधी आपल्या उत्पादन नमुन्यासह व रशियन खरेदीदार व विक्री करणारे व्यवसायिक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती यामध्ये भारतीय व्यावसायिकांना आपल्या उत्पादनाच्या विक्रीसाठीच्या नवीन संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आपल्या उत्पादनाची जाहिरात व माहिती देण्यासाठी या कार्यक्रमांमध्ये सहभागी करण्यात आले होते.

यामध्ये केळी निर्यातदार प्रतिनिधी म्हणून किरण डोके यांनी सहभाग नोंदवला या शिष्टमंडळात जनरल मॅनेजर विनोदकुमार विद्यार्थी, वनिता सुधांशू संदीप शहा (आपेडा दिल्ली) भारतीय दुतावास कार्यालयातील रमेश पोद्दार वाणिज्य मंत्रालयाच्या मिस नतलीया, यांचा समावेश होता यावेळी त्यांनी रशियन व्यवसायिकांशी चर्चा करून आपल्या देशातील केळी व्यवसायसाठी तेथे असलेल्या संधींची माहिती घेतली यावेळी अनेक रशियन व्यावसायिकांनी केळी खरेदीसाठी रस दाखवला यावेळी काही करार करण्यात आले. रशियामध्ये भारतीय केळीला चांगला दर मिळू शकतो परंतु जास्त दिवस टिकणाऱ्या व साल जाड असलेल्या नवीन व्हरायटीची लागवड करणे गरजेचे आहे सध्या सर्वत्र लागवड असलेल्या जी नाईन या वाणाचे पुढचे व्हर्जन सध्या इतर देशांत लागवडीसाठी उपलब्ध झाले आहे. ते आपल्या देशात आणण्याचा विचार झाला पाहिजे. याबरोबरच केळीच्या दर्जा व गुणवत्तेमध्ये अनखी सुधारणा करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले भविष्यात रशियामध्ये नियमितपणे केळी निर्यात सुरू झाल्यास सोलापूर जिल्ह्यातील केळी उत्पादकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.



**नऊ हजार कोटींची बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते**

सध्या आपल्या देशातील केळी मुख्यत: अरब देशांमध्ये निर्यात होते. त्या ठिकाणी मिळणारा दर व रशियामध्ये मिळणारा दर यामध्ये फरक असून आठ ते नऊ हजार कोटींची बाजारपेठ आपल्यासाठी उपलब्ध होऊ शकते शासन पातळीवर सहकार्याचे प्रयत्न सुरू आहेत शेतकऱ्यांनी याबाबत तयारी ठेवली पाहिजे. या बाजारपेठेचा फायदा भारतीय केळी उत्पादकांना होऊ शकतो.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३६

**म्हणविती ऐसें आईकतो संत ।**
**न देखिजे होत डोळां कोणी ।।**

संसाराच्या मायाजाळात अडकलेल्या जीवाला जेव्हा थोडी फार सत्ता, संपत्ती, सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा हा जीव मी मध्ये जास्त गुंतत जातो. या अलिखित नियमाला कांही प्रवचन, कीर्तनकार किंवा टाळकरी, माळकरीही अपवाद नाहीत. कारण अनेक किर्तन, प्रवचनकार किंवा टाळकरी, माळकरी असे आहेत की ज्यांच्या पायावर चार लोक डोकं ठेवतात. तेव्हा अशा महाराजांचे डोके मी पणाने गगनाला भिडते. लोक यांना संत, महात्मा, महाराज, प्रवचनकार, किर्तनकार, महंत, आचार्य म्हणण्या अगोदर हेच लोक स्वत:ला ह.भ.प., गायनाचार्य, मृदंगाचार्य, वाचस्पती, वेदाचार्य, महाराज, महामुनी, महंत, सदगुरु



वगैरे भारदस्त शब्दांनी गौरवून घेतात. स्वत:च्या मुखातून स्तुती करणारा किंवा स्वत:ला संत म्हणून घेणारा संत असत नाही. एखाद्या मोठ्या व चांगल्या संत, महात्म्यांसमोर स्वत:ला संत म्हणून घेण्याचे यांचे धाडस होत नाही. तुकाराम महाराज म्हणतात मी नेहमी ऐकतो की, अनेक लोक स्वत:ला संत म्हणून घेतात. पण माझ्या दृष्टीस असा कोणी पडत नाही. या अनुषंगाने बोलतांना ते म्हणतात, म्हणविती ऐंसे आइकतां संत। न देखिजे होत डोळां कोणी।।

मुळात स्वत:ला मी असा आहे, तसा आहे, मी हा आहे, तो आहे, असे म्हणणेच चुकीचे आहे. उलट लोक जर आपणाला मोठेपण देत असतील तर तेही टाळायला हवे. हे सर्व संत, महात्म्यांनी आपणाला सांगायला हवे. कारण आपण संसारात अडकलेले जीव आहोत. त्यामुळे मीपणा आपल्यात असणारच आहे. आपणाला या मी तून बाहेर काढण्याऐवजी प्रवचन किर्तनकार स्वत:च स्वत:लाच संत म्हणून घेवू लागले तर आपण मीतून बाहेर पडणे तर सोडाच, पण ते स्वत:ही मीतून बाहेर पडणे अशक्य आहे. अध्यात्मिक क्षेत्रात स्वत:ला मोठेपण मिळवून घेणाऱ्यांची जणू कांही स्पर्धाच चालल्याचे आपल्या निदर्शनास येत आहे. स्वत:ची मोठ-मोठी रंगी-बेरंगी छायाचित्रे, त्यांचे छायाचित्र असलेल्या वह्या, पेन, त्यांचे नाम, माळा, विविध वस्तू उपलब्ध करून देण्यात अनेक स्वयंघोषित संत मग्न आहेत. स्वत:चा उदो-उदो करून घेण्यात तल्लीन असलेले हे लोक स्वत:च मायाजाळाच्या, मीपणाच्या दलदलीत अडकत चालले आहेत. त्यामुळे हे लोक आपणाला मी, अहंकार, द्वेष, ईर्षा, मत्सर, काम, क्रोध आदितून बाहेर काढतील अशी यांच्याकडून अपेक्षा करणे व्यर्थ आहे. उलट आपणच यांना माया, मोहातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. खऱ्या संत, महात्म्यांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलण्यास हे मूठभर ढोंगीच कारणीभूत आहेत. यांच्या ढोंगांना आपण बळी पडलो नाही तरी पुरेसे होईल. अशांचा आपल्याकडून स्वप्नातही उदो-उदो होऊ नये. या ढोंग्यात परीवर्तन करण्यासाठी ख-या संत महात्म्यांना पुढाकार घ्यावा लागणार आहे.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २२ फेब्रुवारी २०२५ | रामदास नवमी, संत मुक्ताबाई |
| विक्रम संवत् २०८०-८१ | यात्रा मुक्ताई नगर |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. नवमी (१३.१८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - ज्येष्ठा (१७.३९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - हर्षण (११.५५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२५.४३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.पत्नीसोबत मतभेद.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल. महिलांना सौख्याच्या घटना घडतील.

# भाव पडला; द्राक्ष बागायतदार हताश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

फेब्रुवारी महिन्याच्या आरंभात राज्यातील ज्या बागायतदारांची द्राक्ष मार्केटमध्ये गेली त्यांच्या मालाला चांगला दर मिळाला मात्र या चालू आठवड्यात व्यापारी बांधवांनी एकी करुन शेतकरी बांधवांच्या द्राक्षाचे भाव पाडल्याची खंत काही द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. २१) व्यक्त केली. दरम्यान, आहे तो भाव तरी आता कायम राहावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

फेब्रुवारीच्या सुरूवातीला द्राक्ष उत्पादकांच्या द्राक्षास प्रती किलोस लोकल मार्केटमध्ये ७० ते ९० रूपयांपर्यंत दर मिळत होता तर निर्यातक्षम द्राक्षास १०० ते १२० रूपयांपर्यंत दर मिळत होता. मात्र सध्या राज्यातील नाशिक, सांगली, विटा, कोल्हापूर, सातारा आणि सोलापूर विभागातील काही भागातून मोठ्या प्रमाणातून द्राक्ष बाजार समित्यांकडे येत असल्याने त्याचे दर व्यापाऱ्यांनी ४५ ते ६० रूपये प्रतिकिलोंवर आणले आहेत. तर विदेशात निर्यातीचे दर ८० ते ८५ रूपयांवर आले आहेत.

यामुळे द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. दरम्यान, अजून मोठ्या प्रमाणात द्राक्ष मार्केटमध्ये येणार असल्याने हा भाव स्थिर राहावा, अशी अपेक्षाही जाणकार शेतकरी बांधवांची आहे. तरच बागायतदारांना बागांचा खर्च जावून काहीतरी पदरात पडणार आहे. एप्रिल ते मे महिन्यातही सोलापूर विभागातील काही द्राक्ष आणि नगर जिल्ह्यातील उशिराने घेतलेली द्राक्ष येतात. आता किमान सध्या आहे तो दर स्थिर राहावा, इतकी बळीराजाची माफक अपेक्षा आहे.

**यंदा निसर्गाची कृपा मात्र हमी भावाचीही तितकीच गरज**

गतवर्षी अवकाळी पावसामुळे बागांचे काही प्रमाणात नुकसान झाले होते. यंदा वादळी वारे, अवकाळी पावसामुळे बागांचे नुकसान झाले नसल्याने शेतकरी बांधवांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. द्राक्ष बागांना जोपासण्यासाठी मजूरवर्ग, औषधे, अंतर्गत मशागतीसाठी मोठा आर्थिक खर्च असतो. यामुळे द्राक्ष उत्पादन झाल्यावर बाजारातून शेतकऱ्यांच्या मालास चांगला दर मिळणे गरजेचे आहे. बाजारात दर पडल्यास शासनाकडून द्राक्ष उत्पादनासही हमी भाव मिळावा, अशी अपेक्षा राज्यातील शेतकरी बांधवांची आहे.

**- हनुमंत गवळी,**
संचालक, राज्य द्राक्ष बागायतदार संघटना (पुणे विभाग)



# नूमवि शाळेत शिवजयंतीचा कार्यक्रम उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

नूमवि शाळेत शिवजयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वैभव गाढवे व योगेश लांडगे यांना आमंत्रित करण्यात आले होते.

शाळेच्या मुख्याध्यापिका व अर्चना कुलकर्णी व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आलेमुख्याध्यापकांनी शिवाजी महाराज कसे शूर धाडसी होते तसेच आपणही त्यांच्यासारखे शूर व धाडसी व्हायचे आहे असे मुलांना सांगितले त्यानंतर नर्सरीच्या विद्यार्थ्यांनी झुलवा पाळणा या गीतावर अतिशय सुंदर अशी नृत्य केले. तसेच मोठा गट सारंग मधील विद्यार्थ्यांनी आम्ही गड्या डोंगरचे राहणार हे गीत ही छान सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सौ स्नेहा गजेंद्र गडकर यांनी केले.



# मनपा प्राथमिक मंडळात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त तथा प्रशासन अधिकारी गिरीश पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक सुरेश कासार, निलोफर सय्यद, रूपाली कंची, प्रभात चव्हाण, हिरा गोरे, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, अविनाश शिंदे, रियाज आतार, अमोल गायकवाड, सचिन जाधवर, झाकीर सय्यद, लक्ष्मण पुजारी, गणेश नांदवटे, आनंद हिरेमठ, सतीश सरवदे, आषिकेश लोखंडे, रतन साळवे, भालचंद्र साखरे, खान, सायली ढोले आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांसह शिक्षकांना संगणक शिक्षण उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी संगणक विज्ञान शिक्षण सहज उपलब्ध करून देण्याच्या आपल्या बांधिलकीला अधिक बळकटी देत ॲमेझॉन इंडियाने आज महाराष्ट्रात ॲमेझॉन फ्युचर इंजिनिअर (एएफई) प्रोग्रामचा विस्तार जाहीर केला.

याआधी सुमारे ६००० विद्यार्थी आणि ७००० शिक्षकांपर्यंत पोहोचणाऱ्या या प्रोग्रामचा आता विस्तार करून १८ जिल्ह्यांमध्ये ११,००० हून अधिक विद्यार्थी आणि १३,००० शिक्षकांपर्यंत हा उपक्रम पोहोचला आहे.गेल्या वर्षीच्या तुलनेत ही मोठी वाढ आहे. ॲमेझॉन फ्युचर इंजिनिअर प्रोग्राम शिक्षकांना संगणक विज्ञान शिकवण्यासाठी आवश्यक साधने आणि स्रोत प्रदान करतो.



# बारामतीच्या कंपनीमध्ये ए.जी. पाटील पॉलिटिकलच्या विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिएशन नवी दिल्लीकडून पुनर्मानांकन प्राप्त झालेल्या विजापूर रोड वरील ए. जी. पाटील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची पिगॅगो व्हेयिकल प्रा. लमिटेड, बारामती या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली.

कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ए.जी.पाटील पॉलिटेक्निकच्या तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील १० विद्यार्थ्यांची निवड केली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एस.ए.पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले व उपप्राचार्य एस. के. मोहिते यांनी अभिनंदन केले.

महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्राध्यापक एम. एम. कुलकर्णी व शैक्षणिक समन्वयक एस. एन. गवंडी आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख आर. एस. मोटगी व विभागीय प्लेसमेंट समन्वयक जे. पी. पिंजार यांनी सदर प्लेसमेंट ड्राईव्ह यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**निवड झालेले विद्यार्थी**

मंजीत कुमार, घाटे समर्थ, पाटील साकिब, शिंदे लक्ष्मी, मुकेश कुमार, पाटील वैष्णवी, गोलू कुमार, म्हेत्रे मनोज, बिल्ला गायत्री व गुड्डा तृप्ती.



# सिंहगड महाविद्यालयात शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

केगाव येथील एन. बी. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी शिवछत्रपतींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळेस प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रविंद्र व्यवहारे, प्रा.शरद नवले, प्रा. सचिन घाडगे, ग्रंथपाल जी.एच. घोगले, व्ही.एस.बाबर, किशोर टाकळे, सचिन भानवसे व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. मेकॅनिकल विभागातील प्रथम वर्षातील विद्यार्थी आदित्य नागणे यांनी छत्रपती शिवरायांवर सुंदर कविता सादर केली.

इएनटीसी द्वितीय वर्षातील गौरव शिंदे, उदयनराजे भोसले, प्रणोती रणदिवे, इलेक्ट्रीकल विभागातील स्नेहा काळे, सिव्हिल विभागातील अंजली पवार, सीएसई विभागातील अनिकेत गुंड यांनी छत्रपती शिवरायांवर भाषणातून आपले विचार मांडले. सूत्रसंचालन इलेक्ट्रीकल विभागातील विद्यार्थीनी प्रणोती रणदिवे हिने तर आभार सिव्हिल विभागातील धैर्यशील साठे यांनी मानले.

# अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन नागपुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद, सोलापूर तर्फे आयोजित दहावे आखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन १९ आणि २० एप्रिल रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती केंद्रीय अध्यक्ष डॉ अजीज नदाफ व सचिव अय्यूब नल्लामंदू यांनी दिली.



संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड, स्मरणिका प्रकाशन व इतर कामे व जबाबदाऱ्या निश्चित करण्यासाठी लवकरच एक मिटींग घेण्याचे ठरले आहे. हे संमेलन अखिल भारतीय स्तरावर संपन्न व्हावे, यासाठी अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद यांच्या मुख्य आयोजकां सह भारतीय मुस्लीम परिषद, फुले शाहू आंबेडकर विचार मंच, छवी पब्लिकेशन्स, हिंदी साहित्य परिषद या सर्वांच्या सहकार्य घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. हे संमेलन व्यवस्थित पार पाडवे म्हणून नियोजन करण्यासाठी अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषद सर्व साहित्यिकांशी संपर्क साधत आहे. या अगोदर प्रा. जावेद पाशा कुरेशी यांच्या मार्गदर्शनाखाली दुसरे साहित्य संमेलन अजीज नदाफ यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे १९९२ मध्ये झाले होते आता नागपुरला पुन्हा दहावे साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान मिळाला आहे. या संमेलनासाठी नांव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क मुख्यसंयोजक प्रा.जावेद पाशा कुरेशी, नागपूर (८४५९५६३४८९ /९४२२१५४२२३) यांच्याशी संपर्क साधावा.



# उमाबाई श्राविका विद्यालयात शिवजन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

उमाबाई श्राविका विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांच्या उपस्थितीत शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविक मोहोळे यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रणिती शिंदे व प्रचिती जवळकर यांनी पार पाडली. विद्यार्थ्यांनी पोवाडे सादर करून सर्व शालेय परिसर शिवमय केला. सई वाघमारे व श्रीया शिंदे तसेच पियुषा हंचे, धनश्री मुद्दे, संस्कृती साळुंके, तक्षशिला काळे, श्रावणी पौळ, अमूल्या, अनुष्का साळुंके, ज्ञानेश्वरी शिंदे, विजय खर्डेकर, स्वरा मुळे यांनी शिव जीवन चरित्रावर आधारित पोवाडे सादर केले. इयत्ता ७ वी ब मधील आर्या जाधव, सिद्धगणेश, व साबळे यांनी कविता सादर केली. रामेश्वरी बंडगर, श्रद्धा कांबळे, प्रणिती लवंड, समृद्धी चव्हाण, प्रणिती पवार, श्रेया भोसले यांनी शिवाजी महाराजांच्या कार्यावर भाषणांमधून प्रकाश टाकला. प्रशालेतील कला शिक्षक प्रवीण कंदले यांनी शिवाजी महाराजांचे चित्र हुबेहूब साकारले.

प्रणाली तूपसमुद्रे हिने आभार मानले. कार्यक्रमास राजश्री आगरखेड यांनी विद्यार्थ्यांना आजच्या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कस्तुरे, पाटील, उंडे, हिरेमठ, कर्मचारी कुंभार, चंद्रशेखर कबाडे, हरी ऐवळे, सुनंदा भालेराव, कांबळे यांनी परिश्रम घेतले.

# मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये शिवजयती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ फेब्रुवारी-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये शिवजयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे व प्रमुख अतिथी म्हणून डी.ए. हत्तरे, पर्यवेक्षक दिंडारे उपस्थित होते.

यावेळी शिवाजी महाराजांच्या भूमिकेत संतोष पनशेट्टी तर जिजाऊंच्या वेशभूषेत श्राविका केसकर तर शिवबांचे मावळे या विविध रुपात प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी लक्ष वेधून घेतले. दामिनी हळ्ळे, तेजश्री पाटील, शुभ्रा गुरव या विद्यार्थ्यांनी पोवाडा सादर केला. संग्राम आवताडे, संध्या व्हनमाने, अनुष्का भूषण, श्रावणी मयनाळे, साजिया शेख, आशिया आत्तार, नागेश्री दिंडोरे यांनी महाराजांविषयी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक शुभ्रा गुरव, सूत्रसंचालन पवनराज स्वामी, आभार अपेक्षा कलालने मानले.

# कांचन फाउंडेशनच्यावतीने प्रयागराज येथील गंगाजलचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

प्रयागराज मधील पवित्र त्रिवेणी संगम मधील गंगाजल सोलापूर येथे आणून त्या पवित्र गंगेजलचे पूजन आज काशी जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते पूजन केले.



यावेळी गणेश चिंचोली,मल्लिनाथ सोलापूरे, गुरु शांत मोकाशी, आनंद दुलंगे, सागर अतनुरे, गुरुराज पदमगोंडा, ऋतुराज वाघमोडे, मल्लिनाथ पाटील, श्रीकांत दासरी, नूरअहमद नलवार, नागेश शहापुरे, आकाश तिपराधी, नितीन हलगी यांच्यासह कांचन फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. येणाऱ्या चार-पाच दिवसात सोलापुरातील १ लाख ८ (१०००08) कुटुंबीयांना घरपोच,प्रत्येक मंदिरात, भजन मंडळ, गणपती मंडळ, नवरात्र मंडळ, किर्तन मंडळ अशा विविध ठिकाणी वाटप करण्यात येणार आहे. तरी कांचन फाउंडेशनच्या वतीने सर्वांना विनंती आहे येणाऱ्या २६ तारखेला बुधवारी महाशिवरात्रीच्या दिवशी संपूर्ण कुटुंब या गंगेजलने अमृत्स्नान करावे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलकः- (५९) संचलन

१९३२ मधील दसरा उत्सवात १२०० गणवेशधारी स्वयंसेवक होते त्यांचे शिस्तबद्ध संचलन हा नागपूरातील सर्वांचा कौतुकाचा विषय होता. या उत्सवाचे प्राध्यापक माधवराव गोळवलकर प्रमुख पाहुणे होते. त्यांचा काशी शाखेतील उत्साही कार्यकर्ता असा परिचय डॉक्टरांनी केला होता व हेच प्राध्यापक पुढे सरसंघचालक गुरुजी झाले. शिस्तबद्ध संचलन डोळ्यांनी पाहणे व घोषाचा निनाद कानानी ऐकणे यामुळे नागरिकांच्या हृदयातील स्वाभिमान झंकृत होत असे. त्रयस्थांच्या हृदयात कौतुक, मित्रांच्या हृदयात अभिमान व शत्रूच्या हृदयात भय उत्पन्न होत असे. उज्वल भविष्यासाठी मिळालेल्या या विरासतीवर सर्वांना गर्व वाटत असे. कारण विरासतीचा खरा इतिहास फक्त संघ शाखेतच सांगतात / शिकवतात. संघ म्हणजे सामान्य शक्तीचे असामान्य गठबंधन आहे. संघ राष्ट्र उपासक आहे. संघाला आपल्या विरासतीवर गर्व आहे.

**- क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### हनुमाननगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सदाशिवनगर, दि. २१ फेब्रुवारी-**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हनुमाननगर तसेच जि प शाळा श्रीरामनगर, हनुमाननगर अंगणवाडी, व सरगर वस्ती अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्राच्या केंद्रप्रमुख नकाते व माजी विस्ताराधिकारी नकाते यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शाळेची माजी विद्यार्थिनी कोमल महादेव सरगर यांची लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेतून महसूल सहाय्यकपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार घेण्यात आला. चारही शाळेच्या विद्यार्थ्यांनी अतिशय बहारदार व देखना सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न केला. कार्यक्रमासाठी सरपंच उज्वला सरगर, लक्ष्मण धायगुडे, विजया कोळेकर खरात, गायकवाड, मोहिते, सुनील काळे, कृष्णदेव काळे, सावंत उपस्थित होते. कार्यक्रमासाठी झेंडे, काटकर, पोरे, वाघमोडे, सातपुते,सरगर, कचरे, रूपनवर यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन काटकर यांनी तर आभार पोरे यांनी मानले.



### खांडवी येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश

**बार्शी, दि.२१ फेब्रुवारी-**
वडाळा येथे मंगळवारी लोकमंगल कॉलेज ऑफ फार्मसी येथे पार पडलेल्या पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धेत आणि मॉडेल मेकिंग स्पर्धेत खांडवी येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसीतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश पटकावले. फार्मसीमधील अविष्कार आणि नवकल्पना या विषयावर आधारित एक दिवशीय राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर, मॉडेल सादरीकरण स्पर्धेमध्ये मायक्रो नीडल: अ ड्रग डिलिव्हरी सिस्टीम या विषयावर मॉडेल सादर करत महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विद्यार्थिनी पल्लवी बारंगुळे, साक्षी कापरे व सलोनी नरखेडकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तसेच युनिडायरेक्शनल आय व्ही फ्लूइड रेग्युलेटर यावर पोस्टर सादर करत प्रणिता कुंभार व आकांक्षा चव्हाण यांनी तृतीय क्रमांक पटकावला आणि व्हॅक्सिनेशन इंडस्ट्री या विषयावर मॉडेल मेकिंग स्पर्धेमध्ये अपूर्वा बारस्कर व साक्षी कांबळे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. सुजित करपे आणि प्रा. मनीषा लवटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व संस्था अध्यक्ष अरुणदादा बारबोले व सचिवा कल्पना बारबोले यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



### बार्शीत बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**
जनहिताचे कार्य पत्रकारितेतून संपन्न होणे महत्वाचे असते. या उद्देशाने लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ भक्कम असणे गरजेचे आहे, असे मत महाविद्यालयीन सार्वजनिक उत्सव समिती प्रमुख डॉ. शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केले. बाळशास्त्री जांभेकर यांनी समाजातील विधवा पुनर्विवाह, स्त्रियांचे शिक्षण, अंधश्रध्दा निर्मूलन याबाबतीत मोठे कार्य केले. त्यांना १० भाषा अवगत होत्या व शिक्षणातून आधुनिकतेची कास धरली. आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या २१३ व्या जयंतीचे औचित्य साधून श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालय प्राचार्य डॉ.ए.बी. शेख, डॉ. समाधान पवार, डॉ.बी.डी. पारसे, डॉ. अनिल कट्टे, डॉ. ए. बी. कदम, डॉ. राहुल पालके, श्री.पी.एम. जाधव उपस्थित होते.



### टेंभुर्णीतील नरसिंह प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंती साजरी

**टेंभुर्णी, दि. २१ फेब्रुवारी-**
नरसिंह प्रतिष्ठानतर्फे ऋषिकेश मोहन बोबडे यांना आदर्श समाजसेवक, साक्षी पलंगे स्वप्नपूर्ती, कुंदन लोंढे श्वानप्रेमी, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट हॉलीबॉल संघ हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी सई निबांळकर, वैष्णवी जाधव, भक्ती पवार यांनी शिवगर्जना दिली तसेच पृथ्वीराज शिंदे, अथर्व शिंदे, कार्तिकी शिंदे, दुर्वा लोंढे, आयुष गायकवाड, विराज पवार, सई लोंढे, सात्विक जाधव, ऋतुजा पवार, श्रेया पवार, जान्हवी पवार, अमोल महाडिक, अथर्व पवार, शौर्य हवालदार, यश पवार, अश्रफ काझी यांनी भाषण केले. यावेळी सुरजा बोबडे, सरपंच प्रमोद कुठे, डी. बी. गायकवाड, संजय कोठारी, योगेश बोबडे, सतीश नेवसे, राहुल टिपाले, जयंत कांबळे, गोविंद पोळ, पेपश पाटील, दादा कोल्हे, महादेव कोल्हे, सोमनाथ महाडिक, सचिन होदाडे, गणेश कांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन वजाळे यांनी केले.

# भाजपाच्या आजी-माजी जिल्हाध्यक्षांमुळेच घडले खुर्ची नाट्य

## सांगोल्याच्या कार्यक्रमातील प्रसंग; विद्यमान खासदार, आमदारांआधीच राखून ठेवले आसन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ फेब्रुवारी-**
सांगोला येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या भूमिपूजन कार्यक्रम ाप्रसंगी घडलेले खुर्ची नाट्य सध्या एक चर्चेचा विषय बनला असून या नाट्ट्यामागे भाजपाचे वादग्रस्त माजी जिल्हाध्यक्ष व आजी जिल्हाध्यक्ष असल्याच्या चर्चा सध्या या निमित्ताने होऊ लागल्या आहेत. त्यांनी विद्यमान खासदार, आमदार बसण्यापूर्वीच आपल्या खुर्च्या राखून ठेवल्याने व त्यावर अगोदरच ते आसनस्थ झाल्याने खुर्चीचा प्रश्न निर्माण झाला आणि त्यातून हा प्रसंग घडल्याचे सध्या समोर येताना दिसत आहे.

सांगोला येथे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाने स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा जलसिंचन योजना भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रम निमंत्रण पत्रिकेत मंत्री महोदयासह विद्यमान खासदार, आमदारांची नावे टाकण्यात आली होती. मात्र सदर कार्यक्रम भाजपाचे वादग्रस्त माजी जिल्हाध्यक्ष व विद्यमान जिल्हाध्यक्षांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच मंत्री महोदयांच्या पुढे पुढे करण्याचा पराक्रम केला आणि स्टेजवरसुद्धा मंत्री महोदयांच्या शेजारीच मान्यवर उपस्थित मंडळी बसण्यापूर्वीच हे महाशय आसनस्थ झाल्याने सदरचा दुर्दैवी प्रकार पुढे आला. प्रोटोकॉलनुसार जलसंपदा मंत्री, पालकमंत्री आणि विद्यमान खासदारांनाच येथे ठेवण्यात आलेल्या तीन खुर्च्या मिळायला हव्या होत्या. मात्र मंत्री महोदय बसल्यानंतर या आजी-माजी जिल्हाध्यक्षांनीच स्वतःच खासदार, आमदार असल्याचे समजत चक्क मंत्री महोदयाला चिकटून खुर्चीवर बसण्याचा प्रयत्न केला आणि या शासकीय कार्यक्रमाचे धिंडवडे उडवले. भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख हे तर निर्मला यादव प्रकरणात इतके बदनाम झाले होते की, भाजपाला त्यांचा राजीनामा घ्यावा लागला. असे हे वादग्रस्त महाशय शेजारीच बसल्याने जलसंपदा मंत्र्याचासुद्धा चेहरा काळवंडला तर विद्यमान भाजपा जिल्हाध्यक्षांनीही प्रोटोकॉल न पाळता मंत्र्यांच्या मागेच आपली जागा पटकावली.



### नागरिकांमध्ये चर्चांना उधाण

हा कार्यक्रम शासकीय होता. त्यामुळेच हे खुर्ची नाट्य घडले आणि नैतिकतेच्या आणि प्रोटोकॉलच्या बाबतीत तालुक्याला बिनकामाचे बेअब्रू व्हावे लागले. एका चांगल्या योजनेचे भूमिपूजन होत असताना या ऐतिहासिक घटना सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवण्यासारख्या असतात. मात्र अशा काही खुर्चीला चिटकून बसणाऱ्या वृत्तीमुळे असे ऐतिहासिक कार्यक्रम बदनाम होतात. अशाच प्रतिक्रिया या निमित्ताने ऐकावयास मिळत आहेत. चर्चांनाही उधाण आले आहे.

### उमरड येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ फेब्रुवारी-**
उमरड (ता.करमाळा) येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी झाली. शिवप्रतिनिमेचे पूजन करून डीजेच्या तालावर गावात सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. सिंहासनावर रूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची रथातून मिरवणूक काढण्यात आली. शांततापूर्ण वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीत गाव व परिसरातील अनेक उत्साही तरुण सहभागी झाले होते. नाचत गात शिवरायांच्या गाण्यांवर अनेक तरुणांनी ठेका धरला होता. या वेळी शिवकालीन पारंपरिक मर्दानी खेळांची प्रात्यक्षिक दाखवण्यात आली. त्यात दांडपट्टा, तलवार, काठी व ध्वज या खेळांनी अनेकांची मने जिकली. सकाळच्या वेळी शिवप्रतिनिमेचे पूजन करून शालेय विद्यार्थ्यांची भाषणे घेण्यात आली. मिरवणुकीच्या समारोपांतर सर्व शिवभक्तांना जेवणाची मेजवानी देण्यात आली.

## सुळेवाडी येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई

### प्रशासनाकडे टँकरची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२१ फेब्रुवारी-**
गतवर्षी माळशिरस तालुक्यात पाऊसमान कमी झाल्यामुळे पश्चिम भागातील गावात सध्या भिषण पाणीटंचाई जाणवत आहे.

विशेषतः सध्या सुळेवाडी गावात पिण्याच्या पाणयाची भिषण टंचाई जाणवत आहे. प्रशासनाकडे ग्रामपंचायतीकडे रितसर प्रस्ताव देऊन टँकरची मागणी केली आहे. सदरच्या मागणीवर माळशिरस पंचायत समितीचे पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांनी सुळेवाडी येथे येऊन प्रत्यक्षात पाहणी केली आहे. सदरचा प्रस्ताव माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनाही रितसर दिला आहे. टँकर सुरु करणयाची अत्यंत गरज आहे सध्या येथील नागरिक पाणयासाठी वणवण भटकत आहेत. सुळेवाडी येथील इरकरवस्ती भागात सध्या भिषण पाणीटंचाई जाणवत आहे. नागरिक पाणयासाठी राणोमाळ फिरत आहेत. विहीरींनी तळ गाठला आहे. त्यातून पाणी काढणे मुश्किल झाले आहे. सूळेवाडी ग्रामपंचायतीने प्रशासनाकडे टँकर साठी रितसर मागणी केली असताना जिल्हा प्रशासन मात्र म्हणतेय यंदा अजून कुठेही पाणीटंचाई नाही पाऊसमान चांगला झाला आहे. मग तालुका प्रशासनाने जिल्हा प्रशासनाला याबाबत अद्यापही कळविले नाही का असा प्रश्न निर्माण होत आहे. यंदा पश्चिम भागातील गावात भिषण पाणीटंचाई समस्या निर्माण होणार मे ते जूनपर्यंत पाणीपुरवठा करावा लागणार आहे. जनावरांना चारासुद्धा उपलब्ध करावा लागणार आहे.

याविषयी सुळेवाडीचे माजी उपसरपंच दुर्योधन सोलंकर व युवा नेते विक्रम सुळे यांना विचारले असता ग्रामपंचायतीनेही टँकर मागणीचा प्रस्ताव दिला आहे तर विक्रम सुळे यांनी मी स्वतः सुद्धा गटविकास अधिकारी यांच्याकडे टँकरचे लेखी निवेदन दिले आहे. तर गावातील काही लोकांनी आमदार उत्तमराव जानकर यांच्याकडेसुद्धा टँकरची मागणी केली असता त्यांनी याबाबत प्रशासनाला टँकर सुरू करण्याचे सांगितले आहे.

## समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण करा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ फेब्रुवारी-**
सोलापूर शहराला पिण्यासाठी उजनी जलाशयातून नदीवाटे पाणी सोडण्याच्या पद्धती मुळे २५ ते ३० टी एम सी अनाठायी वाया जाते .त्यामुळे सोलापूर शहराला पाणी पुरववठा करण्याकरिता तयार होत असलेल्या समांतर जलवाहिनीचे काम तात्काळ पूर्ण करून ती कार्यान्वित करावी अशी मागणी करमाळा तालुका उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रा. शिवाजीराव बंडगर यांनी केली आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी उजनी धरण ५० टक्के जास्त म्हणजे १११ टक्क भरले होते. यावेळी १२३ टी एम सी पाणी जलाशयात साठलेले होते. परंतु कालवा सल्लागार समिती च्या ढिसाळ कारभारामुळे व उजनी धरणाच्या खालील लोकप्रतिनिधींकडून बेकायदेशीरपणे पळवून नेण्याच्या आग्रहामुळे परिपूर्ण भरलेले धरण रिकामे होत असून दोन महिन्यात ५० टक्के पाणी संपलेले असून आज २१ फेब्रुवारी रोजी केवळ ६१% साठा शिल्लक आहे .असेच नियोजन बाह्य पद्धतीने पाणी सोडत राहिल्यास लवकरच धरण वजा मधे प्रवेश करेल.

यामुळेच समांतर जलवाहिनी तात्काळ सुरू होणे काळाची गरज आहे . जलवाहिनी सुरू झाल्यास २५ ते ३० टी एम सी पाणी वाचेल . कारण नदीवाटे एका आवर्तनास सहा ते सात टी एम सी पाणी सोडावे लागते . अशी कमीत कमी डिसेंबर नंतर पाच आवर्तन सोडावी लागतात. सोलापूर शहराला पिण्यासाठी आख्ख्या वर्षाला केवळ अडीच ते तीन टी एम सी पाणी लागते. जलवाहिनी सुरू झाल्यास नदीवाटे वाया जाणारे पाणी वाचेल असे प्रा.शिवाजीराव बंडगर म्हणाले.



सोलापूरला पिण्यासाठी औज बंधाऱ्यात पाणी सोडायच्या नावाखाली नदीवाटे पाणी नेले जाते. जाणून बुजून समांतर जलवाहिनीचे काम रखडवले जात आहे.

**-प्रा. शिवाजीराव बंडगर**



## शिक्षणातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास : पाटील

**अक्कलकोट, दि. २१ फेब्रुवारी-**
शैक्षणिक जीवनात गुणवत्तेबरोबरच आचरण महत्त्वाचे आहे. शालिनता, चारित्र्यसंपन्नता, वक्तशीरपणा हे विद्यार्थ्यांनी गुण आत्मसाद करावेत. आपण ठरवलेल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून अभ्यासाचे योग्य नियोजन केले तर यशाचा मार्ग सापडतो, असे मत अक्कलकोट येथील मंगरूळे हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक एस. टी. पाटील यांनी केले. के. बी. एन. माध्यमिक आश्रमशाळा नागनळ्ळी येथील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला.

यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य इस्माईल मुजावर, मुख्याध्यापक रईस शेख, वसतिगृह अधीक्षिका मंजुषा चव्हाण, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. शिवाजी चव्हाण, प्रा. रवींद्र नवले, मोहन गुरव उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते थोर समाज सुधारक महात्मा फुले व पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक बसवराज बिराजदार यांनी केले. यावेळी ऐश्वर्या चव्हाण,भाग्यश्री बिराजदार, विलास इटेनवरू या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शंभूलिंग बशेट्टी यांनी केले तर आभार मोहन गुरव यांनी मानले.

## स्वेरीत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ फेब्रुवारी-**
तरुणांनी मरगळ झटकून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा अंगिकार करावा.' असे प्रतिपादन कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ अधिसभा सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी केले.

येथील स्वेरी कॉलेज मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.मधुकर पाटील हे शिवविचार मांडत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव व प्राचार्य डॉ. जे.जी. जाधव हे होते. प्रास्ताविकात स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले. यावेळी स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, विश्वस्त बी.डी. रोंगे, विठाई पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन अमोल पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, डिग्री इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी सचिवा नम्रता घुले, अर्चना कोंगारी, प्रणव कवडे उपस्थित होते. गायत्री जाधव, समृद्धी पाटील व डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### मंद्रुपमध्ये गजानन महाराजांचा प्रकटदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**
सद्गुरू श्री गजानन महाराज की जय, गण गण गणात बोतेच्या नामस्मरणात शेगावचे गजानन महाराजांचा प्रकटदिन मंद्रुपमध्ये साजरा करण्यात आला. मंद्रुपमधील देशमुख वाडा येथे अनेक वर्षांपासून गजानन महाराज प्रकटदिन साजरा करण्यात येतो. यावेळी जय हनुमान भजनी मंडळाच्या वतीने भजन सादर करण्यात आले. गजानन महाराजांची आरती करून प्रकटदिन साजरा करण्यात आला. ॲड. राजेश देशमुख व हर्षवर्धन देशमुख यांच्या गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी मंद्रुपच्या भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी सुरेश पाटील, सुरेश टेळे, सुनिल व्हनमाने, बाळासाहेब देशमुख, सुरेश देशमुख, आर. डी. गोसावी, सुरेश टेळे, सुभाष वाघमोडे, सुभाष लिगाडे, प्रभाकर टेळे, नितीन टेळे, बाळासाहेब शेंडगे, प्रभाकर टेळे, सिकंदर शेख, सचिन देशमुख, अविनाश देशमुख, अनिल व्हनमाने, सुनिल टेळे आदि उपस्थित होते. उपस्थित भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले.



# पाऊस चांगला, पिकांची नासाडी; दूध महागणार

## बोरीउमरगे येथील श्री लक्ष्मीमाता थंडी यात्रेतील भाकवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ फेब्रुवारी-**
यंदा देशात खरीप हंगामातील पाऊस चांगला असून रब्बी हंगामात मात्र पाऊस कुठ होईल कुठ नाही यामुळे पिकांची नासाडी होईल. खुर्चीवर सरकार स्पस्ट बहुमताने अजून बसले नसल्याने सरकार कोसळणार असून सूर्य मावळण्याच्या भागात उद्रेक होऊन दंगा पेटणार असल्याची श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा भाकवणुकीत सांगितले आहे.

तालुक्यातील बोरी उमरगे येथे श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा भाकणूक अनादी काळापासून चालत आलेली असून आज पर्यंत भाकणूक खरे ठरत आले आहे. यंदा ज्वारीला तुरी पेक्षा जास्त भाव मिळणार असून व्यापाऱ्यांना ज्वारी मिळणे मुश्किल होईल. कांद्याला एकदम कमी भाव मिळणार असून शेतकऱ्याला फुकट फेकून द्यावा लागेल. लाला रंगांचे धान्याला व लसुणाला जास्त भाव मिळणार असून मिरची महाग होऊन स्वस्त होईल. सोनेचे भाव अजूनही वाढणार आहे. शेळी मेंढी महाग झाल्याने जेवण्याऱ्याला मटण मिळणे मुश्किल होईल. म्हशीचे संख्या कमी होत असल्याने दूध महाग होणार असून दूध मिळणे मुश्कील होईल. मुलांना लग्न जमवताना मुलगी मिळणे अवघड होणार असून रोगराई वाढल्याने जनतेला जीवन जगणे मुश्किल होणार आहे. बैल, म्हैस, शेळी, महागणार असून ज्यांचेकडे बैल तोच खरा शेतकरी अन्यथा बरेच जमीन पडिक पडणार आहे. कापड साडी वैगेरे मोठ्या प्रमाणात स्वस्त होणार आहे.

यावेळी महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील कलबुर्गी, विजयपूर, सोलापूर, उस्मानाबाद या जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.या भाकणुक यात्राचा उमरगे, मैंदर्गी, मिरजरगी, रामपूर, हत्तीकणबस कंठेहल्ली, संगोळगी (आ) चिक्केहल्ली या पंचक्रोशीतील भाविक भक्तच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली होती.



यापूर्वी श्री लक्ष्मी माता भाकवणुकीमध्ये महिला राज्य येणार म्हणून सांगितले होते. तेव्हा इंदिरा गांधीचे सरकार आले. सन्याशी राज्य येणार म्हणून सांगितले होते. तेव्हा अटलबिहारी वाजपेयी सरकार आले. भगवा राज्य येणार म्हणून सांगितले होते. तेव्हा मोदी सरकार आले. यंदा मात्र खुर्चीवर सरकार स्पष्ट बहुमताने अजून बसले नसल्याने सरकार कोसळणार असून सूर्य मावळण्याच्या भागात उद्रेक होऊन दंगा पेटणार असल्याची भाकवणुकीत सांगितले आहे.



## प्रा. रविंद्र दवणे यांना कोर्टीभूषण पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ फेब्रुवारी-**
शिवजयंती उत्सव समिती कोर्टी यांच्या वतीने कृषी, शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, व्यवसायिक, धार्मिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना शिवछत्रपती कोर्टी भूषण पुरस्कार देण्यात आला त्रिमूर्ती विद्यालय व रामराजे कोकाटे जुनिअर कॉलेज टाकळी चे प्राध्यापक रविंद्र दवणे यांना कलाक्षेत्रामध्ये उत्कृष्ट वक्तृत्व यामध्ये शिवछत्रपती कोर्टी भूषण पुरस्कार सहपरिवार बहाल करण्यात आला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक भर्तरीनाथ अभंग यांच्या हस्ते हा पुरस्कार बहाल करण्यात आला. प्रा. दवणे म्हणाले, कोणत्याही पुरस्कारापेक्षा आपल्या मातीतील पुरस्कार आपल्या ग्रामस्थांनी केलेला पुरस्कार हा सगळ्या पुरस्कारापेक्षा मोठा असतो याचा आम्हाला अभिमान आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## 'कवितेची निर्मिती प्रक्रिया'वर कवी इंद्रजीत भालेराव यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ फेब्रुवारी-**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात मराठी साहित्य परिषद आणि मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांचे कवितेची निर्मिती प्रक्रिया या विषयावर व्याख्यान झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे हे होते. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी केले. त्यांनी कवी इंद्रजीत भालेराव यांच्या साहित्यिक



कार्याचा संक्षिप्त परिचय उपस्थितांना करून दिला. आपल्या व्याख्यानात कवी इंद्रजीत भालेराव यांनी 'कविता कशी सुचते, तिची निर्मिती प्रक्रिया, शब्दांमागील भावना, प्रतिमा, रूपक, तसेच कवीच्या मनातील कल्पनांचे शब्दांमध्ये रूपांतर कसे घडते'. याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी तर आभारप्रदर्शन मराठी साहित्य परिषदेच्या पंढरपूर शाखेचे अध्यक्ष कल्याण शिंदे यांनी केले.



### संक्षिप्त वृत्त...



## दलित वस्ती निधीमध्ये गैरवापर; चौकशीच्या मागणीचे दिले निवेदन

**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

तालुक्यातील गुळपोळी येथील २०१७-१८ पासून २०२३-२४ या कालखंडातील निधी गैरवापर झाला आहे. अशी तक्रार समाधान अनिल चौधरी यांनी बार्शी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. शासनाच्या आदेशानुसार दलित वस्तीमध्ये ग्राम पंचायतच्या एकूण उत्पन्नापैकी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी १५ टक्के निधी हा राखीव असतो. सन २०१७-१८ पासून २०२३-२४ या कालखंडातील निधीचा गैरवापर झालेला आहे. या निधीचा कुठल्याही प्रकारे वापर केलेला नाही तरी ग्रामसेवक वैभव माळकर आणि तळेकर यांची चौकशी करुन त्यांचे निलंबन करण्यात यावे व मला योग्य तो न्याय मिळावा अन्यथा पंचायत समितीसमोर बेमुदत अमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा समाधान अनिल चौधरी यांनी दिला आहे. पुढे या तक्रारमध्ये काय होते. याकडे गुळपोळी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.



## टायगर ग्रुपच्या वतीने शिवजयंती

**अक्कलकोट, दि. २१ फेब्रुवारी-**

टायगर ग्रुपच्यावतीने शिवजन्मोत्सव निमित्य खंडोबा मंदिर पासून संजय नगर खासबाग पर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची भव्य स्वागत मिरवणूक काढण्यात आली. यंदाच्या वर्षी प्रथमच पाळणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवश्या गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी अंजली अमर शिरसाट सुजाता बिराजदार सुमन शिंदे जगदेवी बहिरेवार पुजा जेटगे आदिंसह सागर शिरसाट बिरु सरवदे गणेश पवार शुभम बहिरेवार आकाश जाधव आदिंनी परिश्रम घेतले. मंडळाच्या वतीने वेळोवेळी विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात असे मंडळाचे अध्यक्ष अमर शिरसाट यांनी सांगितले.



## संतोष पाटील महाविद्यालयाच्या चार खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

चंद्रपूर येथील महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात मंद्रूपच्या संतोष भीमराव पाटील महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांची निवड झाली. महाविद्यालयातील बी ए. भाग तीन मधील साहिल कादर यांची विद्यापीठाच्या खो-खो (पुरुष) संघात निवड झाली. मुलीमध्ये बी एस्सी भाग दोनमधील प्रीती बगले व ताईबाई चव्हाण यांची मुलींच्या खो-खो संघात निवड झाली. बी एस्सी भाग एकमधील मयुरी कोरे हिची बुद्धिबळ स्पर्धेत निवड झाली. सर्व खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शिवानंद तोरवी यांचे मार्गदर्शन लाभले. निवडीबद्दल सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष पी. एल. कोळी, उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे, सचिव एम. डी. कमळे, खजिनदार प्रा. व्ही. के. पाटील, सहसचिव प्रा. सुबोध कोळी, प्रभारी प्राचार्य डॉ. जवाहर मोरे यांनी अभिनंदन केले.

## हन्नूरच्या अनंत चैतन्य प्रशालेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**अक्कलकोट, दि. २१ फेब्रुवारी-**

अनंत चैतन्य प्रशालेच्या दहावीतील विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते विद्यादेवी सरस्वती व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संचालक शिवप्पा भरमशेट्टी, श्री.मल्लिकार्जून मसुती उपस्थित होते. यावेळी सईराणी पवार, स्मिता काळे, अबोली निकम, करिश्मा जमादार व चतुर्दश सुरवसे, ओंकार गावडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक अशोक साखरे यांनी विद्यार्थ्यांना आपले मनोबल खचू न देता अत्यंत धैर्याने व आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा, असे आवाहन करून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन समीक्षा बाबर, प्रास्ताविक भाग्यश्री स्वामींनी केले तर आभार करूणा हेगडे हिने मानले. कार्यक्रमास पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व दहावीतील विद्यार्थी उपस्थित होते.

# दर्शन, हॉल, स्कायवॉकबाबत अधिकारीच अनभिज्ञ

## पूरक्षेत्राचा संभ्रम कायम; सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कौशल्याकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२१ फेब्रुवारी-**

येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १२९ कोटी रुपयांमधून जो दर्शन हॉल तसेच सुमारे ५८ कोटी रुपयांमधून उभारण्यात येणाऱ्या स्कायवॉकचे काम होणार आहे त्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनाच चंद्रभागा नदीला पूर आल्यावर त्या पुराची तीव्रता शहरातील कोणत्या भागात अधिक असते याची पुरेशी माहिती दिसत नाही. कारण कोट्यवधी रुपये खर्चून जो दर्शन हॉल तसेच स्कायवॉक उभारण्याचा घाट जिल्हा प्रशासनाकडून घातला जातो आहे तो भाग चक्क पूरक्षेत्रात येतो असल्याचे पंढरपुरातील कुठलाही स्थानिक नागरिक डोळेबंद करुन सांगू शकेल. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या येथील अधिकाऱ्यांकडे या बाबतची विचारणा केली असता त्यांनी चक्क माहिती घ्यावी लागेल असे आश्चर्यकारक उत्तर दिले.

पंढरपूर शहरातील गोपाळपूर रस्त्यावर रिध्दीसिध्दी गणपती मंदिरा जवळ किंवा वैकुंठ स्मशानभूमीच्या आसपास सुमारे १२९ कोटी रुपये खर्चून वारकरी भाविकांसाठी सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज असा तीन मजली खास दर्शनहॉलची उभारणी केली जाणार आहे. या बरोबरच या दर्शन हॉलला लागूनच पुढे सुमारे एक किलोमीटर अंतरापर्यंत दर्शनरांगेसाठी स्कायवॉक देखील उभारला जाणार आहे. या स्कायवॉकसाठी सुमारे ५८ कोटी रुपये खर्चाची देखील तरतूद करण्यात आलेली आहे.

### तिच तिच कामे... पुन्हा पुन्हा करावी लागू नयेत ही अपेक्षा

शहरातील पुराचा प्रभाव असलेल्या पूरक्षेत्रात दर्शनहॉल, स्कायवॉक असे टप्पे पाडून पंढरपुरातील विकास कामे मार्गी लावण्यात जिल्हा प्रशासन धन्यता मानत आहे. या टप्प्या टप्प्याने होणाऱ्या विकास कामांमुळे पंढरपूरचा चेहरामोहरा बदलण्या ऐवजी भविष्यात तीच, तीच कामे पुन्हा पुन्हा करावी लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. कारण पंढरपूर कॉरिडोरच्या अगोदर दर्शनहॉल, स्कायवॉक उभारल्यास पुन्हा कॉरिडोर करताना ते अडचणीचे ठरणार आहे. मुळात दर्शन हॉल हा पूरक्षेत्रात तर स्कायवॉक हा चंद्रभागा नदीच्या दोन, तीन घाटांवरुन विठ्ठल मंदिराच्या दिशेने उभा केला जाणार आहे. कॉरिडोर मध्ये घाटांचा तसेच मंदिराकडे जाणाऱ्या वेगवेगळ्या रस्त्यांचा विकास करण्याचा घाट घालण्यात आला आहे. त्यामुळे घाटाचा किंवा रस्त्याची विकास कामे करताना शहराचा सर्वकष विकास व्हावा हीच स्थानिकांची धारणा आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून टप्याटप्याने विकास कामे केली जाऊ नयेत अशी रास्त मागणी पंढरपूरकर नागरिकांमधून जिल्हा प्रशासनाला केली जात आहे.

मुळात विठ्ठलाच्या दर्शनासाठी येथे येणाऱ्या वारकरी भाविकांना सोयीसुविधा मिळाव्यात यामध्ये कुणाचेच दुमत नाही. मात्र वारकरी भाविकांना सोयीसुविधा पुरविण्याच्या नावाखाली शहरात काहीही विकास कामे करण्यात देखील अर्थ नाही असे शहरातील सुज्ञ नागरिकांकडून बोलले जात आहे. याचेच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे पूरक्षेत्रात उभारला जात असलेला दर्शन हॉल आणि स्कायवॉक हे होय.

या अगोदर देखील तीर्थक्षेत्र पंढरपूरचे रुपडे बदलण्यासाठी कोट्यवधीं रुपयांचा शासन निधी अक्षरश:: पाण्यात गेल्याचे पंढरपूरवासियांनी उघड्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शासन निधी मातीमोल झाला मात्र पंढरपूरचा चेहरा मोहरा बदलण्या ऐवजी अधिकच विदरुप झाला.

कारण मागील काही वर्षापूर्वी शहरातील प्रमुख रस्त्यावरील अक्षरश: लोंबकाळणाऱ्या विजेच्या तारांचे जाळे कमी व्हावे यासाठी केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या कार्यकाळात पंढरपूरसाठी खास बाब म्हणून केंद्राकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करुन



भूमिगत वायरिंग (अंडरग्राऊंड वायरिंग) करण्याचा शहरात आणि उपनगरात घाट घालण्यात आला. मात्र ते काम इतके निकृष्ट झाले की त्यामुळे कोट्यवधी रुपये पाण्यात गेल्याचे वीज वितरण कंपनीचे अधिकारी खासगीत बोलताना सांगतात. शिवाय या कामामुळे शहरातील प्रमुख रस्त्यावर अक्षरश:: अतिक्रमण केल्या प्रमाणे मोठाल्या तांबड्या रंगाच्या विजेच्या पेट्या उभा राहिल्या. या तांबड्या रंगाच्या मोठाल्या पेट्या शहरात आज असून अडचण नसून खोळंबा ठरत आहेत. विशेष म्हणजे हे संपूर्ण काम ऊर्जा मंत्र्यांच्या निकटवर्तीनीच घेतले होते. त्यामुळे तेरी भी चूप आणि मेरी भी चूप अशी परिस्थिती झाली.

दुसरे उदाहरण द्यावयाचे झाल्यास शहरात पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरे उभारणीचा मोठा घाट घालण्यात आला. ही घरे बांधण्यासाठी पालिकेच्या वतीने जी जमीन देण्यात आली ती चक्क पूरक्षेत्रात येणारी दिली गेली. एरव्ही पूरक्षेत्रात बांधकामाला पालिकेकडून परवानगी दिली जात नाही मात्र या योजनेसाठी परवानगी देऊन चक्क दोन, तीन इमारती देखील उभ्या राहिल्या. मात्र आज पर्यंत हे काम पूर्ण झाले नाही. ज्या नागरिकांनी यामध्ये घरांचे बुकिंग केलेले होते त्यांना ती आजतागायत मिळाली नाहीत हे दुर्देव. दरम्यान आतादेखील जिल्हा प्रशासनाकडून वारकऱ्यांच्या सोयीसुविधांसाठी गोपाळपूर रस्त्यावर दर्शन हॉल व त्याला लागूनच पुढे एक किलोमीटर अंतरापर्यंत स्कॉयवॉक उभारला जातो आहे. त्यासाठी सध्या निविदा प्रक्रिया देखील राबविली जात आहे. साधारणपणे १५ मार्चपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली केले जाणार आहे. त्यांनाच पूरक्षेत्राबाबत माहिती नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी पूर रेषेबाबतची माहिती घ्यावी लागेल असे सांगितले. दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या अधिकाऱ्यांनी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यां समवेत दर्शनहॉल, स्कायवॉक उभारल्या जाणाऱ्या ठिकाणाची एकदा नव्हे तर अनेक वेळा पाहणी केलेली असेलच. मात्र तरी देखील या अधिकाऱ्यांनी बोलताना आपणाला पूर रेषेत हे बांधकाम येते का या बाबतची माहिती घ्यावी लागेल असे अजब उत्तर आज देऊन वेळ मारुन नेली. त्या नंतर या कामा बाबतची सविस्तर माहिती घेण्यासाठी कार्यकारी अभियंता निमकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता मिटकरे यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले. त्यामुळे मिटकरे यांच्याशी संपर्क साधण्यात आल्यावर आपल्या सुमधुर बोलण्याव्दारे सुरुवातीला त्यांनी नमस्कार, चमत्कार केला. त्या नंतर दर्शन हॉलसाठी १२९ कोटी तर स्कॉयवॉकसाठी ५८ कोटीं असे एकूण १८७ कोटी रुपये अंदाजे खर्च या दोन्ही कामांसाठी अपेक्षीत असल्याची माहिती दिली. मात्र दर्शन हॉल व स्कायवॉक पूर क्षेत्रात येतो का ? या विचारलेल्या प्रश्नावर ते देखील गोंधळून गेले. अर्ध्या तासात आपणाला कागदपत्रे समोर ठेवून माहिती देतो म्हणून सांगत त्यांनी आपले बोलणे आटोपते घेतले. विकासाच्या नावाखाली शासनाचा निधी अनाठायी खर्चून शहराचा विकास करण्या ऐवजी शहर भकास करण्याचा प्रयत्न होऊ नये एवढीच पंढरपूरकर नागरिकांची माफक अपेक्षा आहे.

## अक्कलकोट दक्षिण, उत्तर पोलीस ठाण्याच्या नव्या इमारतींना मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ फेब्रुवारी-**

आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अक्कलकोट तालुक्याकरिता असलेले उत्तर व दक्षिण पोलीस ठाण्यांच्या नव्या इमारतीला मंजुरी मिळवली आहे.



पोलीस ठाण्यांची नवी इमारत ही अत्याधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानेयुक्त असणार आहेत. पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासह खात्याला लागणारी सर्व साधने उपलब्ध केली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहयोगाने दोन्ही पोलीस ठाण्याचे रुपडे आ. कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून पालटणार आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी जनतेकरिता उत्तर व दक्षिण पोलीस ठाणे एका छताखाली येण्याकरिता १०.३४ कोटींचा निधी मंजूर करून प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली आहे. यामुळेच दक्षिण पोलीस ठाण्याचे तात्पुरते स्थलांतर करण्यात आलेले असून प्रशस्त जागा मिळालेली आहे. या पोलीस ठाण्याचे भौगोलिक हद्द पाहता विश्राम धामचा पर्याय निवडण्यात आलेला आहे. दोन्ही पोलीस ठाणे एकत्रित होत असतील ही बाब स्वागताहार्य आहे. तर उत्तर पोलीस ठाण्याच्या जागी उपविभागीय पोलीस अधीकरि यांचे कार्यालय होण्याची मागणी पुढे येत आहे.

## विद्यापीठात डॉ. राहुल पालके लिखित 'कर्माक्षरे'चा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावर आधारित डॉ. राहुल पालके लिखित 'कर्माक्षरे' या चरित्रात्मक ग्रंथाचा सन्मान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवार यांच्या हस्ते करण्यात आला.




याप्रसंगी कर्माक्षरे या पुस्तकाच्या १५ प्रती विद्यापीठाला भेट दिल्या. याप्रसंगी प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, संस्थेचे सचिव श्री. प्रकाश पाटील व खजिनदार जयकुमार उर्फ़ बापू शितोळे, प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समाधान पवार व डॉ. शशिकांत गायकवाड, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. अनिल घनवट, सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे हे उपस्थित होते. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर विद्यापीठात श्री.जयकुमार शितोळे यांचे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. कार्यकारिणी सदस्य व्ही. एस. पाटील, विश्वस्त डॉ. सी. एस. मोरे, प्राचार्य डॉ. रत्नदीप, सोनकांबळे, प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पालके यांनी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या कार्याचा विविधांगी दृष्टिकोनांतून परामर्श घेतला आहे. मामांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्याच्या क्षेत्रातील योगदान कित्येक पिढ्यांसाठी उज्ज्वल ठेवा आहे. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृती संग्रहालय हे मामांच्या चिरंतन विचारांचे सजीव दर्शन आहे. या पुस्तकाला जयकुमार शितोळे यांची प्रस्तावना लाभलेली आहे. या कार्यक्रमासाठी सोलापूर व धाराशिव जिल्हयांमधील सदस्य उपस्थित होते.

## सदाबहार गीतांची बहारदार मैफिल 'प्रेमाला उपमा नाही'

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ फेब्रुवारी-**

वैश्विक प्रेम दिवसाचे औचित्य साधून प्रेमाला उपमा नाही हा अवीट हिंदी गीतांचा बहारदार कार्यक्रम बार्शीतील ज्येष्ठ गायक कलावंतांनी सादर केला. यशवंतराव चव्हाण सभागृहात संपन्न झाला.

मायबोली सांस्कृतिक मंडळाचे उपाध्यक्ष जवाहर माढेकर, वृक्षसंवर्धन समितीचे प्रमुख उमेश काळे, बार्शी हेल्थ क्लबचे प्रमुख भगवान लोकरे आणि पवन देशमुख यांच्या हस्ते बार्शीचे आराध्य दैवत भगवंत व कलेची देवता नटराज प्रतिमेचे पूजन करुन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.




डॉ. मदन देगावकर, वर्षा रसाळ, सूर्यकांत वायकर, मधुसूदन चांडक, प्रा. रुपाली शिंदे, डॉ. तेजस्वी गपाट यांनी गीते सादर करुन रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. माधुरी शिंदे व प्रा. मंजुषा राऊत यांनी उत्तम केले.

विशेष बाब म्हणजे या संपूर्ण कार्यक्रमाला बार्शीचे विद्यमान आमदार दिलीपराव सोपल सुरुवातीपासून शेवटपर्यंत उपस्थित राहून त्यांनी प्रत्येक गीताचा मनमुराद आनंद घेतला. भरभरुन दाद दिली. कलाकारांचे त्यांच्या गीतांच्या निवडीचे आवाजाचे कौतुक केले. तसेच त्यांनी निवेदकांच्याही भारदस्त व मधुर वाणीचे अभिनंदन केले व प्रोत्साहन दिले.

स्मार्ट अकादमीचे सचिन वायकुळे यांनी उपस्थित राहून कलाकारांचे व निवेदकांचे कौतुक केले. साजन, जवानी दिवानी, गीत,आराधना, कश्मीर की कली, ब्रह्मचारी, शागिर्द, तेरे घर के सामने, अशा चित्रपटांमधील जुन्या श्रवणीय गीतांची मेजवानी कलाकारांनी सादर केली.

कार्यक्रमास ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था, वृक्ष संवर्धन समिती, बार्शी हेल्थ क्लब, स्वामी समर्थ संगीत क्लास आणि अनेक विविध संस्थांचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

प्रेक्षकांच्या अफाट गर्दीने व उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही मैफील रंगतदार व अविस्मरणीय झाली. सर्व कलाकार, निवेदक यांचा सत्कार आ. दिलीप सोपल यांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता सीमा या चित्रपटातील तू प्यार का सागर है या गीताने झाली.



## चेअरमनपदी वामन येलमार यांची निवड निश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा पोलीस कर्मचारी सहकारी सोसायटीवर सत्ताधारी पॅनलचा पराभव करून परिवर्तन विकास आघाडीने दणदणीत विजय मिळवल्याचे विजयी उमेदवार वामन यलमार यांनी सांगितले.

जिल्ह्यातून ४ हजार सभासद आहेत. या सोसायटीची स्थापना सन १९२७ रोजी देश स्वतंत्र्यापूर्वी झालेली आहे. जिल्हा पोलीस सोसायटीवर दादासाहेब सरवदे (सोलापूर), वामन यलमार (पंढरपूर), सचिन वाकडे (सोलापूर), जयशंकर पवार (सोलापूर), अविनाश चव्हाण (सोलापूर), विश्वजीत हंचे (सोलापूर), बिराप्पा होनमाने (सोलापूर), सचिन बारंगुळे(पंढरपूर), विठ्ठल गायकवाड (सोलापूर), ज्योती यजमाने(सोलापूर), वंदना अहिरे (मंगळवेढा), राहुल फुटाणे (सोलापूर), किरणकुमार माने (सोलापूर), रामचंद्र जाधव (अक्कलकोट) अशी विजयी उमेदवारांची नावे आहेत. पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे तुळजाभवानी देवीचे दर्शनस आले असता शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख बापुसाहेब भोसले यांच्या वतीने त्यांचा स्वागत सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा प्रमुख मोहन पणुरे, दत्ताअण्णा साळुंके, यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे राष्ट्रीय 'ग्रामोदय' परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ फेब्रुवारी -**

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या कॅम्पसमध्ये दिनांक २७ व २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय ग्रामोदय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पत्रकार परिषदेमध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या कॅम्पस संचालक बाळ राक्षसे यांनी दिली. यावेळी पत्रकार परिषदेस डॉ. हिना खातुन, डॉ. गजानन हिवाळे, गणेश चादरे, आनंद भालेराव, शंकर ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



दि.२७ फेब्रुवारी रोजी परिषदेच्या उदघाटन प्रसंगी, ग्रामीण विकास व पंचायतीराज मंत्री मा.ना. जयकुमार गोरे, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आदर्श गाव कार्यक्रमाचे कार्यकारी संचालक तथा हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव पवार, ग्रामीण आणि आदिवासी विकास तज्ञ गजानन डांगे, उपविभागीय जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, मुंबईचे कुलसचिव नरेंद्र मिश्रा, कॅम्पसचे संचालक प्रो. बाळ राक्षसे, डॉ. हिना खातुन आणि ग्रामीण विकासात कार्यरत असलेले देशभरातील नामवंत तज्ञ, संशोधक, प्राध्यापक, विध्यार्थी, सरपंच, महिला बचत गट, शेतकरी कंपनी प्रतिनिधी उपस्थित असणार आहेत. तसेच दि.२८ फेब्रुवारी रोजी समारोपीय कार्यक्रमासाठी परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचा बीज विषय शाश्वत ग्रामीण विकासाची पुनर्रकल्पना: वाटचाल आणि आव्हाने असा आहे. याचबरोबर या बीज विषयाच्या अनुषंगाने, ग्रामीण संस्थांचे बळकटीकरण आणि शासकीय धोरण, ग्रामीण भागातील शिक्षण, ग्रामीण भागातील आरोग्य, ग्रामीण भागातील पाणी संकट आणि उपाय योजना, ग्रामीण उद्योजकता, अर्थ पुरवठा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरणीय शाश्वतता, शेती आणि उपजीविका या विषयांवर देशभरातील तज्ञ, संशोधक, प्राध्यापक आणि विध्यार्थी आपले शोध निबंध सादरीकरण करतील व तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत.

ही राष्ट्रीय 'ग्रामोदय' परिषद विकसित ग्राम, विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारतासाठी प्रेरणादायी आणि महत्वपूर्ण असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# धाराशिवमध्ये गोवंशीय जनावरांचे मांस वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ फेब्रुवारी -**

गोवंशीय जनावरांचे मांस विक्रीसाठी वाहतूक करत असलेल्या दोन आरोपींविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धाराशिव शहरातील खिरणी मळा परिसरात दि. २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७:२० वाजता पोलिसांनी ही कारवाई केली. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, संशयित पिकअप वाहन (एमएच २५ बी ७७७७) थांबवून तपासणी करण्यात आली. वाहनाची झडती घेतली असता सुमारे ११०० किलो गोवंशीय जनावरांचे मांस आढळून आले. गुन्हा दाखल आरोपी खुर्शीद पाशा शेख (वय ४०, रा. दर्गा रोड, फरासा गल्ली, धाराशिव), अमिर मुख्तार सय्यद (रा. खाजानगर, ता. जि. धाराशिव) हे दोघेही गोमांस विक्रीसाठी वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.



त्यामुळे धाराशिव शहर पोलिसांनी सदर व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ च्या कलम ५ (सी) आणि ९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत असून, ही वाहतूक कुठून आणि कुठे केली जात होती. याचा शोध घेतला जात आहे.

धाराशिव शहरात यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याने पोलिसांकडून सतर्कता बाळगली जात आहे.

# कॉपीमुक्त : मंगरूळ केंद्रावर दहावी परीक्षेस सुरवात



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२१ फेब्रुवारी -**

सन २०२४ -२०२५ या शैक्षणिक वर्षातील दहावी बोर्ड (एस.एस.सी.) परीक्षेस मराठी या विषयाने तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे सुरवात झाली असून पालक, शिक्षणप्रेमी नागरिक, शिक्षक यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या व कॉपीमुक्त परीक्षा देण्याचे आवाहन केले.

मंगरूळ परीक्षा केंद्रावर परिसरातील ६ शाळांचे २३६ विद्यार्थी विद्यार्थिनी परीक्षा देत असून यामध्ये दोन दिव्यांग विद्यार्थीही परीक्षा देत आहेत. मराठी या विषयासाठी २३६ पैकी २३४ विद्यार्थी उपस्थित होते तर २ विद्यार्थी अनुपस्थित होते. या परीक्षा केंद्रावर १० पर्यवेक्षक व ४ शिक्षकेतर कर्मचारी परीक्षा सुरळीत व व्यवस्थित पार पाडण्यासाठी प्रयत्न करत आहेत.दहा वर्गात प्रत्येकी पंचेविस विद्यार्थ्यांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या परीक्षा केंद्रप्रमुख तथा मंगरूळ जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक शिवाजी राठोड व इंदिरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुदर्शन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहेत यासाठी मंगरुळ जिल्हा परिषदेचे वाघमोडे, तनपुरे, सरडे, साठे, फुगारे हे परिश्रम घेत आहेत.

# २५ फेब्रुवारीला रांजणी येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ फेब्रुवारी -**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत २५ फेब्रुवारी रोजी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा सकाळी १० वाजता साई कॉलेज कॉम्प्युटर ऑफ एज्युकेशन, रांजणी (ता. कळंब) येथे होणार आहे.

या मेळाव्यात खाजगी क्षेत्रातील १२ नामांकित उद्योजक व आस्थापना सहभागी होणार असून, विविध ३३३ पदांसाठी उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धाराशिव आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

नोकरी इच्छुक सुशिक्षित बेरोजगार व स्वयंरोजगार शोधणाऱ्या उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ०२४७२-२९९४३४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# बारूळ येथे राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ फेब्रुवारी -**

तालुक्यातील बारूळ येथे महाशिवरात्रीचे औचित्य साधून ग्रामदैवत श्री बाळेश्वराच्या यात्रेनिमित्त भव्य दिव्य राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन दि.२८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी करण्यात येणार आहे.



राज्यस्तरीय स्पर्धेचे हे सलग १३ वे वर्ष असुन धाराशिव, पुणे, मुंबई, संभाजीनगर, लातुर, बीड, जालना, नांदेड, सोलापूर, सह संपुर्ण महाराष्ट्रातुन शेकडो स्पर्धक श्री बाळेश्वर फेस्टीवलच्या माध्यमातून टि. व्ही. चॅनल्सवर प्रसिद्ध झाले आहेत. दि. २६ फेब्रुवारी श्री बाळेश्वराची महापुजा, अभिषेक व शिव- किर्तन, दि.२७ रोजी श्री बाळेश्वराची भव्यदिव्य पालखी मिरवणूक व शोभेची दारूकाम, दि.२८ तारखेला सकाळी भारूडाचा कार्यक्रम व महाप्रसाद अन्नदान व सायंकाळी ७ वाजता सामाजिक, राजकीय नेतेमंडळीच्या हस्ते राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचे उद्घाटन होईल. या दिवशी खुला युगल व प्रौढ व्यक्तीक नृत्य, खुली लावणी स्पर्धा होईल. दि.१ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता समुह गट, खुला गट व कालच्या नृत्य स्पर्धकांची अंतिम फेरी होऊन बक्षीस वितरण समारंभ होईल. या स्पर्धेत ऐकून दिड-लाखाची बक्षिसे वितरीत केली जातील.

तरी महाराष्ट्रातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन बारूळ ग्रामस्थ व संयोजकांनी केले आहे.

# नळदुर्ग शहरात छत्रपती शिवजी महाराजाचा आश्वारूढ पुतळा उभारावा

## नळदुर्गकरांची पालकमंत्र्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ फेब्रुवारी -**

नळदुर्ग शहर हे एक ऐतिहासिक शहर असुन नळदुर्ग किल्ला हा धाराशिव जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळ म्हणुन ओळखले जाते. दरवर्षी लाखो पर्यटक व भाविक शहरात किल्ला पाहण्यासाठी व देवदर्शनाला येतात.



दि.१९ फेब्रुवारी छत्रपती शिवरायांच्या जयंती निमित्त शहरात अनेक ठिकाणी पुजन झाले त्या प्रत्येक ठिकाणी हि भावना शिवप्रेमीनी व्यक्त केली आहे.त्याच अनुषंगाने समस्त नळदुर्ग शहर वासियांच्या वतीने सर्वपक्षीय नेते एकत्र येऊन उपजिल्हा रुग्णालयाच्या उदघाटन प्रसंगी राज्याचे परीवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक हे आले असता त्यांना ह्या मागण्याचे निवेदन देण्यात आले.

यावेळी शिवसेना उबाठाचे कमलाकर चव्हाण, काँग्रेसचे शहबाज काजी, रा.कॉ.पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष शफी शेख, उदय जगदाळे, भाजपाचे सुशांत भुमकर, इमाम शेख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर घोडके, मनसेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी, संतोष पुदाले, बसवराज धरणे, ज्योतिबा येडगे, विनायक अहंकारी, सरदारसिंग ठाकुर, दत्तात्रय कोरे, सुधीर हजारे, शशिकांत पुदाले, उमेश नाईक, संजय जाधव, सुहास येडगे, विलास येडगे, लतीफ शेख, सुभद्रा मुळे, कल्पना गायकवाड, विनायक पुदाले, पप्पु पाटील, शिवाजी सुरवसे, मनोज मिश्रा, गौस कुरेशी, आदिजन उपस्थित होते.

शहराचे महत्व वाढविण्यासाठी या ठिकाणी बसडेपोची अनेक वर्षांपासुनची प्रलंबित मागणी पुर्ण करावी याबाबत हि निवेदन देण्यात आले आहे.

# पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अप्पासाहेब शिंदे यांचा सन्मान




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ फेब्रुवारी -**

लढा पत्रकारिता आणि पत्रकारांसाठीचा पत्रकार अपघात विमा सुरक्षा कवच या महत्त्वाच्या कार्यक्रमात व्हाईस ऑफ मीडिया धाराशिव जिल्हा आयोजित कार्यक्रमात दि.२० फेब्रवारी रोजी पालकमंत्री प्रतापसिह सरनाईक तसेच खा. ओमराजे निंबाळकर, आ. कैलास पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते पत्रकारिता क्षेत्रात पंधरा वर्षापासून करीत असलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार अप्पासाहेब शिंदे यांचा सत्कार सन्मानचिन्ह ट्रॉफी देऊन व्हाईस ऑफ मीडिया धाराशिव जिल्हा यांच्या वतीने करण्यात आला.

# चरित्रातून राष्ट्रीय चारित्र्य घडते : भैरवनाथ कानडे

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२१ फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे विश्वबंधुत्व व विश्वकल्याण प्रत्यक्षात उतरवणारे आणि लोककल्याण हेच अंतिम ध्येय असणारे कृतीशील राजे होते. रयतेचे कल्याण व संरक्षण हे त्यांच्या प्रशासनाचे मुख्य सूत्र असल्याने हिंदुस्थानच्या इतिहासात 'रयतेचे राजे' म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली. स्वराज्य स्थापनेच्या युग कार्याबरोबर एक राष्ट्रीयत्वाची त्यांची धारणा होती. शिवप्रभुंचे अलौकिक कार्य, निष्कलंक चारित्र्य आणि प्रेरणादायी 'शिवचरित्र' हे आपण कितपत आचरणात आणतो यावरच आपल्या राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे. तेव्हा धर्मनिरपेक्षता तत्वप्रणालीचे



विलोभनीय दर्शन घडविणाऱ्या शिवचरित्र कार्यातून राष्ट्रीय चारित्र्य घडवता येते . असे मत महाराष्ट्र शासन राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते भैरवनाथ कानडे यांनी जळकोट येथे व्यक्त केले.

जळकोट येथे ग्राम पंचायत कार्यालयाच्यावतीने शिवजन्मोत्सवानिमित्ताने आयोजित जागर शिवचरित्राचे या व्याख्यानमालेत पहिले पुष्प गुंफताना शिवचरित्र जगण्याची प्रेरणा या विषयावर मार्गदर्शन करताना कानडे हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गजेंद्र कदम हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोकराव पाटील प्रकाश चव्हाण, उपसरपंच प्रशांत नवगिरे, महेश कदम, ग्रामपंचायत सदस्य कल्याणी साखरे, नामदेव कागे, जीवन कुंभार, अनिल छत्रे, यशवंत कदम, कृष्णात मोरे, विजयकुमार मोरे, डी.डी. कदम, निलकंठ इटकरी आदि उपस्थित होते.


कार्यक्रमास शिक्षक विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन विश्वास भोगे यांनी केले.

# वडगाव (सि) येथे महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन; विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ फेब्रुवारी -**

तालुक्यातील वडगाव (सि) येथे प्रतिवर्षा प्रमाणे या ही वर्षी महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ ते २७ फेब्रुवारी दरम्यान विविध धार्मिक, सामाजिक व मनोरंनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भाविक, भक्तांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यामध्ये रविवार, २३ फेब्रुवारी रोजी रात्री ८ ते ११ दरम्यान प्रा. सुनितानाताई मोहिते, प्रा. उमेश मोहिते, अभिमन्यु मोहिते गुरूजी यांचा भक्तीसंध्या हा कार्यक्रम होईल. सोमवार, २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ ते ८ भक्तीनाद भजन संध्या (उजनी, ता. औसा, जि. लातूर) कार्यक्रम होईल. रात्री ९ ते ११ ह.भ.प. शिवानंद महाराज पैठणकर यांचा किर्तनाचा कार्यक्रम रात्री १२ ते २ श्री. सिद्धेश्वर भजनी मंडळ, वडगांव (सिद्धेश्वर) यांचे जागर कार्यक्रम होईल. मंगळवार, २५ फेब्रुवारी रोजी रात्री ९ ते ११ युवकवीर ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पठाडे महाराज यांचा किर्तनाचा कार्यक्रम होईल तर रात्री १२ ते २ हरिजागर होईल.



बुधवार, २६ फेब्रुवारी म्हणजेच महाशिवरात्री दिवशी सकाळी ६ ते ७ श्री. सिद्धेश्वरांच्या पालखीचे गावातसभामंडपामध्ये आगमन, सकाळी ८ ते १० शिवलिलामृत (शिवरात्री महात्म्य) ग्रंथ वाचन, सकाळी ११ ते १२ वडगांव रत्न पुरस्कार सत्कार समारंभ कार्यक्रम (स्थळ : हनुमान मंदिर), दुपारी १ ते ५ भारूडाचा भरगच्च कार्यक्रम, सायंकाळी ७ ते १० श्री. सिद्धेश्वर महाराजांच्या पालखीची गावात सवाद्य मिरवणूक होऊन सिद्धेश्वर मंदिराकडे प्रस्थान होईल. रात्री ११ श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये 'श्री' च्या पालखीची प्रदक्षिणा व नंतर शोभेची दारू व नंतर श्री. सिद्धेश्वर मंदिरामध्ये हरिजागर होईल.

गुरूवार, २७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ ते ६ श्री. सिद्धेश्वर मंदिरासमोरील मैदानात कुस्त्यांचे जंगी कार्यक्रम होतील.

रात्री ७ ते ९ ह.भ.प. वैभव महाराज कानेगांवकर यांची किर्तन सेवा अमावस्यानिमित्त श्री. सिद्धेश्वर मंदिरामध्ये होईल. तसेच याच दिवशी रात्री ९ ते १२ या दरम्यान गावातील जि. प. प्रशालेच्या प्रांगणात लावण्यखणी हा सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

वरील सर्व कार्यक्रम हे गावात महाशिवरात्रीनिमित्त उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात होणार आहेत. महाशिवरात्रीनिमित्त निमित्त श्री. सिध्देश्वर मंदिर तसेच गावात आकर्षक विद्यूत रोषणाई करण्यात आली आहे.

वडगाव (सि) व परिसरातील भाविक, भक्तांनी वरिल सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन वडगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्त्री रुग्णालयामध्ये १०० बेड वाढविण्याची पाटील यांची पालकमंत्री सरनाईक यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ फेब्रुवारी -**

येथील स्त्री रुग्णालयामध्ये प्रसूतीसाठी फक्त ६० बेडची व्यवस्था आहेत. या रुग्णालयामध्ये धाराशिव शहरासह जिल्ह्यातून महिला मोठ्या संख्येने दाखवल होतात. बेड अभावी त्या महिलांना रुग्णालयात कानाकोपऱ्यात जिथे जागा मिळेल तेथील फरशीवरच नाईलाजास्तव चटई टाकून प्रसुतीसाठी थांबावे लागते.

त्यामुळे त्यांची होणारी हेअरस्टार्ट थांबविण्यासाठी या रुग्णालयामध्ये आणखी १०० बेडची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसेनेचे आनंद पाटील यांनी पालकमंत्री प्रतावराव सरनाईक यांची मुंबई येथे भेट घेऊन एका निवेदनाद्वारे केली आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लाभार्थ्यांना २२ फेब्रुवारी रोजी मंजुरी पत्रांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्राम विकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत राज्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मधील २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण आणि १० लक्ष लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरणाचा कार्यक्रम २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४.४५ वाजता पुणे, बालेवाडी येथे होत आहे.

यानिमित्ताने लातूर जिल्हास्तरीय कार्यक्रम दुपारी ३.२५ वाजता लातूर येथील नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात होणार असल्याचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर यांनी कळविले आहे. या कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील २४ हजार ४६६ लाभार्थींना प्रधानमंत्री आवास योजना २०२४-२५ अंतर्गत मंजुरी आदेश व पहिला हप्ता वितरण कार्यक्रम केला जाईल.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची या कार्यक्रमाला दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थिती राहील, तर खासदार शिवाजी काळगे यांचीही यावेळी उपस्थिती राहणार आहे. यासोबतच तालुका स्तरावर सर्व पंचायत समितीमध्ये संबंधित विधानसभा सदस्य यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्येही हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमांमध्ये दूरदृश्य प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटप व पहिला हप्ता वितरण कार्यक्रम घेण्यात येणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमामध्ये सन २०२४- २०२५ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत लाभ मंजूर झालेल्या सर्व लाभार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## लाहोटी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी साजरी केली अनोखी शिवजयंती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** 'शिवराय मनामनात, शिवजयंती घराघरात' हा गेल्या काही वर्षांपासून रुजलेला नारा सार्थ ठरवत राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या सोळाशे पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी केली जात आहे. सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त महाराजांचे पांढऱ्या कागदावर सुंदररित्या चित्र रेखाटले व त्यानंतर रंगांच्या मदतीने चित्राला रंग देऊन पूर्णपणे तयार केले. विशेष म्हणजे महाराजांच्या रेखाटलेल्या चित्राचे विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी परिवारातील सदस्यांसोबत मनोभावे पूजन करून अभिवादन केले व पूजन केलेला फोटो स्कूलच्या ग्रुपवर पाठवला.



## टाटा सुमो जीपची चोरी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** रिंग रोड परिसरातील श्रीनिवास नगर येथून एमएच २४ डी ७५१२ या क्रमांकाच्या टाटा सुमो जीपची चोरी झाल्याची घटना १६ फेब्रुवारी रोजी घडली.

याबाबत संजय नाबदे (रा. छत्रपती शिवाजीनगर, निडेबन रोड, उदगीर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जुन्या वापरातील ६० हजार रुपये किंमतीची ही जीप असल्याचे नमूद आहे.

## भांडण लावतोस म्हणून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** तू आमच्या भावकीत भांडण लावतोस का म्हणून शिविगाळ करून सळईने मारून दुखापत केल्याची घटना १२ नंबर पाटी लातूर येथे घडली. लाकडाने डोक्यात मारून जखमी केले. शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली, असे विशाल गायकवाड (रा. बालाजी मंदिर समोर, १२ नंबर पाटी लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून देवानंद मुधोळकर व अन्य तिघांविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोह. शिंदे करीत आहेत.

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची रुग्णालयास भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर च्या डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यां करिता खास अभ्यासपूर्ण माहितीपर रुग्णालय भेट सदासुख रुग्णालय लातूर येथे नुकतीच आयोजित करण्यात आली होती.



या रुग्णालय भेटीचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व प्रा.रोहित सारडा यांनी केले.रुग्णालय भेटीच्या प्रसंगी डॉ.चेतनजी सारडा व डॉ.विक्रमजी सारडा यांचे पुष्पगुच्छ देऊन महाविद्यालया तर्फे स्वागत डी. फार्मसी चे विभाग प्रमुख प्रा.प्रकाश शिवनेचारी यांनी केले. रुग्णालय भेटीत एम. आर. आय., सी. टी. स्कॅन,आय.सी.यु ,आय. पी.डी.कॅथ लॅब, औषधी विभाग व रुग्णालयातील इतर विभागांची व अत्यावश्यक सोयीसुविधांची तसेच आपत्कालीन नियोजनाची माहिती सर्व विद्यार्थ्यांना सविस्तरपणे करून देण्यात आली.

## राज प्रतिष्ठानच्या बांधिलकीने मानवता तेजोमय केली

### राऊत परिवाराच्या वतीने ५१ विद्यार्थिनींना सायकलीचे वाटप



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** घरापासून कोसो दूर असलेली शाळा वेळेत गाठता यावी, हा प्रवास सुकर व्हावा यासाठी कष्टकरी परिवारांच्या ५१ विद्यार्थिनींना येथील राज प्रतिष्ठान तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. हर्षवर्धन राऊत व त्यांच्या पत्नी डॉ. शुभांगी राऊत यांच्या वतीने बुधवारी शिवजयंती दिनी मोफत सायकली देण्यात आल्या. राऊत परिवाराची ही बांधिलकी मानवता तेजोमय करणारी असून हा आधार विदयार्थिनींच्या शैक्षणिक जडण घडणीस हातभार लावेल, असा विश्वास पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांनी व्यक्त केला.

चंद्रनगरमधील अंबामाता मंदिराशेजारी असलेल्या गुजराती स्कूलच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. सीआरपीएफ चे डेप्यूटी कमांडट सुदीप वाघचौरे, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, सुशीलादेवी राऊत, डॉ. राजेश एनाडले, डॉ. अशोक पोतदार, डॉ. सुबोध सोमाणी, संजय बोरा, डॉ. मशायक, अॅड. उदय गवारे, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. श्वेता काटकर, रुपाली वाघचौरे, आदिमाया गवारे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना सोमय मुंडे यांनी छत्रपती शिवराय हे निश्चयाचा महामेरू , बहुत जनासी आधारू , अखंड स्थितीचा निर्धारू होते. प्रजेचे दैन्य दूर करण्यासाठी त्यांनी श्रीमंती वापरली तथापि त्या धनाचा उपयोग स्वतासाठी कधीही केला नाही या अर्थाने ते योगीच ठरले. शिवरायांच्या हे गुण आपण अंगिकारावेत असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी स्वप्न, परीश्रम अन आत्मविश्वास हिच यशाची त्रिसुत्री असून या मार्गाने वाटचाल केल्यास जगातली कोणतीही शक्ती तुमच्या यशाचा मार्ग रोखू शकत नाही, असे सांगितले. अनंत अडचणी असतानाही याच गुणांनी छत्रपती शिवराय व मावळ्यांनी स्वराज्य साकारले तसेच संकटेही परतवली. तुम्हीही मोठी स्वप्न पहा, परीश्रम करा अन खूप खूप मोठे व्हा असे सांगत त्यांनी प्रतिष्ठानच्या कार्य अन उपक्रमाचे कौतूक केले.

## जिल्ह्यात १५२ केंद्रांवर दहावीच्या परीक्षांना सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रांवर २१ फेब्रुवारीपासून दहावीच्या परीक्षेला सुरूवात झाली असून बारावीच्या परीक्षेप्रमाणेच ही परीक्षाही कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणात सुरळीतपणे पार पाडावी यासाठी महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ तसेच लातूर जिल्हा पोलीस दल प्रयत्नशील आहे.

पोलीस अधीक्षकांनी केंद्रांवरील पोलीस बंदोबस्त व शिक्षण मंडळाकडून करण्यात आलेल्या नियोजनाचा आढावा घेऊन सूचना केल्या.सदर परीक्षा बंदोबस्तासाठी ११० पोलीस अधिकारी, २५० पोलीस अंमलदार, तर ९०० पुरुष होमगार्ड व १०० महिला होमगार्ड तैनात करण्यात येणार आहेत. तसेच परीक्षा केंद्रांवर ड्रोनची नजर असणार आहे. सर्वच केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार असून, परीक्षा केंद्रांचे दैनंदिन चित्रीकरण त्याच दिवशी संबंधित तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच परीक्षा काळात कोणत्याही केंद्रावर विद्यार्थी गैरप्रकार करताना आढळल्यास त्यांच्यावर कठोर कार्यवाही करून संबंधित केंद्राची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे. दरम्यान, कॉपीमुक्त परीक्षेसाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी सूचना केल्या आहेत. भरारी आणि बैठे पथक नियुक्त करण्यात आले असल्याचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी सांगितले.



## शंभू राजांच्या बलिदानाने जिजाऊंच्या लेकींना अश्रु अनावर

### शिवजयंती दिनी एकाच वेळी २५० महिलांनी पाहिला छावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** स्वराज्य रक्षणासाठीची निष्ठा शेवटच्या श्वासापर्यंत जगलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या कर्तत्वाची अन त्यांच्या बलिदानाची गाथा पहाताना शिवजंयती दिनी पीव्हीआरमध्ये उपस्थित जीजाऊंच्या लेंकीना आपले हुंदके आवरता आले नाहीत.

फंदी फितूरीने दगाबाजी करीत करण्यात आलेल्या घात अन क्रुर आघाताप्रति या लेकींच्या मनात ज्वालाही जागल्या. निमित्त होते शिवजंयतीच्या औचित्यावर सुमारे २५० महिलांनी एकत्र येत छावा चित्रपट पाहिल्याचे. छत्रपती शिवराय व छत्रपती शंभू राजांची जीवन गाथा हा अखंड प्रेरणेचा स्त्रोत आहे, हे ओळखून येथील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. आम्रपाली देशमुख यांनी शिवजंयती दिनी महिलांनी एकत्रीतपणे छावा चित्रपट पहाण्याचे ठरवले. तथापि त्यास वेळ फारच कमी होता व एवढ्या वेळेत एवढ्या संख्येत महिलांना एकत्र आणणे तसे कठीण व कसरतीचे होते.

तथापि डॉ. देशमुख यांनी समाजमाध्यमाचा मोठ्या कल्पकतेने उपयोग करीत त्यावरुन आपली इच्छा व्यक्त केली व त्यास अपेक्षापल्याड प्रतिसाद मिळाला. सुमारे २५० महिलांनी नोंदणी केली. शिवजयंती दिनी सकाळी आठचा शो बुक करण्यात आला. मराठमोळ्या पोशाखात सकाळी सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात महिला जमल्या. तिथे त्यांना फेटे बांधण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला वंदन केले.

एका बाल कलाकाराने शिवगर्जना केली तर एका भगिनीने पोवाडा सादर केला त्यानंतर त्या आपल्या दुचाकी घेवून पीव्हीआर सिनेमाकडे मार्गस्थ झाल्या. एकाच वेळी एकाच दिशेने मार्गस्थ झालेल्या महिला पहाता जणू दुचाकी रॅलिचा भास होत होता. पीव्हीआरमध्येही त्यांनी शिवप्रतिमेचे पुजन केले व त्या चित्रपटगृहात गेल्या. त्यांनी छावा पाहिला अन त्यांच्या डोळ्यांत गंगा अवतरली.

## आग्रा भेटीचे शिवाजी महाराजांच्या जीवनावर दुरगामी परिणाम झाले : डॉ.चव्हाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जय शिवाजी, जय भारत - पदयात्रा सहभाग व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या व्याख्यान समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे होते तर मंचावर प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, प्रमुख व्याख्याते इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रमोद चव्हाण, मंचावर प्राचार्य डॉ. प्रमोद तांदळे, प्राचार्य श्री. विक्रम जाधव, रासेयो जिल्हा समन्वयक व कार्यक्रमाधिकारी डॉ.केशव आलगुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासामध्ये आग्रा भेटीचे शिवाजी महाराजांच्या जीवनावर आणि मराठा साम्राज्यावर दुरगामी परिणाम झाले. इ. स. १६६६ मध्ये, शिवाजी महाराज औरंगजेबाला भेटण्यासाठी नऊ वर्षाच्या संभाजी राजे समवेत मुघल साम्राज्याची राजधानी आग्रा येथे गेले.शाही पाहुणे म्हणून शिवाजी महाराजांचा सन्मान होण्या ऐवजी त्यांचा जाणीवपूर्वक अपमान करण्यात आला. एवढेच नाही तर त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. शिवाजी महाराजांचा वारंवार अपमान करण्यात आला. परंतु त्यांनी अतिशय संयमाने बादशहा औरंगाबादच्या प्रत्येक योजनेवर मात करत अतिशय सीताफिने स्वतःची सुटका करून घेतली यातून त्यांचा मुत्सद्दीपणा त्यांचा आत्मविश्वास आणि त्यांचे व्यवस्थापन कौशल्य हे गुण आपण स्वीकारले तर आपणही अशक्य गोष्ट शक्य करण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण होऊ शकतो असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रामेश्वर स्वामी, डॉ.दिलीप गुंजरगे, डॉ. संगीता घार, डॉ. हरिश्चंद्र चौधरी, डॉ. राजेश करंजकर, प्रा. प्रज्ञा कांबळे, जाधव रामदास, यांनी परिश्रम घेतले.

## लाथ लागल्याने एकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** चुकून लाथ लागल्यानंतर सॉरी म्हटले तरी जाणूनबुजून लाथ मारलास असे म्हणून शिविगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना पाण्याची टाकीजवळ लातूर येथे घडली. फिर्यादीच्या डोक्यात मारून जखमी केले.

अवघड ठिकाणी लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. भांडण सोडविण्यास आलेल्या मित्रालाही मारहाण केली, असे रितेश कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## राष्ट्र सेवा दलाच्या जिल्हाध्यक्षपदी देडे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** साने गुरुजींच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या राष्ट्र सेवादलाच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी पांडुरंग देडे व सचिवपदी हरिदास तम्मेवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

उदगीर येथील साने गुरुजी विद्यालयात बुधवारी राष्ट्र सेवा दलाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक प्राचार्य डॉ. बाबूराव लहाने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. निवडणूक राज्य निरीक्षक अॅड. प्रदीप पाटील यांच्या आदेशानुसार जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

ही कार्यकारिणी २०२५ जे २०२८ पर्यंत कार्यरत राहणार आहे. यावेळी राष्ट्र सेवादलाचे दिगंबरराव बुरसपटे गुरुजी, बापूसाहेब गजेवाड, अंकुश गायकवाड, प्रा. बबन पवार, एस. एस. मुंढे, श्रीशैल्य बिरादार, आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. निवडीबद्दल ज्येष्ठ विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे, प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्रा. शिवाजी जवळगेकर, मुख्याध्यापक विजय चव्हाण, शेषेराव चव्हाण, आदींनी कौतुक केले आहे.

## शिराळ्याचा लाचखोर ग्रामरोजगार सेवक गजाआड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** विहीर मंजुरीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठविण्याच्या कामासाठी १५ हजारांची लाच मागून ती स्वीकारत असताना लातूर तालुक्यातील शिराळा गावच्या ग्रामरोजगार सेवकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले असून याबाबत मुरुड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सदर लाचेच्या घटनेबाबत संबंधित विभागाकडून देण्यात आलेली माहिती अशी की, यातील तक्रारदारांनी त्यांचे आई व चुलती यांच्या नावे विहीर मंजूर होण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठवून मंजुरी प्राप्त करून देतो, असे सांगून आरोपी ग्रामरोजगार सेवक अरुण सुरवसे यांनी सदर कामासाठी १५ हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी केली.

सदर रक्कम लाच असल्याची तक्रारदार यांची खात्री झाल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे लेखी तक्रार दिली.

त्यानुसार सोमवारी (दि. १७) शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, आरोपीने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले व ती मंगळवारी (दि. १८) आरोपी स्वतःच्या खासगी कार्यालयात लाचेची रक्कम स्वीकारत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आरोपी ग्रामरोजगार सेवक सुरवसे याला लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले. याबाबत मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज रयतेच्या मना-मनात : प्रा. धायगुडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** महावितरणच्या शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती मोठया उत्साहात विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी शिवव्याख्याते प्रा.अरुण धायगुडे पाटील यांचं 'रयतेचे राजे छत्रपती शिवराय ' या विषयावर हृदयस्पर्शी व्याख्यान झाले. छत्रपती शिवाजी महाराज हे तमाम रयतेच्या मनात स्वाभिमान पेरणारे राजे होते. शिवाजी या नावातच नवोत्थान, नवक्रांती घडवणारा धगधगता विचार आहे. म्हणूनच ३९५ वर्षांनंतरही शिवाजी महाराजांचा विचार आपल्यामध्ये सामावलेला आहे असे मनोगत प्रा.धायगुडे पाटील यांनी व्यक्त केले. तत्पुर्वी परिमंडळ आणि मंडळ कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते शासकीय इतमामात महाराष्ट्र गिताच्या सुरात शिवजयंती साजरी करण्यात आली.



विद्युतभवन येथे संपन्न झालेल्या शिवजन्मोत्सवाच्या अध्यक्षपदी उपस्थित राहिलेले मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, कार्यकारी अभियंता बी, जी. शेंडगे, गणेश सामसे, संजय पोवार, गणेश पाचपोहे, सहाय्यक महाव्यवस्थापक चेतन वाघ, वरिष्ठ व्यवस्थापक जालींदर मंगळवेढेकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष सहाय्यक अभियंता राहुल गाडे यांची प्रमूख उपस्थिती होती.

प्रा. धायगुडे पाटील पुढे म्हणाले की, स्वराज्यापुर्वी मराठयांची अवस्था ही झुंजीसाठी पाळलेल्या कोंबडयासारखी होती. सुभेदारी, वतनदारी अशा फेकलेल्या तुकडयांवर समाधान मानून आपण आपल्याच माणसांशी लढतो आहोत, वाहणारे रक्त हे आपल्याच कोणाचेतरी आहे याचे भान विसरून आदीलशाही, निजामशाहीसाठी स्वाभिमान दावणीला बांधून निरर्थक जीवन जगणाऱ्या मराठी माणसांच्या मना-मनात स्वराज्याचे स्वप्न धगधगत ठेवून स्वाभिमान पेरण्याचे जागवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य मोहिमे मध्ये अठरापगड जातींना सोबत घेवून मावळा निर्माण केला. अफजल खानाचा कोथळा, शाहिस्तेखानाची छाटलेली बोटे अशा घटनांवर आता बोलण्यात अर्थ नाही, आता अशा घटनांमागील शिवरायांचा विचार काय होता यावर विचारमंथन व्हायला हवे असाही संदेश प्रा.धायगुडेंनी दिला.

जयंती उत्सवाचे सुत्र संचालन प्रशांत जानराव यांनी केले तर प्रास्ताविक अभियंता राहूल गाडे यांनी केले. तसेच आभार अभियंता श्रीनिवास शिंदे यांनी मांडले. त्याचबरोबर बालशिवव्याख्याता या स्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या पाल्यांना भेटवस्तू देऊन प्रमूख पाहूण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## गंगापूरच्या सरपंच शीतल गायकवाडांवर अविश्वास

### सोमवारी होणार प्रस्तावावर चर्चा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ फेब्रुवारी -** ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करीत असल्याचा आरोप करत गंगापूरच्या सरपंच शीतल बलभीम गायकवाड यांच्याविरुध्द उपसरपंच आशा बिभीषण शिंदे यांच्यासह ग्रामपंचायतीच्या ११ सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव तहसीलदारांपुढे दाखल केला असून या प्रस्तावावर सोमवारी (दि. २४) चर्चा होणार आहे.

लातूर तालुक्यातील गंगापूर ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक १८ डिसेंबर २०२२ रोजी झाली होती. त्यात डॉ. सतीश शिवहरप्पा कानडे यांच्या पॅनलच्या शीतल बलभीम गायकवाड थेट जनतेतून सरपंच झाल्या. ग्रामपंचायत निवडणुकीत कानडे गटाच्या दहा जागा निवडून आल्या तर भाजपच्या तीन जागा निवडून आल्या. निवडणुकीनंतर गावात विकासकामे करताना सरपंचांनी ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात घेतले नाही, मनमानी कारभार चालविला, असा आरोप करत या ग्रामपंचायत सदस्यांनी तहसीलदारांपुढे अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. डॉ. सतीश कानडे यांच्या नेतृत्त्वाखाली उपसरपंच आशा बिभीषण शिंदे, ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ मारुती पवार, तानाजी जनार्दन फुटाणे, किरण नागोराव शिंदे, सरिता बाबू बनसोडे, पुष्पांजली बालाजी भुसे, आशा व्यंकट राऊत, चंद्रकला राहुल शेलार, रुकसानाबी हनीफ शेख, मिनाज महेबूब शेख आदी ११ सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला. तहसीलने या अविश्वास प्रस्तावावर सोमवारी चर्चा ठेवली आहे.

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवनेरीच्या रासेयोचे भिंगोलीत आज उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१ फेब्रुवारी -**
येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तालुक्यातील भिंगोली येथे दि.२१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान 'माझ्या भारताचे युवक आणि डिजीटल साक्षरता' हा उद्देश ठेवून शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्घाटन शनिवार दि.२२ फेब्रुवारी रोजी कॉंग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळूंके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या रासेयोच्या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी संस्था अध्यक्ष प्रतापराव माने हे राहणार असून यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे रासेयोचे संचालक डॉ. मलिकार्जुन करजगी यांच्यासह पद्माकर मोगरगे, जयेश माने, प्राचार्य डॉ. अरुण धालगडे, सरपंच सुशीला चेवले, उपसरपंच ॲड. ज्ञानेश्वर चेवले, बालाजी साळुंके, एकनाथ पाटील, शत्रुघ्न साळुंखे, दिलीप बानाटे, लता साळुंखे, सुजाता साळुंखे, अंजना जरीपटके, भागवत सुळे, अरविंद चौगुले, बालाजी भालेराव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### भरत मुनी यांची जयंती साजरी

**उदगीर, दि.२१ फेब्रुवारी -**
येथील संस्कार भारती शाखेच्या वतीने भरतमुनी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भरत मुनी जयंती निमित्त धनंजय गुडसूरकर यांचा नाट्य अभिवाचनाचा कार्यक्रम पर पडला. यावेळी माधव खताळ, संगीत तज्ञ गोपाळ जोशी गुरुजी, धनंजय गुडसूरकर, बालाजी मुर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. सामुदायिक ध्येयगीतानंतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व भरत मुनींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्कार भारती समिती, उदगीरचे सर्व सभासद यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. गौरव जेवळीकर व आभार प्रदर्शन योगेश मुर्के यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडावा म्हणून प्रदीप पत्तेवार, श्रीपाद पाटील, प्रा.डॉ. राहूल अलापूरे, प्रा.डॉ. मुकेश कुलकर्णी, संध्या पत्तेवार, खताळ, रूपा गुडसूरकर व डॉ. संजय कुलकर्णी यांनी पुढाकार घेतला.

### अंकिताची थलेटिक्स संघात निवड

**देवणी, दि.२१ फेब्रुवारी -**
कै. रसिका महाविद्यालयातील कांबळे अंकिता (बी. एससी.द्वितीय वर्ष) या खेळाडूची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या थलेटिक्स संघात निवड झालेली आहे. क्रीडा महोत्सव आंतरविद्यापीठ थलेटिक्स स्पर्धा दि.१८ ते २३ फेब्रुवारी या कालावधीमध्ये गोडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे होत आहेत. या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अंकिता कांबळे या विद्यार्थिनीची विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या खेळाडूस प्रा.डॉ. सचिन चामले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड झाल्याबद्दल संस्थाअध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर, प्रा.डॉ. चंद्रकांत जावळे, उपप्राचार्य डॉ.शिवाजी सोनटक्के सह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केलेले आहे.





### प्रियंका मुंढे वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**उदगीर, दि.२१ फेब्रुवारी -**
सार्वजनिक शिवजयंती महोत्सव मानखेड (ता.अहमदपूर) च्या वतीने इयत्ता पाचवी ते दहावीच्या गटातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित शालेय विद्यार्थ्यासाठीच्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत टाईम्स पब्लिक स्कूल उदगीरच्या इयत्ता ७ वीच्या वर्गात शिकणारी प्रियंका ज्ञानोबा मुंढे हिने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. यावर्षीच्या स्पर्धेत इयत्ता आठवी नववी दहावीच्या वर्गात शिकणारे सातारा, परभणी, बीड, नांदेड धाराशिव व लातूर या जिल्ह्यातील अनेक स्पर्धक विद्यार्थी असतानाही इयत्ता सातवीच्या वर्गात शिक्षण घेणारी प्रियंका ६१ विद्यार्थ्यांमधून अव्वल ठरली. प्रियंकाच्या या यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन प्रियंका मुंढेचा सत्कार करण्यात आला. प्रियंकाच्या या यशाबद्दल ईश्वरप्रसाद बाहेती, विजयकुमार कप्पीकेरे, मंगला कप्पीकेरे, प्राचार्य अभिजित नळगीरकर, उपप्राचार्य शिवकांता शेटकार, प्रतिभा शेरीकर, मधुमती किणीकर, बबिता मसगले, उषा शिंदे, शिवनंदा धानुरे, काव्या सोंत, मनिषा सावंत, संदेश शिरसाठ, पांडुरंग काजबा, संगम कुलकर्णी व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

## आम सभेतील महत्वपूर्ण विषय विधीमंडळ अधिवेशनात मांडणार




**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२१ फेब्रुवारी -**
औसा तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या आम सभेच्या माध्यमातून आलेल्या तक्रारींचा निपटारा संबंधित विभागाने तातडीने करण्याच्या सूचना आमदार अभिमन्यू पवार यांनी दिल्या आहेत. या आम सभेत आलेले काही महत्वपूर्ण विषय येणाऱ्या विधीमंडळात अधिवेशनात मांडून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले आहे.

औसा तालुक्यातील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांच्या अध्यक्षतेखाली औसा पंचायत समिती सभागृहात शुक्रवार दि.२१ रोजी आम सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील सरपंच, नागरिकांनी अनेक विषय संदर्भात समस्या उपस्थित केल्या.

याबाबत आमदार अभिमन्यू पवार यांनी आम सभेतच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून त्या सोडविण्यासाठी सूचना करीत आम सभेच्या माध्यमातून आलेल्या

### आ. अभिमन्यू पवार यांची आम सभेत माहिती...

तक्रारींचा निपटारा तातडीने करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या.

या आम सभेसाठी तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, नगर पालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, उपविभागीय पोलिस अधिकारी कुमार चौधरी, बांधकाम विभागाचे अभियंता रोहन जाधव, पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड, बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, भाजपचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, निराधार समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, रोहायो अध्यक्ष सदाशिव जोगदंड, सरपंच संघटनेचे विष्णू कोळी आदींसह सरपंच, उपसरपंच व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जलजीवन मिशन अंतर्गत कामे कासवगतीने होत असल्याच्या तक्रारी कांही सरपंचांनी केल्यानंतर याबाबत संबंधित एजन्सीना तातडीने कामे पुर्ण करण्याची नोटीस बजावण्यात यावी तसेच याबाबत दर्जेदार व वेळीत कामे पुर्ण न करणाऱ्या एजन्सी ब्लॉक लिस्टमध्ये टाकण्याचा इशाराही यावेळी आमदार अभिमन्यु पवार यांनी दिला.

तसेच टंचाई काळातील थकित बीजापोटीची साडेचार कोटी रुपये शासनाकडून देण्यात आले असून ती लवकरच अदा करण्यात येतील असेही सांगितले.

यावेळी भूकंपग्रस्त भागातील नागरिकांना मंजूर झालेल्या घरकुल योजनेतील बांधकाम करण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने पुनर्वसित गावातील जुन्या गावातील जागा ग्रामपंचायतीला वर्ग करण्याचीही मागणी काही सरपंचांनी केली.

काही गावातील स्मशानभूमी, जिल्हा परिषद शाळा इमारत बांधकाम, नरेगा अंतर्गत सिंचन विहीर बील तसेच औसा शहरातील पाणीपुरवठा संदर्भात समस्या उपस्थित केल्या.

याबाबत संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करून प्रश्न सोडवण्याच्या सूचना यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

## बेकायदेशीर नियुक्त्या रद्द करा



जिल्हाधिकारी यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२१ फेब्रुवारी -**
जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या निकषाप्रमाणे न केलेल्या जिल्ह्यातील नियुक्त्या तात्काळ रद्द करण्यात यावेत, अशी मागणी लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्या वतीने एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना केली आहे.

लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात पुढे या निवडी शासकीय ब पत्रकानूसार केलेल्या नाहीत, यातील निकष ज्या संस्थानी व सदस्यांनी पुर्ण केलेले नाहीत, अशाचे अशासकीय सदस्यपद रद्द करून योग्य तो न्याय द्यावा. तसेच ज्यांनी या निकषाची तपासणी केली असेल त्यांनी चुकीची माहिति अध्यक्ष व निवड समितीला दिलेली आहे. अशा संबधितावर कारवाई करून त्यांना निलंबित करण्यात यावे, असे म्हटले आहे. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या निकषाप्रमाणे न केलेल्या बेकायदेशीर नियुक्त्या तात्काळ रद्द कराव्यात, अशी मागणी करून सोबत महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्राची प्रतही माहितीसाठी जोडल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनावर लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे जिल्हाध्यक्ष संग्राम वाघमारे, महिला प्रदेशाध्यक्ष कांचन वाघमारे, चाकूर तालुकाध्यक्ष पांडुरंग साळुंके, लातूर तालुकाध्यक्ष विशाल कणसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शिवचरित्रातून राष्ट्रीय चारित्र्य निर्माण व्हावे : प्रा. सिद्धेश्वर लांडगे




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२१ फेब्रुवारी -**
छत्रपती शिवराय हे केवळ महाराष्ट्राचेच नाही तर संपूर्ण भारत आणि विश्वाचे आराध्य दैवत असल्याचे मत प्रा. सिद्धेश्वर लांडगे यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात दिनविशेष समितीच्या वतीने आयोजित 'शिवचरित्रातून काय शिकावे?' या विशेष व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी भूषवले. व्यासपीठावर दिनविशेष समिती प्रमुख प्रा. डॉ. गौरव जेवळीकर, प्राध्यापक सचिव डॉ. भालचंद्र करंडे, डॉ. सुरेश लांडगे यांची विशेष उपस्थिती होती.

प्रा. लांडगे पुढे म्हणाले, शिवचरित्रातील प्रत्येक शिक्षण आपल्या जीवनातील समस्यांचे उत्तर देऊ शकते. शिवरायांनी सतराव्या शतकात मानवतावादी नैतिक मूल्यांची रुजवण केली. त्यांच्या विचारातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या लोकशाही मूल्यांचा प्रसार झाला. यामुळेच शिवचरित्रातून प्रत्येकाने संस्काराची शिदोरी प्राप्त करावी. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजकुमार मस्के यांनी समारोप करताना शिवरायांचे व्यक्तिमत्व तळपत्या सूर्यासारखे असून ते सर्वांना सोबत घेऊन चालणारे कुशल संघटक होते, असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्र वाचन करण्याचे आवाहन केले, जेणेकरून त्यांचे गुण त्यामध्ये समाविष्ट होऊ शकतील, असे ते म्हणाले.

यावेळी अवंतिका गायकवाड, आनंद बोडके, श्रीकांत पंचगुडे, सचिन बामनवाढ यांची भाषणे झाली. मुक्ता सूळ, आयोध्या पवार यांनी कविता तर प्राजक्ता बिरादार यांनी पोवाडा सादर केला.

## औसा बाजार समितीला ताकद देण्याचे काम शेतकऱ्यांचे : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२१ फेब्रुवारी -**
शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून आपण अनेक विकासकामे मतदारसंघात करीत आहोत. शेतकऱ्यांचे जीवन सूकर व्हावे. या उद्देशाने शेतरस्ता अभियानासह सिंचन क्षेत्र वाढविणे व शेतकऱ्यांशी निगडीत असलेल्या संस्थाना बळकटी देण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांना मदत व्हावी. यासाठी शेतर्कयांनी तालुक्यातील औसा कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्याची खरेदी-विक्री करीत ताकद देण्याचे काम करावे, असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले.

दुसऱ्यांदा बहुमताने निवडून आल्याबद्दल आडत खरेदीदार असोसिएशनच्या वतीने आ. पवार यांचा औसा बाजार समितीमध्ये सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. संतोष मुक्ता, सुनील उटगे, चंद्रशेखर सोनवणे, प्रा. भिमाशंकर राचट्टे, संतोष हुच्चे, प्रवीण कोपरकर, संदिपान लंगर, युवराज बिराजदार, प्रकाश काकडे, अजित धुमाळ, संतोषी अशोक वीर, राधाकृष्ण जाधव, रमाकांत वळके, गोविंद भोसले, ईश्वर कुलकर्णी, मोहन कावळे, विकास नरहरे, सुरेश औटी, धनराज जाधव, चंद्रकला झिरमिरे, शंकर पुंड, शिवलिंग औटी, गोविंद दळवे, फारुख शेख, महेश जाधव, चंदूलाल झंवर उपस्थित होते.

आ.पवार म्हणाले, औसा बाजार समितीची मंजुरी उत्तमराव पाटील तर बाजार समितीची निर्मिती विलासराव देशमुख यांच्या माध्यमातून झाली आहे. औसा बाजार समितीच्या निर्मितीला चांगला इतिहास असून प्रगतीची परंपरा आपण पुढे घेऊन जात आहे. बाजार समितीला दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची पूर्तता करण्याचे काम सुरू असून बाजार समिती अंतर्गत सिमेंट रस्ते, शौचालय आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम केले जात आहे. येणाऱ्या काळात खरेदीदारांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असून लवकरच उजनी येथे उपबाजार समितीची निर्मिती करण्यात येणार आहे.

आगामी काळात मतदारसंघातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी तावरजा बॅरेजची उभारणी, बेलकुंड उपसा जलसिंचन योजना आदींवर काम केले जाणार आहे. याचबरोबर मतदारसंघांतील शेतकऱ्यांना उच्च दाबाने वीजपुरवठा होण्यासाठी नव्याने उभारण्यात येणारे ११ नवीन विद्युत उपकेंद्रातून लवकरच वीजपुरवठा करण्यात येणार असल्याचे आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी सांगितले.

## वलांडी, धनेगाव, कवठाळ येथील दहावीच्या परीक्षा शांततेत



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२१ फेब्रुवारी -**
तालुक्यातील वलांडी येथील व्यंकटेश विद्यालयात २१ फेब्रुवारी रोजी सुरू झालेल्या दहावीच्या परीक्षा सात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शांततेत व व्यवस्थितपणे दिल्या. वलांडी, विमलताई विद्यालय, भोगेश्वर विद्यालय दवणहिप्परगा, राष्ट्रीय विद्यालय टाकळी, भोगेश्वर विद्यालय तळेगाव, शिवाजी विद्यालय बोंबळी, व्यंकटेश विद्यालय व बालाजी विद्यालय वलांडी येथील एकूण २९३ विद्यार्थ्यांनी या परीक्षा दिल्या.

जिल्हाधिकारी घूगे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्र सी.सी. कॅमेराच्या देखरेखीखाली आहेत. याशिवाय १२३ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. वलांडी येथील तीन तास बैठक पथकाचे नेमणूक करण्यात आली होती. तहसीलदार सोमनाथ वाडकर आणि गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांच्या नेतृत्वाखाली सलग तीन तास बैठकीचे निरीक्षण ठेवले गेले. पोलीस प्रशासनाचे माणिक डोके यांच्या चौकस बंदोबस्तामुळे दहावीच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. केंद्राच्या आवारात कडक पोलिस बंदोबस्त ठेवला गेल्यामुळे कोणत्याही अनुचित प्रकाराची शक्यता नाकारली गेली. परीक्षा केंद्रावर कॉपीमुक्त वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे समाधान व्यक्त करण्यात आले.

तसेच, धनेगाव येथील महादेव विद्यालय, मिरा माध्यमिक विद्यालय, नागाबूवा विद्यालय या तीन विद्यालयांतील २०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. एक दिव्यांग विद्यार्थिनी वैष्णवी भोसलेने ही परीक्षा दिली. या केंद्रावर बैठी पथक म्हणून संगीता ढगे, मंडळधिकारी डी.एम. भंडारे आणि तलाठी यांनी काम पाहिले. कवठाळ येथील शिवाजी विद्यालयात जि.प्र. शाळा जवळगा, विवेकानंद विद्यालय चवणहिप्परगा, शिवाजी विद्यालय कवठाळ, नृसिंह विद्यालय गूरधाळ आणि दासगीर विद्यालय शंभू उमरगा यातील एकूण १७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

या सर्व परीक्षा केंद्रावर महसूल, पंचायत समिती, आणि पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्तात शांततेत पार पडल्या.

## वलांडी आरोग्य केंद्र रामभरोसे; रुग्ण अंधारात

### वीजपुरवठा बंद... आरोग्य अधिकाऱ्यांचा तुटवडा... प्रशासनाचे दुर्लक्ष...






**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२१ फेब्रुवारी -**
देवणी तालुक्यातील वलांडी प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था दिवसेंदिवस दयनीय बनत चालली आहे. १८ फेब्रुवारी रोजी येथील महावितरणच्या रोहित्रात बिघाड झाल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला असून, दोन दिवसांपासून बाळंतपण व कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी दाखल महिलांना चिमुकल्यांसह अंधारात रात्र काढावी लागत आहे. इन्व्हर्टर चार्जिंगअभावी निष्क्रिय असून, आरोग्य केंद्रात वीज नसल्याने मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.

वलांडी आरोग्य केंद्रात दररोज १५० ते २०० रुग्णांची ओपीडी नोंदवली जाते, तर महिन्याच्या अखेरीस हा आकडा ५,००० च्या पुढे जातो. वलांडी हे कर्नाटक सीमेलगतचे गाव असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर रुग्ण येतात. मात्र, केंद्रात आवश्यक आरोग्य सुविधा नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत.आरोग्य केंद्रात तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असली तरी, सध्या फक्त एकच अधिकारी कार्यरत आहे. उर्वरित दोन पदे सहा महिन्यांपासून रिक्त असून, परिचर पदही रिक्त आहे. परिणामी, रुग्णांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड होत आहे. आरोग्य केंद्रात आवश्यक स्वच्छता कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य आहे. झाडीझुडपे वाढल्याने मच्छर, साप, विंचू यांची संख्या वाढली आहे. याचा त्रास विशेषतः बाळंतिणी आणि नवजात बालकांना सहन करावा लागत आहे. आरोग्य केंद्रात असलेल्या एकमेव वैद्यकीय अधिकाऱ्याची उपस्थिती कायम नसून, ते अनेकदा रजेवर असतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णांची मोठी गैरसोय होते. रात्री उशिरा प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांना योग्य उपचाराअभावी उदगीर येथे रेफर करावे लागते. ग्रामपंचायत वलांडीमार्फत २० फेब्रुवारी रोजी आरोग्य केंद्रासाठी सौरऊर्जा यंत्रणा बसवण्यात आली आहे. गटविकास अधिकारी सागर वरंडेकर, राम भंडारे, उपसरपंच संतोष बिरादार, हसन मोमीन, निहाज मुर्शेद, आहेमदखा पठाण यांनी आरोग्य केंद्राची पाहणी केली.

आरोग्य केंद्रात रिक्त असलेली पदे तातडीने भरावीत आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ग्रामस्थ व रुग्णांच्या नातेवाईकांकडून केली जात आहे. प्रशासनाने त्वरित लक्ष न दिल्यास आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.